[" विद्याविनोद " मासिक पुस्तकांतून प्रसिद्ध झालेलें]

ऐतिहासिक नाटक.

[आनंदपर्यवसायी]

(पांच अंकी)

विजयानगरचा डळमळित राजमुगुट.

लेखक—

किरात.

" पानिपतचा दुर्दैवी मोहरा, " " दोन रजपूत कन्या, " " पन्हाळ-गडचा किल्लेदार " " वुइल्यम टेल् अथवा स्विच्छर्लंडचा देशभक्त बाका तिरंदाज, " " लायकर्गसचें चरित्र, " " लिसिस्ट्रेटा, " व " संभाजीचे पश्चात् मराठ्यांची स्थिति, " या पुस्तकांचे कर्त्यानें लिहिलेलें,

पुणें येथें

" ज्ञानप्रकाश " छा॰ छा॰

सन १९०१

[टपालखर्च ०॥.

The mightiest Critic is the Public Voice.
If from the life his shapes the poet draws,
In man's deep breast lie all the critic's laws :
The soul has instincts wiser than the Schools !
Yours is the great Tribunal of the Heart
And touched Emotion makes the test of Art.
Judges against ! -the same in every age
The passions weave the Sovery of the Stage.

LORD LYTTON.

नाटकांतील पात्रें व त्यांचीं कामें.

पात्रें.	अंक १ ला. प्रवेश ५.	अंक २ रा. प्रवेश ३.	अंक ३ रा. प्रवेश ६.	अंक ४ था. प्रवेश ५.	अंक ५ वा. प्रवेश ६.	
कृष्णराय.* अजमासें-वय वर्षे १२ वें	१-२	१	२-३-५-६		पिशाच्च झालेला कृष्णराय ३-६	विजयानगरचा राजपुत्र.
भोजतिरमल. अ० वय. ४५	१	१-३	–२३४–६	१-२-३-५	३-६	राजपुत्राचा चुलता.
रामराय. अ० वय. ३०	१-३	२			१-२-४-५-६	दिवाण.
हिंमतराव. अ० वय. २४	५	३	१-२-३	१-२-३-४	२-४-५-६	विजयानगरचा अभिमानी सरदारपुत्र.
शंभूराव. अ० वय. ३५	४	१-३	२-४-६	३-५	१-३-५	एक तोंडपुज्या सरदार.
गुलाम. अ० वय. ३५	४	१-३				रामरायाचा हस्तक.
उदाजी. अ० वय. १२		१				मानकऱ्याचा मुलगा.
किरकोळ नोकर, गडी, व इतर.	४ २	१	६	१-२	१-५-६	जामदार.
		१-२			२	नोकर.
मारेकरी.		३	६	४	२-५	०
वकील व इतर सरदार वगैरे		३		२-४	४ दासी १-३-४-५-६	
पद्मावती. अ० वय. २४	१-२-५	१	३-५-६	१	६	राजपुत्राची वडील बहीण.
विजया. १५			३-६	१-३	१-४-६	भोजतिरमलाची कन्या.
चंपावती. ४०			३-६	१-३	३	भोज० ची स्त्री.

पात्रांच्या कामाच्या वर दिलेल्या सूचीवरून सटरफटर पात्रांचीं कामें करण्याला कोणकोणचीं पात्रें रिकामीं राहतील हें, व कोणच्या पात्रांस केव्हां केव्हां कामें आहेत हें तेव्हांच कळेल.

गडीमाणसें व इतर क्वचित् एखादवेळेस येणाऱ्या पात्रांचीं नांवें वरील सूचींत मुद्दाम दिलीं नाहींत

* प्रत्येक पात्राचे पुढील कोष्टकांत जे आंकडे दिले आहेत त्यांवरून सदर पात्र त्या त्या अंकाच्या त्या त्या प्रवेशांत येणारें आहे. इतर प्रवेशांत नाहीं असें समजावें.

प्रस्तावनेदाखल दोन शब्द.

प्रस्तुत नाटकांत ज्या कालचा कथाभाग गुंफला आहे तो काल म्हटला म्हणजे इ० स० १५४२ तें ४३ च्या दरम्यानचा आहे. ह्या कथाभागाचा संबंध विजयानगरच्या प्रसिद्ध प्राचीन हिंदूसाम्राज्याशीं आहे हें नाटकाच्या नांवावरूनच स्पष्ट होत आहे.

ह्या नाटकांतील प्रसंग तालीकोटचा दुर्दैवी प्रतापी वीर रामराजा ह्याच्या कारकीर्दीच्या सुरुवातीचा आहे. राज्यतृष्णेची अनावर हांव सुटल्यामुळें मनुष्यांच्या हातून जीं अनन्वित पापकृत्यें व अघोर कर्मे घडून येतात त्यांचें यांत चित्र आहे. किंग जॉनकडून होणारा आर्थर राजपुत्राचा खून अथवा राघोबादादांच्याकडून होणारा श्री. नारायणराव पेशव्यांचा खून हा जितका भेसूर व हृदयद्रावक आहे तितकाच किंबहुना त्याहून जास्ती भेसूर, हृदयद्रावक व अंतःकरण विदारण करणारा असा भोज (होस) तिरमलकडून होणारा राजपुत्र कृष्णरायाचा खून आहे! चुलते राज्यलोभाला गुंतून आपल्या पुतण्यांचा वध करीत आहेत अशीं आणखी शेंकडों उदाहरणें इतिहासांतरीं सांपडतील. इतिहासाची ज्याप्रमाणें पुनरावृत्ती होते त्याचप्रमाणें मनुष्यस्वभावाचीही वारंवार पुनरावृत्ती होत असते. इतिहासाची पुनरावृत्ती तरी मनुष्यस्वभावाच्या पुनरावृत्तीवरच सदासर्वदा अवलंबून असावयाची. कारण इतिहास हा राज्याची धुरी वाहणाऱ्या अमानुष व राक्षसी राजांच्या अथवा सदाचरणी व प्रजावत्सल अशा राजांच्या कृत्यांचा केवळ वृत्तांत आहे. प्रस्तुत नाटकांत जो कथाभाग गुंफला आहे तो सध्या जीं सहज उपलब्ध अशीं इतिहासाचीं साधनें होतीं त्यावरून होय हें उघड आहे. यापुढें जास्त साधनें उपलब्ध होऊन कदाचित् कांहीं ऐतिहासिक पुरुषांचीं नांवेंहि फिरण्याचा संभव आहे. तरी देखील त्यायोगें प्रस्तुत नाटकांतील मुख्य संविधानकास कांहीं बाध येईल असें नाहीं. इतका प्रस्ताव करून आतां नाटकांतील पात्रांच्या स्वभावांचें थोडक्यांत दिग्दर्शन करण्याकडे वळूं.

राजपुत्र कृष्णराय हें पात्र अगदीं सोज्वळ विचाराचें व प्रेमळ असून त्याचे ठिकाणीं जगाच्या लुच्चेगिऱ्या, कावेबाजी व दुष्ट विकार यांविषयीं पूर्ण अज्ञान आहे. नायिका पद्मावती–राजपुत्राची बहीण–ही आपल्या भावावर अत्यंत प्रेम करणारी व त्याच्या जिवास सदासर्वकाल फार सावधपणें जपत राहणारी बहीण आहे. रामराय हा पूर्वीच्या दिवाणाचा पुत्र असून त्याच्या मनांत राज्यापहार करण्याचे भयंकर विचार एकवेळ घोळत असत; परंतु त्याचा बाप तिमराज यानें राजकन्या पद्मावती हिच्याशीं त्याचें लग्न करून दिल्यापासून, पद्मावतीचें राजपुत्र कृष्णरायावरील उत्कट प्रेम निदर्शनास आल्यापासून ते दुष्ट विचार डळमळूं लागून, पद्मावतीवर असणाऱ्या रामरायाच्या उत्कट, शुद्ध, व निर्मळ प्रेमातिशयामुळें त्या सर्वांचा अस्त होत आहे.

कधीं न पाहिलेलें राजवैभव पाहून मनुष्याची कशी स्थिति होते व थोडा व अधिक अधिकार मिळाला असतां जास्त व चिरकाल टिकणारा अधिकार मिळविण्याविषयीं मनुष्याला कशी लालसा उत्पन्न होते ह्याचें चित्र गुलामाच्या पात्रांत रेखिलें आहे. भोजतिरमलच्या पात्रांत राज्यलोभाला गुंतून पुतण्याच्या खुनास प्रवृत्त होणाऱ्या मनुष्याचें व खून केल्यानंतर अशा मनुष्याच्या होणाऱ्या स्थितीचें चित्र काढलें आहे. "खून हा बाहेर आलाच पाहिजे" ह्याचें प्रत्यंतर लेडी म्यॅकबेथच्या पात्रांत जसें प्रत्ययास येतें त्याचप्रमाणें तें भोजतिरमलच्या निद्रावस्थेंतच उठून आपल्या पुतण्याच्या खुनाची पुनरावृत्ती यदृच्छेनेंच होणाऱ्या खुनीचाळ्यांत स्पष्टपणें निदर्शनास येईल! आपण केलेला खून उघडकीस येऊन, आपण संपादन केलेलें राज्यहि रामरायाच्या हातीं जातें हें पाहून अत्यंत निराश व निरुत्साह होणारा तिरमल जीं अनन्वित कृत्यें करवीत आहे त्या कृत्यांनीं निराशेचें व निरुत्साहाचें मूर्त चित्र उभें केलें जात आहे. खुनासारखें भयंकर कृत्य पहात असतां एखाद्या मनुष्याची वाचा बसते ती पुन्हा तशाच प्रकारचें भयंकर कृत्य होत असतांना परत येते असा जगाचा अनुभव आहे. ह्याचें प्रतिबिंब पद्मावती प्रत्यक्ष आपल्या भावाचा खून पाहून जी मूक होते व तिरमलाकडून आपल्या खुनाच्या भीतीमुळें व तिरमलाचा खून पहात असतां तिला जी वाचा फुटते त्यांत बिंबित होत आहे.

भोजतिरमलची कन्या बिजया हिचें पात्रहि राजपुत्र कृष्णरायाच्याप्रमाणेंच अज्ञान, मुग्ध, सोज्वळ व प्रेमळ असें आहे. कृष्णरायाकरितां तयार केलेले विषाचे पदार्थ सेवन केल्यामुळें हिला कांहीं काल लागणारें वेड, राजभक्त तरुण सरदारपुत्र हिंमतराव यावरील तिचें प्रेम, व आपल्या बापानें राजपुत्राचा खून केल्यामुळें—अशी राजहत्या करणाऱ्या बापाच्या मुलीवर हिंमतरावासारख्या राजभक्त सरदारपुत्राचें प्रेम असणें हें अत्यंत पापमय होय अशा पवित्र कल्पनेनें तिच्या मनाची होणारी साशंक, अधीर, व निराशवृत्ती, व हिंमतरावाच्या अश्वासनावरून तिला धीर येऊन ती त्याच्या सांगण्यावरूनच जो वेडाचा बहाणा कायम ठेवीत आहे तो प्रकार, हे सारे करुणात्मक आहेत.

हिंमतराव हा अत्यंत प्रेमळ उदार व धीर असून अगदीं निस्सीम व कट्टा राजभक्त असा सरदारपुत्र आहे. हा अत्यंत मानी असून स्वराज्याचा अभिमान बाळगणारा व स्पष्टवक्ता आहे.

शंभूराव ह्या पात्रांत तोंडपुजे, लघाळ, देशबुडवे लोकांचें प्रतिबिंब उठविण्याचा प्रयत्न केला आहे. इतर पात्रें विशेष महत्वाचीं नसल्यामुळें त्यासंबंधानें येथें उल्लेख करण्याचें प्रयोजन नाहीं.

नाटकांतील प्रधान पात्रासंबंधानें इतकें सांगून, विजयानगरराजधानींतील राजवाड्यांत काय चाललें आहे तें सावधानपणें पाहण्याविषयीं कौतुक उत्पन्न झालेल्या व नाट्याभिरुचीच्या व इतिहासभक्त रसिक मंडळीस प्रार्थना करून हा प्रस्ताव येथेंच पुरा करतों.

पुणें,
२१ जून १९०९ } किरात.

विजयानगरचा

डळमळीत राजमुकुट.

अंक १ ला.

प्रवेश १ ला.

[राजमंदिर–प्र०–रामराय व पद्मावती]

पद्मावती–हें पहा, मला किनई हीं
ीं वेडीं वांकडीं स्वप्नं पडतात ह्मणून
तें कीं स्वारीवर जाण्याचा इकडचा
रहित करावा. इकडची अन् माझी
ांत ताटातूट झाली तेव्हां काय सांगूं
माझी अवस्था–

रामराय–काय ? या रामरायाची आ-
पद्मावतीची ताटातूट ? छेः, ही गोष्ट
तच नाहीं. तुझें नांव सीता अथवा
की असतं तर तसें कांहीं घडण्याची
! एरवीं कसली ? तुझा भाऊ राजपुत्र
राय आहे, तो अन् तूं इथं आनंदानें
तरी एक दोन महिने काढा. मला
नें गेलें पाहिजे. एरवीं ते मांडलीक
आणि तो कुर्रेबाज जमादार यशवंत-
यांची खोड नाहीं मोडायची. हा-
ार खंडणी चुकवितात ! मला जातीनें
च.त्यांचा समाचार घेतला पाहिजे.
रा होतो) हा पहा राममंदिरावरील
! ह्याच्यापूर्वीच मला गेलं पाहिजे
पण माझ्या ह्या प्राणाला सोडून जाववेना. (हनुवटीस हात लावतो.)

पद्मावती–(तोंड एकीकडे करून) हें काय बाई–पण लौकरच यायचं ना ?

राम०–जितकं लौकर येतां येईल तितकं येतोंच. नाहींतर मग तुलाच घेऊन जाईन, मग तर झालं कीं नाहीं ?

पद्मावती–अगदीं पण खरंच जसं कांहीं ? पण लौकरच यायचं झालं ह्मणजे मग मला न्यायचं कशाला कारण पडेल ?

राम०–हो तसंच. माझ्या येण्याची तूं अगदीं काळजी करूं नकोस. येऊं तर. (ती त्याच्या छातीवर मान टाकिते व तो तिच्या तोंडावरून हात फिरवितो.)—छेः. हा अशानं व्यर्थ उशीर मात्र होतो.

[नोकर येतो]

लुखजी–सरकार, पुढच्या दालनांत कृष्णराय महाराजांचे चुलते भोजतिरमल आणि आपला दिवाण गुलाम आपली वाट पाहताहेत..

राम०–जा अन् हा मी आलोंच ह्मणून सांग त्यांना. (तो जातो. पद्मावतीस)

येतों तर मी आतां. दुःस्वप्नाची शांति करण्याकरितां काय करायचं असेल तें करून टाकण्यास उपाध्येबोवाला सांग आणि त्याबद्दल कांहींएक मनांत आणीत बसूं नकोस. स्वप्नांत तूं स्वतःस राणी झालेली पाहिलंस तें मात्र कदाचित् खरं होईल ! कारण तूं राजकुलांत जन्माला आली आहेस !

पद्मावती–(आश्चर्यपूर्वक) ते कसं बाई. माझा कृष्णराय जिवंत असतां !

राम०–(हंसत) छेः छेः. तसं नव्हे. तूं एखाद्या मांडलीक राजाची राणी होशील. ज्या मांडलिकांवर मी चाल करून जात आहें त्यांपैकीं एखाद्याचं राज्य ह्या माझ्या प्राणाकरितां––आपल्याकरितां––विजयानगरच्या सार्वभौम महाराजाकडून मागून घ्यावं अशी माझी इच्छा आहे आणि त्याप्रमाणें जमेलही. ह्मणून ह्मणतों तुझं स्वप्न या संबंधांत खरं होईल !

पद्मावती–पण मी ह्मणतें मला हें इकडून असं जवळ असायचं झालं ह्मणजे मग तें मला राज्याहून देखील जास्त आहे. मग तें राज्यच घेऊन काय करायचं ? नसता घोर मेला !

राम०–अहाहा किती गोड उद्गार आहेत तुझे हे! तुझं हें असं निश्चल प्रेम असल्यावर आणखी काय पाहिजे मला ! (चुंबन घेऊन) हेंच माझं राज्य बरं ! येतोंच तर आतां. मी येईपर्यंत आनंदानं ऐस.

पद्मावती–बायकांचं जिणंच असलं ! त्याला कोण काय करणार ? पण लौकर यायचंना ?

राम०–अगदीं लौकर येतों. (हनुवटीस हात लावून व तोंड कुरवाळून) येतों तर. (जात असतां स्वगत) आपल्यापेक्षां उच्च कुलांतल्या घराण्यांतील मुलीशीं शरीरसंबंध जडला ह्मणजे त्याला तिच्याबद्दल अधिक प्रेम वाटूं लागतं व तिच्या संबंधानं एक प्रकारचा आदरही उत्पन्न होतो आणि कोणच्या गोष्टींनीं तिचं मन दुखणार नाहीं आणि कशानं तिची मर्जी प्रसन्न राहील ह्याकडेसच त्याचं लक्ष लागतं, ती स्थिति झाली आहे अगदीं माझी. स्वप्नांत तूं राणी झालीस तशीच खरोखरी होशील असं ह्मटल्याबरोबर ती काय चपापली पण ! आणि त्या वेळचे तिचे ते शब्द " माझा कृष्णराय जिवंत असतां? " कशा स्वरानें उच्चारले गेले ! कृष्णरायाचा खून करूनही विजयानगरची गादी मी उपटीन आणि मग अर्थातच ही राणी होईल, असे माझ्या मनांत बेत चालले आहेत अशी तर नाहीं तिला शंका आली ? (विचार करून) अथवा रास्तच आहे तिला हें असं वाटणं ! कारण हिच्या बापाला माझ्या बापानं विषप्रयोग करून ठार मारल्याची गोष्ट जर हिच्या कानावर गेली असेल––आणि ती जाणारच–तर हिला असा संशय येणं स्वाभाविकच आहे. सारी दिनदुनया तिमराजांच्या संबंधानें संशयाचे उद्गार काढते आहे ! पण ज्या अर्थी तिचं अन् माझं बाबांनीं आह्मी लहान असतांनाच लग्न केलं आहे त्या अर्थी माझ्या बाबांसंबंधाची गोष्ट तिच्याजवळ काढा-

यला कोणी धजेल असं वाटत नाहीं मला. आणि ही गोष्ट तिच्या कानावर जाऊं नये अशाबद्दल मीं देखील माझ्याकडून योग्य ती खबरदारी घेतली आहे. कारण ही गोष्ट तिला कळल्यानें आमच्या दोघांच्या प्रेमांत विष कालविलं जाईल. हिच्या तैनातींत अशींच माणसं ठेविलीं आहेत मीं कीं ज्यांना त्या विषप्रयोगासंबंधानं कांहींएक माहीत नाहीं. (शंकायुक्त) मग काय असेल तें असो. सध्यां तरी हा विचार आपल्याला बाजूला ठेवला पाहिजे. चार वर्षें झालीं त्या मलबारच्या किल्ल्यावरील राजांनीं खंडणी दिली नाहीं. तसाच तो यशवंतराव जमेदार मोठ्या कुर्‍यानं वागतो. ह्या स्वारींत ह्या सगळ्यांची चांगली खोडकी मोडून येतों. इथला कारभार पहायला माझा इमानी सरदार गुलाम याला देतों ठेवून, ह्मणजे इथली नको मग मला काळजी करायला. भोजतिरमल—राजपुत्र कृष्णरायाचे चुलते, हे अर्धवट, तिरसट, माथेफिरू आहेत. त्यांना मीं होऊनच राजपुत्राचे पालक ह्मणून नेमलें आहे. तेव्हां त्यांच्यासंबंधानेंही कांहीं भीति नाहीं. आतां येऊन जाऊन भीति ह्मटली ह्मणजे इथल्या हेवेखोर सरदारांची. राजकुलांतल्या कन्येशीं माझं लग्न झालेलं त्यांना पाहवत नाहीं! पण आपलं वर्तन जर चोख आहे तर मग ह्यांची काय भीति इतकी? हातांत सत्ता आणि अधिकार हीं असलीं ह्मणजे मनुष्य आंधळा होतो. ह्या पद्मावतीशीं जर माझं लग्न न होतं तर मला वाटतं मी कसकशा आणि काय काय गोष्टी करण्यास उद्युक्त झालों असतों ह्याचा माझा मलाच नेम सांगवत नाहीं. पण ह्या एका बंधनानं माझ्या मनांतल्या साऱ्या उच्छृंखल वृत्तींना अगदीं जखडून टाकून मला बंदीवान करून टाकलं आहे. हें एका परीनं बरंच आहे. पण पद्मावतीनं आणि मी दोघांनीं मिळून विजयानगरच्या सिंहासनावर बसावं, अन् आमच्यावर छत्रचामरं धरलीं जावीं, ही जी माझी पहिल्यापासूनची कल्पना–सृष्टि ती खरी कशी व्हावी? (विचार करून) काय? कृष्णरायाला विषप्रयोग! त्याचा खून–आणि तो त्याच्या बहिणीच्या नवऱ्याच्या हातून! कोण भयंकर आणि पापी विचार हे!–हे माझ्या मनांत तरी कसे येतात! (विचार करून) माझ्या हातून कृष्णरायाचा खून झाल्याचं तिला समजलं तर तिची जी स्थिति होईल ती स्थिति या घटकेला माझ्या डोळ्यापुढं मूर्तिमंत उभी राहत आहे. (विचार करून) नको नको ती कल्पना देखील नको. (विचार बदलून) ह्याच दालनांत बसले आहेत नाहीं माझी वाट पाहत सर्वजण. ठीक आहे तर. यांचा निरोप घेऊन निघालं पाहिजे आतां आपल्याला इथून. (पुढें जातो. भोजतिरमलास) काय राजे काय ह्मणताहेत?

भोज०—कांहीं नाहीं. शिकारीसंबंधानं ह्मणत होते—पण आपण केव्हां निघणार?

रामराय—मी निघालोंच हा ठरल्या-

प्रमाणं. राजेसाहेबांना दोन चार दिवसांनीं एकदां तरी शिकारीला नेत जा. उदाजीरावांना अन् दुसऱ्या मानकऱ्यांनाही बरोबर घेत जा. (सरदार गुलामास उद्देशून) गलाम, तुम्हांला सांगितल्याप्रमाणं माझ्या मागं तुम्ही इथला सर्व कारभार पाहत जा. वरचेवर कमजास्त मजकुराची सांड येऊं दे. नीट संभाळून असा. मलबारच्या राजांचा आणि त्या यशवंत जमेदाराचा मी चांगला समाचार घेऊन येतों. इथल्या सरदारांवर नीट डोळा ठेवा. फंद फितूर करतील. तुम्हांला सांगितलंच आहे सगळं कसं वागायचं तें. चुकूं नका शिस्तींत. येतों मी. [जातो]

प्र. २ रा.

स्थल—राजपुत्र **कृष्णराय** निद्रिस्त आहे. त्याचे खोलींत **पद्मावती** हातांत शामदान घेऊन येते.

पद्मा०—(घाबरून) इथं तर सगळी सामसून दिसते आहे! किती शांत रात्र ही! मी कानोसा घेत घेत किती भीतभीत आलें पण इथवर? हा तर झोंपेंतच ह्या कुशीवरचा त्या कुशीवर वळला. आतां कांहीं शंका नाहीं! पण इथवर येईतोंपर्यंत माझ्या जिवांत जीव नव्हता. माझे पाय अगदीं लटपटायला लागून ते उचलायची देखील शक्ति नव्हती मला. अन् माझ्या सगळ्या अंगाला एक प्रकारचं असं कांहीं चमत्कारिक कांपरं भरलं होतं कीं हें शामदान देखील मला ह्या हातांत घट्ट धरतां येईना! स्वप्नांतून जागी झालें तोंच माझ्या सगळ्या अंगाला दरदरून घाम सुटला! एकंदरींत स्वप्नांतच पाहिलं तर मीं हें सगळं!—कृष्णरायाचा तिकडून खून होतो आहे! तो अगदीं गयावया येऊन जिवदान मागतो आहे! मी मध्यें आलें पण माझ्यावरही येवढाले डोळे करून पाहायचं! अन् "मध्यें आलीस तर व्यर्थ आपल्या प्राणाला मात्र मुकशील." असं म्हणून माझ्या अंगावर जंबिया घेऊन एकदम उसळून यायचं! त्याबरोबर मी दचकून एकदम जागी झालें अन् हें सगळं मला किती तरी खरं वाटलं पण! मी जागी झालें, पण त्या वेळीं माझ्या तोंडांतून एक अक्षर देखील निघेना कीं महालाच्या बाहेर पाऊल टाकण्याचाही मला धीर होईना! पण शेवटीं मी इथं कशी आलें हें माझं मलाच समजत नाहीं! हिमतराय म्हणाले कीं, "कृष्णराय—तिकडच्या सांगीवरून—सध्यां गुलामाच्या नजरकैदेंत आहे!" तसं असतं तर मला कांहीं थोडंबहुत दिसलं असतं तसं. पण—अगबाई! हा काय पुटपुटतोय्!

कृष्ण०—(पुन्हां कुशीवर वळून बरळतो.) उद्यां भल्या पहाटेस जाऊं शिकारीला? ताई तूं देखील चल. तुलाय् घोड्यावर बसतां येतं. तूं भालाही फेकतेस! मग येतेसना?

पद्मावती—(बाजूस उभी राहिलेली) हें सगळं हा झोंपेंत बरळतोय्. कोण शिकारीचं वेड लागलंय् याला! जागं करूं का याला? छेः, नकोच पण! अशा वेळीं

मला इथं पाहून हा दचकून उठायचा एखादा. तर आतां हलकेंच कांहींएक जाग न करतां इथून मुकाट्यानं निघून आपल्या महालांत जावं—पण हें असं स्वप्न कां पडावं? (विचार करते.) हो! अथवा असंच असावं! मनीं वसे तें स्वप्नीं दिसे ह्मणतात तें कांहीं खोटं नाहीं. कालच माझं अन् हिंमतरावाचं बोलणं झालं, त्यांत त्यानं प्रतिनिधी तिमराज—ह्मणजे माझे मामंजीच—ह्यांनीं बाबाला अन् कृष्णरायाच्या बापाला दोघांना विषप्रयोग करून ठार मारल्याचं लोक बोलतात ह्मणून सांगितलंन् अन् माझ्या बापाच्या अन् चुलत्याच्या खून करणाऱ्याच्या मुलाशीं माझं लग्न झाल्याबद्दल त्यानं आपल्याला फार वाईट वाटत असल्याचं दर्शविलंन्. अन् तो आणखी असंही ह्मणाला कीं, "त्यांचे खून करण्यापूर्वीच तुला आपली सून करण्यांत तिमराजाचे दुसरेही कांहीं हेतू असावेत! न जाणो विजयानगरच्या गादीवर आपल्या मुलाला बसविण्याचा त्यांचा हेतु नसेल कशावरून?" अशा संशयित उद्गाराबद्दल मीं हिंमतरावांचा निषेध केला आणि तिकडचं मन मी पक्कं ओळखून आहें ह्मणून सांगितलं मीं त्याला. पण तो ह्मणाला, "राज्यलोभाच्या भरीं भरून कोण काय करील आणि काय नाहीं याचा कांहीं नेम नाहीं! आणि ह्मणूनच कृष्णरायाच्या संबंधानं मला फार भीति वाटते." त्या त्याच्या उद्गारावरून माझ्या मनात किती तरी विचार आले! आणि मला वाटतं हें माझं स्वप्नही त्यामुळंच पडलं असावं मला! कांहीं असो. आतां ह्याबद्दल फार विचार करून नाहीं उपयोगी. (नौबत वाजते.) अग बाई ही मध्यरात्रीची नौबत! अजून पुष्कळच रात्र आहे तर. तर आतां आपण निजावंच! अथवा आतां झोंप कसची येणार? महालांत जाऊन कांहीं वेळ कानोसा घेत बसावं. अन् मग पाहवी झोंप आली तर! (कृष्णरायाकडे पाहून) अंबाबाई, (शामदान घेऊन जात असतां) कृष्णरायाला चांगली गाढ झोंप लागूं दे—माझ्यासारखी अस्वस्थ नको ती! कारण झोंप ह्मणजे मनुष्याला एक विरंगुळा आहे. [जाते]

प्रवेश ३ रा.

रामराय—विजयानगर सोडून आज मला सहा महिने झाले. आमच्या ढाला परत फिरण्याचा योग केव्हां येईल हें कांहीं अजून नाहीं सांगतां येत मला नक्की. एकदोन मांडलिकांना जेरीस आणून पुढील सालापासून खंडणी देण्याचं त्यांच्याकडून कबूल करून घेतलं. आणि या यशवंतराव जमेदाराच्या समाचाराला आलों. पण हा मोठा कावेबाज आणि किल्ला भांडविण्याच्या कामांत मोठा मर्द आणि झुंजारमाणूस दिसतो. ह्याच्या किल्ल्याला आज तीन महिने झाले वेढा देऊन बसलों आह्मीं तरी हा अजून जेरीस येंत नाहीं! उलट किल्ल्यासभोंवतीं पसरलेल्या आमच्या सैन्याच्या तुकड्यांना दाणागोटा न मिळण्याच्या हा तजविजी करतो. आमच्या

जवळील होता नव्हता तो पैसा खलास झा-ला. करितां विजयानगरास सरदार गुलामाला पैसा पाठविण्याविषयीं पत्रें लिहिलीं. त्या गोष्टीला आज सतरा दिवस झाले. उत्तर नाहीं ह्मणून मुद्दाम सांड पाठविली! मुबलक खजिन्याशिवाय मोहिमी होत नसतात. भेदाचा प्रयत्न करून पाहिला. पण तोहि ऑफस् झाला. यामुळें सध्यां मला कांहीं सुचेनासं झालं आहे. या यशवंतरावाला जेरीस आणल्याशिवाय विजयानगरला परत जावयाचें नाहीं असा माझा कृतनिश्चय आहे. दोनतीन महिन्यांत परत येतों ह्मणून सांगून आलों. त्याला आज सहा महिने होऊन गेले. मोहीम फत्ते केल्या शिवाय परतायचं? छेः. हें तर होणंच नाहीं. मुसलमानांशीं संधान राखून आमचेच लोक आमच्याशीं लढायला तयार होतात! हे यवनी राजांना खंडण्या देतील, त्यांच्या मसनदीपुढें माना वांकवतील, प्रसंगीं आपल्या पोरीबाळीही त्यांच्या गोषांत नेऊन घालतील, पण आपल्या जातभाईवाल्या—आपल्या धर्माच्या, आपल्या आचारविचाराच्या अशा, आपल्या राजाशीं दगाफटका आणि फंदफितुरी केल्याशिवाय इमानानें राहतील ही गोष्ट त्यांच्या हातून स्वप्नीं देखील होणं नाहीं! आजवर इथले सर्व हिंदु एक दिलानं वागते तर विजयानगरचा आज किती दरारा आणि किती बडेजाव असता! पण हें शक्यच नाहीं. कारण हें उघडचं आहे, घरांतील यादवी आणि आपापसांतील फाटाफूट ह्यांचा बीमोड आणि समूळ नायनाट झाल्याशिवाय शत्रूवर आपली सरशी होऊन आपल्याला विजय मिळणें शक्यच नाहीं. सध्याच्या स्थितींत तर असं होणं मुळींच शक्य दिसत नाहीं. तर पहिल्यांदां ह्या जमेदाराला जेरीस आणून ह्याचा नकशा उतरून मगच ह्याचे डोळे उघडण्याचा प्रयत्न करावा. ह्मणजे ह्याच्या सारख्या दुसऱ्या पुंडांना दरारा बसून त्यांना वर डोकं काढण्याची छाती होणार नाहीं.

प्रवेश ४ था.

स्थळः—जामदारखाना.

गुलाम सरदार—(खजिन्यांतील अपार द्रव्य पाहून डोळे फिरून गेले आहेत व ऑ झाला आहे असाच कांहीं वेळ उभा राहतो.) अरे बापरे! काय ही संपत्ति! मी तर नाहींच, पण माझ्या बापदादांनीं देखील अशी संपत्ति कधीं पाहिली नव्हती! सोनें काय, मोती काय, जवाहीर काय! अहा हा हा हा हा हा! पण कोणाचं हें? हें रामरायाचं! चुः. हें बघून लक्षाधीशाचे देखील डोळे फाटायचे! मग माझं काय! रामरायानं खजिना पाठवून द्यायला लिहिलं त्यामुळें हा जामदारखाना उघडण्याचा प्रसंग आला! हा उघडण्याचा प्रसंग जर न येता तर खचित माझ्या मनांत हे असे चमत्कारिक विचारही पण न येतें. हं, असंच! यापुढं रामरायाला पैसाच पाठविला नाहीं तर काय करणार काय तो पैशाशिवाय? रामरायानं राजपुत्राला मा-

झ्या नजरकैदेंत ठेवलं आहेन्. व त्याच्यावर मला चांगली देखरेख ठेवण्यास सांगितलं आहे. (विचार करून डाव्या तळहातावर उजव्या हाताची मूठ मारून) हो—अथवा रामरायानं मी ही मोहीम करून परत येई तोंपर्यंत कृष्णरायाला विष देऊन ठार मारून टाक ह्मणून मला सांगितलं आहेन् असं रामरायाचा द्वेष करणाऱ्या सरदारांच्या आणि राजपुत्राचे चुलते भोजतिरमल ह्यांच्या, ह्या दोघांच्या मनांत भरवून दिलं कीं आपला डाव हवा तसा साधेल. राजपुत्राला बसवावा गादीवर. भोजतिरमल राजपुत्राचे पालक आहेतच. अर्थात दिवाणगिरी माझ्याच हातीं राहणार ! अन् ती राहिली ह्मणजे मग ही सगळी संपत्ति कोणाची ? तेव्हां हाच पेच. त्याशिवाय कांहींच नाहीं रंगणांत यायचं. रामरायाच्याकडून आलेल्या लोकांना सध्यां टाकावं कैदेंत, आणि आपला डाव घ्यावा अगोदर साधून ! आपला डाव साधल्यावर मग जरी ही बातमी त्या रामरायाला समजली तरी बेहेत्तर. मग कोण करतो त्याची पर्वा. बस्स हीच युक्ति. इकडे कृष्णरायाला राज्याभिषेक आणि इकडे मला दिवाणगिरीचीं वस्त्रं! सगळ्या सरदारांना आणि राजाचे चुलते भोजतिरमल यांना पुरं घेरून टाकतों माझ्या मोहजालांत ! शंभुरावाला बोलावणं पाठविलं होतं, अजून कां बरं नाहीं आला तो? त्याच्यासारखा एकादा सरदार जर आपल्याला अनुकूल झाला तर त्याच्या मार्फत रामरायासंबंधानं खोट्या नाट्या कंड्या पिकवून सगळ्या सरदारांना आपल्याकडचं करून घेतां येईल. अन् तिकडे भोजतिरमलालाही तुला गादीवर बसवितों ह्मणून नादीं लावून ठेवला ह्मणजे आपला डाव साधलाच. (इतक्यांत शंभुराव येतो त्यास) या, या शंभुराव. पुरीं शंभर वर्षं आहेत बुवा तुम्हांला. मीं ही इतक्यांतच तुमची आठवण काढली होती.

शंभू०—माझ्या आयुष्याचं एकादं वर्ष कमी होईल ह्मणून तर मी इतक्या लगबगीनं आलों !

गुलाम—(हंसून) होः होः होः हो!

शंभू०—अहो ह्या प्रेमाच्या अन् लोभाच्या गोष्टी आहेत. नाहींतर तुह्मी माझी आठवण करायला अन् मी इथं यायला एकदम गांठी कशा पडाव्या ?

गुलाम—अलबत्. इतक्या सरदारांत माझा दिल तुमच्यावर जितका ओढतो तितका दुसऱ्या कोणावर ओढत नाहीं. असं कां तें एक अल्ला जाणे.

शंभू०—अहो, तसे लागेबांधेच असतात ते मागच्या जन्मीचे.

गुलाम—अन् ह्याही जन्मीचे ! पण हें पहा हें जवाहीर इतकं असं पाह्यलं होतं तुह्मीं कधीं ? हें सध्यां माझ्या ताब्यांत आहे !

शंभू०—अहो, ताबा अन् मालकी एकच.

गुलाम—छेः, तसं कसं ह्मणतां येईल.

शंभू०—रामरायांनीं तुमच्याच जें हें हवाली केलं तें काय ह्मणून तर ? त्यांनीं

तरी योग्य माणूस पाहूनच हवाली केलं हें!

गुलाम—योग्य माणूस ! तें कसं ?

शंभू०—हः, हा शिरपेच घेऊन जर इथं ह्या बत्तींत खोंचला तर काय वावगा दिसेल.? खुद्द विजापूरच्या आदिलशाहींत नाहीं असलं जवाहीर ! अहाहा किती गोड आणि सुंदर दिसतं ह्मणून सांगूं तुम्हांला ? इस्माईलशहाला नाहीं शोभणार इतकं !

गुलाम—छेः, तुह्मी कांहीं तरीच ह्मणतां. (काढूं लागतो) हें मीं घालणं ह्मणजे विजयानगरच्या गादीचा अपमान करणं आहे ! अन् शिवाय शोभायचंही नाहीं मला हें तुह्मी ह्मणतां तसं.

शंभू०—मला वाटतं ह्या जवाहिराकरितांच परमेश्वरानं आप—नाहीं आपल्याकरितांच परमेश्वरानं हें जवाहीर उत्पन्न केलं आहे. मग विजयानगरच्या गादीचा अपमान होण्याचं कारण ? कारण खुद्द राजवंशातला असा कोण आहे गादीवर ? नांवाचे राजे करून गादीवर बसवायचे अन् सगळी सत्ता तिमराजासारख्यांनीं नाहींतर रामरायासारख्यांनीं बळकावयाची. असाच प्रकार चालला आहे कीं नाहीं इथं ? मग तुमच्या सारख्या राजनिष्ठ सरदारांनीं जर हें घातलं तर त्यामुळें गादीचा अपमान कसा आणि कोठून होणार? (त्याच्या दंडाला राजभूषणें बांधतो) वाः, काय खूपसुरत दिसताहेत हीं !

गुलाम—शंभुराव, काय करतां आहां काय तुह्मी हें ?

शंभू०—खुदाच्या मनांत आहे तेंच करतों आहें मी!

गुलाम—हा इथल्या राजांचा भरजरी आंगरखा.

शंभू०—फार दिवस जामदारखान्यांतच पडला आहे हा. (त्याच्या अंगावर घालून) वाः, अस्मान फोडून इंद्रलोकांहून जसा इंद्र उतरला आहे प्रत्यक्ष ! (पट्टा बांधतो) यां मेखलेच्या ह्या पाचा, ह्या उजेडांत काय चमकताहेत !

गुलाम—शंभुराव, कोणी तरी पाहील. काय करीत आहां तुह्मी हें ?

शंभू०—अहो, भिता कां तुह्मी असे ? खुदा देतो अन् कर्म नेतें असं कां करतां ? इथं कांहीं रामराय नाहीं आतां असं उगीच भ्यायला !

गुलाम—अहो, दुसरा कोणी चहाडी करील ह्मणून ह्मणतों—

शंभू०—पण सध्यां दिवाण तुह्मीच आहांतना !

गुलाम—मग ?

शंभू०—मग काय ? तुमच्याविरुद्ध ब्र काढण्याची छाती कोणाची लागली आहे ? (कोणी नाहीं असें पाहून) तुह्मी बादशाहा व्हा, मी तुमची दिवाणगिरी पत्करतों.

गुलाम—पण इथले दुसरे सरदार—हा भोजतिरमल अन् हा कृष्णराय, हे इथं जोंपर्यंत आहेत तोंपर्यंत-आपण असं केलं तर स्वस्थ कसे बसतील हे !

शंभू०—स्वस्थ कसे बसतील ! त्यालाही एक तोड आहे. पण ती—नको सध्यां

एवढंच. तुह्मी दिवाणगिरीवर आहांच, हीच कायमची मिळवा ह्मणजे पुढं मागं हाही बेत साधायला जड नाहीं जायचं ! तुमचंच ह्मणणं खरं. तुमच्यामध्यें राजधोरण आहे. मीं ह्मटलं नाहीं का कीं परमेश्वरानं तुमच्याचसाठीं हें जवाहीर निर्माण केलं आहे ह्मणून !

गुलाम—तुह्मी तर बहुत पारखी आहां. पण (कोणी जवळ नाहींसें पाहून) शंभुराव, रामरायाकडून पैशाची मागणी आली आहे, तिचं कसं करावं ?

शंभू०—(विचारयुक्त) हो, ही एक पंचाईतच खरी !.

गुलाम—माझ्या मनांतून (त्याचे कानांत कांहीं सांगतों.) असं करायचं आहे. मात्र याला तुमची मदत पाहिजे ! तुह्मांला विसरणार नाहीं मी.

शंभू०—मीं ह्मटलं नाहीं कीं तुह्मी सुलतान व्हायलाच योग्य आहां ह्मणून. अहाहा ! काय राजधोरण !

गुलाम—कृष्णरायाला विषप्रयोग करण्याची कामगिरी रामरायानं मला सांगितलीन् अशी या तुह्मी उठवून कंडी सगळ्या सरदारांत अन् विजयानगरभर !

शंभू०—याचं नांव मुत्सद्देगिरी! वाःवाः वाः वाः ! काय डाव ! काय युक्ति !

गुलाम— अन् इथल्या सरदारांपैकीं पुष्कळजण रामरायाच्या वांकड्यावरतीच आहेत.

शंभू०—अगदीं बरोबर !

गुलाम—हिंमतरावाचं अन् ह्याचं त्यांच्या बापापासूनच हाडवैर आहे.

शंभू०—मी हेंच सांगणार होतों कीं, हिंमतरावाला हातीं धरा. त्याला हातीं धरल्यावर हा राजमुकूट आपल्या हातीं यायला फार वेळ नाहीं लागणार मग. या मुकुटाचे हिरे तिथून चमकताहेत ! किती देदीप्यमान आहे हा !

गुलाम—अजब आहे याची चमक !

शंभू०—थांबा,आपल्या डोक्यावर घालून बघतों ! [मुकुटास हात घालावयास जातो तों एक नागसाप फुस्स करून फडा काढून उभा राहतो. त्यास पाहून त्यांचे अंगाचा थरकांप होतो.] सा ऽऽऽ आ आ ऽऽ—

गुलाम—चला. बाहेर या माझ्या मागोमाग. (बाहेर येतात. गुलाम त्यास ओढून आणतो. कांहीं घुमत असलेला आवाज ऐकून) शंभुराव, शंभुराव असें भिऊं नका. मुकुटाला हात घालायचा नव्हे मुळीं ! तुह्मीं देखील इतक्यांत कांहीं आवाज ऐकलांत का ? "विजयानगरच्या गादीचा अपमान करणाऱ्यांना देहान्त प्रायश्चित्तच मिळेल !" असा आवाज अजून घुमतो आहे इथं. ऐका, नीट ऐका.

शंभू०—बोबडी वळते. (आपल्यास इथून बाहेर न्या ह्मणून खूण करतो.)

गुलाम—(स्वतःशीं) ह्याची तर बोबडी वळली हा प्रकार पाहून ! स्वतः सुलतान व्हायची माझ्या डोक्यांत कल्पना देखील नव्हती आली कधीं ! कृष्णरायाला गादीवर बसवून आपण वाजिरी क-

राणी एवढीच कायती माझी इच्छा—अन् असं असून ह्यानं किरिटाला हात लावल्याबरोबर हा असा प्रकार झाला! तेव्हां असं नाहीं उपयोगी आतां. (शंभुरावास) हें पहा शंभुराव, भिऊं नका असे. कृष्णरायाला राज्याभिषेक करवूं, अन् त्याच्या डोकीवर हा मुकूट घालूं, ह्मणजे स्वस्थ होईल सगळं. भिऊं नका असें. चला माझ्याबरोबर. [जातात.]

जामदार—हा सगळा प्रकार मीं आपल्या डोळ्यांनीं पाहिला ह्मणून बरं आहे. मला तर हें सगळं स्वप्नासारखं वाटतं आहे. कांहीं असो, ही सारी बातमी मला पद्मावतीबाई साहेबांना दिली पाहिजे. अशा गोष्टीसंबंधानं डोळ्यावर कातडं ओढून नाहीं उपयोगी. विजयानगरच्या राजांचा मुकूट अन् हा हरामखोर शंभुराव ह्या यःकश्चित् नोकऱ्याच्या डोक्यावर घालून भ्रष्ट करणार होता! खऱ्या अस्सल जातिवंताच्याकडून गादीचा तरी असा अपमान होणार नाहीं हें खास! मग काळच फिरला तर नाहीं सांगवत. काय काय नेमानेम आहेत कळत नाहीं! कृष्णरायाला हा चोर राज्यभिषेक करवून आपण दिवाणगिरी उपटणार! काय कारस्थान गुलामाचं! पक्का हारामखोर आहे. रामरायांनीं विश्वासू ह्मणून याला नेमला तों त्यांचाच गळा कापायाला हा तयार झाला! सारी दुनियाच अशी आहे, त्याला तो तरी काय करील! या दुनियेच्या बरोबरच आपल्याला देखील गेलं पाहिजे. चलाच मन्याबापू तर, इथं व्यर्थ रडत बसण्यांत काय अर्थ आहे? [जातो]

प्र० ५ वा

[हिंमतराव व पद्मावती]

पद्मावती—हिंमतराव, ही शिंगं, तुताऱ्या अन् नौबती झडून जी एकच गर्दी उसळून गेली आहे ती कसली?

हिंमतराव—ही गर्दी अन् हा सारा गजगजाट कृष्णरायाच्या राज्याभिषेकाचा.

प०—(साश्चर्य) राज्याभिषेकाचा? अन् मग तुह्मीच कसे इकडे? अन् तिकडून मुलुखगिरीहून स्वारीचं येणं होण्यापूर्वी!

हिं०—हो. तसंच ठरलं सगळ्यांच्या मतानं. रामरायाच्या सांगीवरून कृष्णराय कैदेंत असल्याचं गुलामानं कबूल केल्यावरून भोजतिरमल आणि दुसरे सरदार या सर्वांच्या विचारानं असं ठरलं कीं, कृष्णरायाला राज्यावर बसवून दिवाणगिरी गुलामाला सांगावी आणि रामरायाला पैसा अथवा कुमक कांहींएक न पाठवितां बाहेरच्या बाहेर—पुढें माझ्यानं सांगवत नाहीं—

प०—(भिऊन जाऊन) ह्मणजे? काय ह्मणतां काय तुह्मा? ठार कां करायचं? असं काय घडलं आहे तिकडनं?

हिं०—घडलं असो किंवा नसो, पण रामरायानं आपण मोहिमेहून परत येईतोंपर्यंत कृष्णरायाला विषप्रयोग करून

ठार करून टाकायला सांगितलं आहे म्हणून ह्या गुलामानं भोनांना आणि माझ्यासकट सरदारांना सांगून हा आजचा राज्याभिषेकाचा प्रसंग जमवून आणलाय् एवढं खरं! इतके दिवस मीं ही गोष्ट तुमच्यापासून छपवून ठेवली, पण आज मला ती सांगणं आलं?

प०—काय ? कृष्णरायाला—माझ्या भावाला—विषप्रयोग करण्याविषयीं तिकडनं गुलामाला सांगी झाली म्हणतां अन् याच्यावर तुमच्यासारख्यांचा विश्वास बसतो! कृष्णरायाला विषप्रयोगच जर करायचा होता तर स्वारीला तो जातीनंच नसता कां करतां आला, आणि पुन्हां ह्या कानाचं त्या कानाला देखील न कळूं देतां. इतक्या दिवसांच्या सहवासानं कां माणसाचं मन ओळखतां येऊं नये? हिंमतराव, मला वाटतं त्या गुलमाचाच हा सारा कावा आहे.

हिंमतराव—ताई साहेब. इतका वेळ मला अगदीं मोहनी पडली होती. आणि राज्यलोभाला गुंतून कोण केवढें साहस करील याचा कांहीं नेम नाहीं, असें मला वाटतं; आणि म्हणूनच आजवर त्या गुलामाच्या सांगण्यावर मीं डोळे झांकून अगदीं निमूटपणें विश्वास ठेवला. पण आज माझे डोळे उघडले!

पद्मा०—(साश्चर्य) ते कसे?

हिंमत०—सांगतों, सगळं सांगतों. रामरायांची दिवाणगिरी आपण उपटली म्हणून तुह्मांला वैषम्य वाटेल व तुमचं रामरायांशीं लग्न झालं असल्यामुळें तुह्मांला हा सारा प्रकार रुचणार नाहीं, ह्मणून तुह्मांला कोणच्याही तरी रीतीनें जगांतून नाहींसं करून टाकण्याची कामगिरी गुलामानं आज माझ्यावर सोंपविली आहेन्!

पद्मा०—(साश्चर्य) होय का? तर मग उशीर कां? कसली वाट कसली बघतां? तुमची समशेर आहेच तुमच्या कंबरेला. उपसा अन् करा माझे इथल्या इथंच तुकडे.

हिंमत०—ताई साहेब, त्या काफरानं ही भयंकर कामगिरी जेव्हां मला सांगितलीन्, तेव्हांच तर माझ्या डोक्यांत चक्ककन् प्रकाश पडला! आणि हें सारं आपल्याला दिवाणगिरी मिळविण्याकरितां याचं कारस्थान आहे, असं माझ्या तेव्हांच पक्कं लक्षांत येऊन चुकलं! आपल्याला ह्यापुढें कृष्णरायाच्या जवळ राहूं दिलं तर आपण त्याच्या मनांत कांहीं भरवून देऊन त्याची दिवाणगिरी काढवून टाकाल, अन् कदाचित् रामरायांना परत आणविण्याविषयीं कानमंत्र देऊन परत आणवाल, ही त्या गुलामाला भीति! अन् ह्मणूनच तुह्मांला कृष्णरायाजवळून दूर—कायमचं दूर—करण्याकरितां माझी योजना झाली आहे!

पद्मा०—हो, ह्मणूनच मी ह्मणतें करा, दूर करा मला—सगळ्यां त्रासापासून दूर करा मला. ज्या जगांत संपत्तीकरितां, वैभवाकरितां आणि अधिकाराकरितां

असे विषप्रयोग, असे खून, आणि असे रक्तपात होतात, त्या जगांत राहण्याची कोण इच्छा करील. ह्मणून ह्मणतें हीं आपली तरवार घ्या आणि करा एक घाव आणि दोन तुकडे!

हिंमत०—ह्मणजे एकूण मला आपण यःकश्चित् खुनी आणि मारेकरी समजतां तर! मी, माझे बापदादे, माझे आजे, माझे पणजे, आजपर्यंत ज्यांच्या अन्नावर वाढले, ज्यांच्या पदरीं राहून आजवर एकनिष्ठेनें त्यांनीं सरदाऱ्या केल्या, ज्यांच्याबरोबर मोठमोठ्या मोहिमांत हजर राहून, जातीनं लढून, शत्रूशीं झुंजून, त्याला जेर करून, विजयश्री संपादली—प्रसंगीं आपले आणि आपल्या बायकापोरांच्या प्राणांचेही बळी द्यायला मागेंपुढं पाहिलं नाहीं—त्या जाधवांच्या कुळांत जन्म घेऊन मी आमच्या थोरल्या महाराजांच्या पोटच्या गोळ्याचा—अर्थात् आपल्यासारख्या निरपराधी राजकन्येचा खून करून नरकाचं साधन करीन असं आपल्याला वाटतं? असं नीच कृत्य करायाला तयार होण्यापेक्षां ही समशेर पहिल्यानं स्वतःच्या मानेवर चालवून पाहीन कशी चालते ती, अन् मग.—

पद्मा०—हिंमतराव, तुमच्यासंबंधानं नाहीं हो मला एक काडीभर दिखील संशय येत. पण ही अशी स्थिति पाहून असे वाटतं कीं अशा स्थितींत राहण्यापेक्षां मरणं बरं!

हिंमत०—तुमच्यासारख्यांनीं हे असले विचार काढूं नयेत. भिण्याचं बिलकुल कारण नाहीं. हेही दिवस जातील. पहिल्यानं सध्यांच्या प्रसंगांतून पार पडलं पाहिजे तुह्मांला, आणि यांतून पार पडायला एक युक्ति योजिली आहे मीं.

पद्मा०—काय युक्ति योजिली आहे तुह्मीं?

हिंमत०—युक्ति येवढीच कीं, त्या हरामखोर गुलामानं मला असं सांगितलं आहे कीं, तुह्मांला माझ्या आईकडून बोलावणं पाठवून घरीं न्यायचं, अन् आमच्या इथं तुह्मी आलांत कीं तुह्मांला युक्तिप्रयुक्तीनं विषप्रयोग करून ठार करायच्या. यावर मीं अशी युक्ति काढली आहे कीं तुह्मी मेल्याची कंडी उठवून मी तुह्मांला माझ्या दिमतींतले विश्वासूक सेवक देऊन ह्या कानाचं त्या कानाला देखील न कळूं देतां रामरायांकडे नेऊन पोंचवायचं अन् मग पुढें आपण काय करायचं तें करूं त्यांच्याच सल्लच्यानं.

पद्मा०—हें सगळं खरं. पण हिंमतराव हें पहा मला कीं नाहीं सध्यां तरी कृष्णरायाला सोडून जाऊं नये सारखं वाटतं. मला दोन तीन चमत्कारिक स्वप्नं पडल्यापासून माझ्या मनाची स्थिति फार चमत्कारिक झाली आहे! (कांहीं सुचल्यासारखें करून) अथवा हें पहा, असंच उठवाना तुह्मी कीं, इकडच्याशीं माझं लग्न करण्यांत तिमराजाचे दुष्ट हेतू असल्याचें, आणि कृष्णरायाला—प्रत्यक्ष मा-

ह्या भावाला—गुलामाकडून विषप्रयोग करून ठार मारण्याचे तिकडचे बेत असल्याचे मला कळल्यापासून माझं त्यांच्यावरचं सारं प्रेम पार आटून जाऊन यापुढं मी त्यांची जन्माची हाडवैरीण बनलें आहें. असं उठविलंत ह्मणजे मग माझ्या मनाच्या अशा स्थितींत मला कृष्णरायाला सोडून दूर राहण्याचा प्रसंग टळेल. अन् इथं राहिल्यानं इथलेही सारे प्रकार कळून येतील. कारण आमचे काका भोजराय कृष्णरायावर फार कडक अम्मल चालवितात. मी मध्यें कांहीं बोललें तर किंचित् नरमतात, पण अशी दोनतीनदां मी मध्यें बोलल्यापासून तर ते मला जसं कांहीं पाण्यांत पाहतात. आजपर्यंत मला असं वाटत होतं कीं याचं कारण माझं हें लग्न हेंच असावं. पण अलीकडे पाहिलं तें चारआठ दिवसांत कांहीं निराळाच प्रकार दिसूं लागला आहे. मग याचं कारण काय असेल तें असो! ह्मणून ह्मणतें कीं, इथून कृष्णरायाला एकटें सोडून आपण जाऊं नये.

हिंमतराव०—मग याला ही तुमचीच युक्ति फार नामी आहे! 'ज्यानं कृष्णरायाला गुप्तरीतीनं विषप्रयोग करायला सांगितलंन् त्याचा अन् माझा संबंध तुटला. कृष्णरायाला विषप्रयोग करविणाऱ्या अधमाला—चांडाळाला धरून कैद करून—इथं विजयानगरांत आणून भरचौकांत—भोजवेशीवर त्याचा शिरच्छेद होईल तरच माझा जीव स्वस्थ होईल.' अशातऱ्हेचे उद्गार तुह्मी ज्याच्यात्याच्याजवळ सवड सांपडेल तेव्हां तेव्हां काढीत जा. ह्मणजे तुमच्याबद्दल कोणालाही संशय बिलकुल यायचा नाहीं. आणि तुह्मांला महाराजांच्याजवळ राहतां येईल. मीही तुह्मी असं असं ह्मणतां ह्मणून सगळ्यांच्याजवळ सांगत सुटतों. त्या गुलामालादेखील असंच भासवितों. आंतलं इंगित त्याला काय कळणार? तर हीच युक्ति, ज्याच्यावर एखादा प्रसंग येतो त्यालाच त्या प्रसंगांतून निभावून जाण्याला अगदीं बिनचुक अशी युक्ति सुचते हेंच खरं. ही युक्ति माझ्या बिलकुल लक्षांत आली नव्हती आणि काय करावं अन् काय नाहीं ह्मणून मी मोठ्या फिकिरींत पडलों होतों.

पद्मा०—हें पहा हिंमतराव, तिकडच्या संबंधानं तुह्मी एका काडीचा देखील संशय घेऊं नका. कृष्णरायावर माझं किती प्रेम आहे हें ठाऊक आहे तिकड. अन् हें ठाऊक असतां स्वारीच्या मनांत भलतीसलती पापबुद्धि उत्पन्न होईल असं मला तरी वाटत नाहीं. ह्मणून ह्मणतें—

हिंम०—त्याबद्दल ह्या गुलामानं तुह्मांला विषप्रयोग करून जगांतून नाहींसं करून टाकायला मला सांगितल्यापासून तरी माझ्या मनांत आतां बिलकुल संशय उरला नाहीं. हे सगळे या गुलामाचेच डावपेंच आहेत. आणि तो लुच्चा तोंडपूजा होयचा शेमुराव त्याचा साथीदार बनला आहे! आपले जामदार मन्याबापू

•यांनीं ती परवांची सगळी हकीगत सांगितलीच असेल तुम्हांला.

पद्मा०—हो, सगळं सांगितलंन् त्यानं. सगळ्या सरदारांत तिकडून कृष्णरायाला विषप्रयोग करण्याविषयीं गुलामाला आंतून हुकूम असल्याच्या कंड्या पिकाविण्याचं त्या शंभ्या मान्यानं—नव्हे त्या मानकाप्यानं—पत्करलंन् आहेन् ह्मणे. राजमुकुटाची दिखील हकीकत तर ऐकलीच असेल तुह्मीं त्याच्याकडून ?

हिंमत०—सर्व ऐकली. त्यांसंबंधानं सगळं कळून चुकलं आहे मला. जामदारखान्यांतली अपार संपत्ति पाहून ह्या हरामखोर गुलामाचे डोळे फिरून गेले आहेत अन् दुसरं काय ? पण रामरायांनीं तरी ह्या असल्या गळेकापू अन् विश्वासघातकी माणसावर कसा इतका विश्वास टाकला?

पद्मा०—एका मनुष्याला दुसऱ्याचं मन जर कळतं तर मनुष्य असं फसतंचना. पण तें कळायला जर कांहीं मार्गच नाहीं तर हें असंच व्हायचं. झाल्यागोष्टीला काय उपाय ? पण तुह्मांला मला एक सांगायचंय—

हिंमत०—काय आज्ञा आहे ?

पद्मा०—आज्ञा कसची? पण हा इथला सगळा प्रकार खड्डानूखडा तिकडे अगोदर कळवा. ह्मणजे तिकडे सावध राहायला बरं पडेल. आणखी ज्यास्त काय सांगूं मी तुह्मांला. तुमच्याकडून होईल ती मदत करा तिकडे.

हिंमत०—त्याबद्दल नको तुह्मांला काळजी. ती सारी व्यवस्था लावतों मी. बरं येतों तर मी. तुम्हांला सांगितल्याप्रमाणं मी त्या गुलामापाशीं बतावणी करतों. तुह्मीही ठरल्याप्रमाणं करा. संशय येण्याला एवढी देखील जागा ठेवूं नका. येतोंच तर मी. [तो जातो.]

पद्मा०—या. (आपल्याशींच) खरंच जगामध्यें नीचलोक आपली स्वतःची खळी भरण्याकरितां दुसऱ्याच्या कसकशा माना मुरगळतात त्याची कल्पना प्रसंगाशिवाय मनुष्याला होणं फार कठीण ! इकडे हा गुलाम ह्या हिंमतरावाला—त्याची जहागीर वाढविण्याचं त्याला आमिष दाखवून—मला विषप्रयोग करून नाहींशी करण्याची कामगिरी सांगतो. अन् इकडे तर हा नेकजात इमानी हिंमतराव मला वाचविण्याकरितां आपले प्राण दिखील द्यायला तयार होतो ! तेव्हां काय ह्मणावं काय ह्या मनुष्य स्वभावाला ? मला वाटतं या राजवैभवाच्या आशेनं आणि अधिकाराच्या हावेनं महत्त्वाकांक्षी माणसं हवीं तशीं भरीं भरून वाटेल तसं तीं दुष्ट आणि साहसाचीं कृत्यें करायला जीं तयार होतात तीं इमानी आणि खऱ्या राजनिष्ठ अशा माणसांचं इमान आणि राजनिष्ठा हीं कसोटीला लावण्याकरितांच. ह्या हिंमतरावाचंच मन तिकडच्या संबंधानं आजपर्यंत किती कलुषित झालं होतं आणि ह्याच्या सांगण्यावरून माझ्याही मनांत किती तर्क

आणि कुतर्क येऊं लागले होते ? पण ह्या गुलामाचीं हीं नीच कारस्थानं कळल्या-मुळं आमच्या दोघांच्याही डोळ्यांत एक प्रकारचं अंजन पोंचून आह्मा दोघांनाही आतां अगदीं चक्क दिसूं लागलं आहे. अलिकडे अलिकडे काकांची अन् त्या गुलामाचीं जीं खलबतं होत होतीं तीं याचसंबंधानं असावींत असं वाटूं लागलं आहे मला आतां. आणि हिंमतरावही पण असंच कायससं ह्मणत होता. आणि काकाही अलिकडे अलिकडे माझ्याशीं जे असं वागतात त्याचंही कारण हेंच तर एकून! अथवा दुसरं काय असणार? (विचार बदलून) हिंमतरावाला इकडी-ल सारी बातमी तिकडे कळवायला सांगितली आहे. तर आपणही एक पत्र लिहून द्यावं त्यांच्याकडे पाठवून, अन् जावं मग कृष्णरायाकडे. काय त्या गुलामाचं कपट! इकडे माझ्या भावाला राज्यावर बसविण्याकरितां त्याला राज्याभिषेक, आणि इकडे मला स्मशानांत पाठविण्याकरितां माझ्या विषप्रयोगाची तयारी! जातें अन् सगळं कळवितें हें लिहून अगोदर. [जाते]

अंक २ रा.

प्र० १ ला

स्थळ–राजवाड्यांतील भोजतिरमलाचा महाल.

भोज०–“ भोजतिरमल, भोजतिरमल, भोजतिरमल, तूं वेडा तर नाहींस, ह्या गुलामावर इतका विश्वास टाकतोस तो? ”असे शब्द माझ्या कानाशीं कोणी गुणगुणत असल्याचा मला भास होतो. पण कोण गुणगुणतें हें स्पष्ट दिसत नाहीं मला. अथवा असं तर नसेल कीं माझ्या या डोक्यांत चाललेले विचार ह्या वातावरणाला कळून एखाद्या वाऱ्याच्या झुळकेसरशीं ते माझ्या हलक झालेल्या डोक्यांतून बाहेर पडून मला जागं करण्याकरितां माझ्या कानाशीं येऊन तर गुणगुणत नसतील? कांहीं असो; ह्या गुलामासंबंधानं आपल्याला फार सावध असलं पाहिजे. कारण रामरायानं मलबारच्या मोहिमेवर जाते वेळीं इथला सर्व कारभार ह्याचे हातीं सोंपविला असतां आमच्या जामदारखान्यांतली अपार संपत्ति पाहून ह्याचे डोळे फिरून, फाटून जाऊन, हा रामरायाविरुद्ध खटपटी करूं लागतो, आणि सर्व अधिकार आपले हातीं असावा अशी जब्बर महत्त्वाकांक्षा धरतो. राज्यकारभार चालविण्याचा याच्या अंगांत वकूब नाहीं असं नाहीं. पण कधीं बापजन्मींही न पाहिलेली ही संपत्ति पाहून याचे डोळे फिरून आज याची सारी अक्कल अगदीं मातीला मिळाल्यासारखी झाली आहे. हा दोन दोन, तीन तीन, तास रात्रीं बेरात्रीं जामदारखान्यांत जाऊन जामदारखान्यांतलं खाशांनीं घालायचं जवाहार आपल्या अंगावर घालून वेड्यासारखा आरशांत पाहत बसतो, ह्मणून जा-

मदार सांगत होता. काल तर आपल्या बरोबर त्यानं तिथं एक औरत आणल्याची बातमी आहे! तेव्हां असल्या मनुष्याचे हातून उद्यां रामराय जर आपलं सैन्य घेऊन एकदम आला तर कितीशी चिकाटी धरवणार? आयत्यावेळीं "सरदारांनीं आणि मीं कट करून कृष्णरायाला गादीवर बसविलें, आपलं कांहीं त्यांत अंग नव्हतं." असं जर हा रामरायाकडे जाऊन सांगूं लागला तर हा एवढा व्यूह आणि हें कारस्थान रचून जी ही राज्यक्रांति घडवून आणली तिचा उपयोग काय? शिवाय रामरायाचे वेळीं कृष्णरायाचा पालक मीच होतों आणि आतांही मीच आहें. तेव्हां ही सगळी उलथापालथ केली खरी, पण ह्याच्यापासून मीं आपला फायदा असा काय करून घेतला? तर असं नाहीं उपयोग. जामदार खान्याची आफरातफर केल्याचा याच्यावर आरोप आणून या गुलामाचीच इथून उचलबांगडी केली पाहिजे. म्हणजे अनायासेंच सगळा कारभार आपले हातीं येईल. मग पुढचं पुढं पाहतां येईल. (विचार करून) छेः, पण ह्याला ह्या जगांत जिवंत देखील ठेवून उपयोग नाहीं; कारण पुढंमागं याची बुद्धि फिरून ह्यानं ह्याच्या अन् माझ्यांत झालेलीं खलबतं जर बाहेर फोडलीं तर नसतं विघ्न ओढवून माझ्या प्राणावर येऊन बेतायचं. हा ठाम आणि निश्चयी बुद्धीचा असता, तर मग नसती मीं इतकी फिकीर केली. ह्याच्याच तंत्रानं जाऊन एक दिवस नाहीं एक दिवस तरी ह्याच्याकडून मीं आपला डाव साधून घेतला असता! पण हा पडला अनिश्चयी आणि ज्या बाजूचं वारं दिसेल त्या बाजूनं जाणारा. तेव्हां ह्याच्यावर विश्वासून उपयोगी नाहीं. इतकंच नव्हे, पण ह्याला जिवंतही राहूं देऊन उपयोगी नाहीं. पण ह्याला काय करावी तोड? शंभूराव माने म्हणजे एक लाख्या माणूस आहे. त्याच्याचकडून जर हीहि कामगिरी उरकली तर बिनबोभाट उतरेल. पण तो जरा मित्रा आहे. अथवा असं करावं, हा गुलाम रामरायाला आंतून फितूर आहे आणि आपल्या विरुद्ध खलबतं करण्यांत कोण कोण पुढाकार घेतात हें पाहण्याकरितां खुद्द रामरायाचा हाकारा आहे, असं उठवून झाडून साऱ्या सरदारांचा करावा गैरसमज, आणि हा फितुरी आहे असं ठरवून ह्याला भर मध्यान्हीं भोज घेशींत नेऊन ह्याचा शिरच्छेद करवावा!

[इतक्यांत घाबऱ्या घाबऱ्या पद्मावती येते]

पद्मा०—काका, काका, ह्या गुलामानं कृष्णरायाला—तो लहान म्हणून—वाटेल तें बोलावं, वाटेल तसं दडपावं, वाटेल तसा त्याचा अपमान करावा, आणि छडी घेऊन त्याच्या अंगावर धांवत जाऊन त्याची पाठ दिखील फोडावी ऑं! त्याचा एक जकूं दे—पण हा विजयानगरच्या गादीचा आणि राजवंशाचा अपमान नव्हे कां? कोण बाई हरामखोरपणा हा! आणि इतकं सारं होत असून तुह्मी कशी अशी

डोळेझाक करतां? का तुह्मांला यांतलं कांहीं दिसत नाहीं अथवा तुमच्या कांहीं कानावरच येत नाहीं? अहो काका, पहिली नव्हे, दुसरी नव्हे, तिसरी खेप ही!

भोज०—(साश्चर्य) काय म्हटलंस? त्या गुलामानं राजा कृष्णरायाची पाठ फोडलीन्!

पद्मा०—अहो कारण कांहीं नाहीं. बाबांचा शिरपेच ह्या गुलामानं आपल्या मंदिलांत खोंचलान् तें पाहून कृष्णराय ह्मणालाः—" हा घालून तुह्मीं माझ्या बाबांचा अन् त्यांच्या बरोबर या विजयानगरच्या गादीचा अपमान करितां;" ह्मणूनच हा सारा गहजब अन् दुसरं काय!

भोज०—(आपल्याशीं) पोर पाणीदार दिसतो! (उघड) आणखी काय ह्मटलंस, तुझ्याही अंगावर हा हात टाकणार होता नाहीं का?

पद्मा०—ज्या छडीनं त्यानं कृष्णरायाला मारलंन् तीच छडी उगारून तो काळासारखा माझ्या अंगावर धांवला. मीं एवढंच ह्मटलं त्याला कीं लहान आहे तो त्याला काय समजतं. एवढ्यावरून अशा—

भोज०—चल, चल. तिकडेच जाऊं आपण.

[जातात. पडदा पडतो.]

पडदा वर जातो. आंत क्रुद्ध झालेला गुलाम व शंभुराव उभे आहेत; जवळ कृष्णराय व एक त्याच्याच वयाचा मानकऱ्याचा मुलगा उभा आहे, असा प्रवेश.

गुला०—दहा उठाबशा काढ आणि पांच तोंडांत मारून घे. आणि तोंडानं 'चुकलों, पुन्हां असं करणार नाहीं.' असं ह्मण; तेव्हां तुला सोडीन. नाहींतर फोडून काढीन तुला. तूं काय समजला आहेस?

शंभू०—अलबत्—लहानपणीं ही अशी शिक्षा लावलीच पाहिजे मुलांना. [पद्मावती व भोजराय आडून ऐकत आहेत.]

पद्मा०—ऐकलंत, ऐकलंत काका—कसं एकेरी बोलताहेत पहा. आणि हें सारं नोकरचाकरांच्या देखत!

भोज०—शुः, चप्प रहा जरा. पाहूं दे हा कुठपर्यंत मजल पोंचवितो आहे ती!

गुलाम.—दहा मोजायाच्या आंत उठाबशा काढल्यास तर बरं आहे. नाहींतर ह्या उदाजीरावाकडून कान धरून काढवायाला लावीन. दहा अंक मोजण्याचा अवकाश दिला आहे. एक, दोन, तीन,—पहा नीट विचार कर—चार, पांच.

शंभू०—(कृष्णरायास) तुमचं तरी काय जातंयू? काढा उठाबशा अन् आटपा झालं. हे तुह्मांला आज तुमच्या वडिलांच्या ठिकाणीं आहेत—

पद्मा०—काका? ऐकलंत हा मान्या काय ह्मणतो तें?

गुलाम—हं; सहा-सात-अजून ऐकसात-आठ-अजून नाहीं जात कुरी? ठीक आहे!-नऊं-दहा-बस्स भरलं माप! 'उदाजीराव त्याचे कान धरून' त्याला दहा उठाबशा काढायला लावा—नाहींतर उ-

ठाँबशांबद्दल त्याच्या पांच तोंडांत भडकावा.–अजून नाहीं वठणीवर येत! (राजपुत्रास) नीट गोडीनं सांगतों, अजून उठाबशा काढ अन् आपल्या हातानं पांच तोंडांत मारून घे, तरच सुटशील, एरवीं नाहीं.

शंभू०–केव्हां तरी करावं लागणार खरं, मग व्यर्थ उशीर करण्यांत काय अर्थ? चला, आटपा—

कृष्ण०—माझे प्राण घेतलेत तरी देखील ही गोष्ट नाहीं घडायची माझ्या हातानं. प्रत्यक्ष माझ्या बाबांनीं देखील नाहीं कधीं मला असली शिक्षा केली!

शंभू०—पण तुमच्या हिताकरितां आहे नाहीं–

गुला०—उदाजीराव, बघतां काय असं भेकऱ्यासारखं? धरा कान, आणि काढवा उठाबशा, कां तुह्मीही मागं पुढं पाहतां?

उदा०—दिवाण साहेब, ही एवढी गोष्ट तुह्मीं मला सांगूं नयेत आणि मीं ऐकूं नये.

गुला०—(छडी उगारून) काय? मीं सांगू नये आणि तुह्मीं ऐकूं नये? असं! तुह्मी मला शिकवायला लागाल असं नव्हतं वाटलं मला. बरं आहे तर, (कान धरावयास जातो. तो उदाजीराव चुकवितो, त्याचा हात धरून) चुकवा, चुकवा. उपटतां कीं नाहीं त्याचे कान?

उदा०–(मानेनें नाहीं असं खुणावतो)

गुला०— बरं आहे तर. त्याच्या उठाबशांबद्दल तुह्मांलाच घ्या हें अगोदर बक्षिस.

शंभू०—तुम्हांला तरी हें योग्य नव्हें. दिवाण सांगताहेत तें मुकाट्यानं ऐका.

उदा०–साफ ऐकणार नाहीं. भलतंच सांगितलं तर कोण ऐकेल?

गुला० भलतंच?

शंभू०—काय भलतं काय आहे त्यांत?

गुला०–(उदाजीस धरून त्याचे कान उपटतो.)

कृष्ण०–त्यांना कां उगीच? (पुढं जाऊन)

गुला०–त्याची कींव करतोस काय? तर तुलाच घे हें. (छडी मारतो).

[इतक्यांत भोज व पद्मावती पुढें होतात.]

भोज०–दिवाण साहेब, काय आरंभलं आहे काय हें? साऱ्या नोकरमाणसांच्या देखत काय बाजार माजिवला आहे तुह्मीं हा? विजयानगराच्या गादीच्या मालकावर तुम्ही बेमुरवतपणें असा हात टाकतां? तुमचं काम नव्हे हें! तुह्मी आपलं काम पहा. राजांना शिक्षा लावायचं काम माझं आहे, तुमचं नव्हे.

शंभू०—(एकीकडे) आतां मात्र जरा चमत्कारिक प्रसंग आहे खरा. (उघड) हें तर उघडच आहे पण प्रसंगविशेषीं एखादवेळेस गैरवर्तन दिसल्यावर जर—

गुलाम०–(कोधानें लाल झालेला भोजतिरमलास) काकासाहेब ह्या बे-

ळीं तुम्हांला इथं येण्याची पंचाईत! ह्या वेळीं ह्या गुलामाकडून तुमचा देखील नाहीं मान राहणार. ह्याच्या अंगावर मी पांच छड्या फोडीन तेव्हांच स्वस्थ राहीन. (स्वगत) ही पद्मावती जाऊन भोजांना घेऊन आली आहे! ठीक आहे.

भोज०—अस्सं! (दांत ओंठ चावून) कोण आहेरे तिथं? गणोजी, मानाजी, ह्या हरामखोराला कैद करून याच्या मुसक्या बांधा. (४।६ हत्यारबंद शिपाई गुलामाला कैद करूं पाहतात.)

गुला०—(तरवार उपसून) पुढं तर या कीं खूनच पाडीन इथं एकेकांचे.

भोज०—(तरवार उपसून पद्मावतीस) तूं कृष्णरायाला आणि उदाजीरावाला घेऊन आंत जा. इथं नको उभी राहूं.

शंभू०—खरंच, आंत जा तुम्ही राजांनाही घेऊन जा. दिवाणांचं वर्तन थोडं फाजीलच झालं खरं.

उदा०—तरी पण शिक्षा पाहिजे होती नाहीं? (हंसतो)

शंभू०—उदाजीराव, तुम्ही अजून लहान आहांत.

उदा०—अन् तुम्ही थोर आहांत! [व सर्व शंभूरावाकडे पाहून हंसत जातात.]

शंभू०—(आपल्याशीं) या शिपायांनीं तर तरवारी उचलल्या. याचा परिणाम काय होईल समजत नाहीं. पण मला वाटतं गुलामाची दिवाणगिरी संपली आतां.

भोज०—बघतां काय? त्याची काय माय व्याली आहे? व्हा पुढें आणि तरवार घ्या काढून अगोदर. (शिपाई पुढें जातात. एकावर तो वार करितो व दुसरा शिपाई गुलामाचा हात धरून तरवार काढून घेतो व त्यास कैद करतात.) आज माझा देखील जो तूं बेगुमान अपमान केलास ह्याचं तुला योग्य प्रायश्चित्त मिळेल. जारे त्याला घेऊन कैदखान्यांत!

शंभू०—दिवाणसाहेब, निदान काकासाहेबांचा तरी तुम्हीं असा अपमान करायचा नव्हता!

गुला०—काकासाहेबांचा तरी अपमान करावयाचा नव्हता! उगीच बस्स, मी नांवाचा गुलाम आहें. सूड-सूड घेईन याचा. तुमचं सगळं कारस्थान आणि भिंगः-

भोज०—बस्स, वटवट पुरे कर. नांवाचाच कां तूं खरोखर गुलाम आहेस! हंः सूड घेणार काय? (शिपायास) चला, जा घेऊन त्याला तुरुंगांत. बाळोजी रावांना इथं घडलेला प्रकार सांगा. अन् ह्याची चांगली बडदास्त ठेवायला सांगा तिथं. मागोमाग हुकूमही देतोंच पाठवून.

[जातात.]

शंभू.—मला वाटलंच होतं पहिल्यापासून कीं एखादादिवशीं असा प्रसंग येईल म्हणून! पहिल्यापासून हा मगरूर. रामरायांनींच त्याला फार शेफारून टाकला होता. दुसरं प्रत्यक्ष राजांच्या चुलत्यांचा असा अपमान म्हणजे

कोण हरामखोरपणा हा ! पहिल्यान्दांच त्यानं जेव्हां तुम्हांला बेगुमान जबाब केलान्, त्याच वेळेला (तरवार उपसून) इथल्या इथं छाटणार होतों मी त्याची गर्दन. पण म्हटलं खुद्द राजवाड्यांत नको असला प्रकार, आणि तें आपल्याला दिखिल कदाचित् रुचलं असतं नसतं; म्हणून गम खाल्ली.

भोज०—मला ठाऊक आहे पहिल्यापासूनच हरामखोर आहे तो.

शंभू०—आणखी आपल्याबद्दल जर कोणी चांगले उद्गार काढले, तर त्या हरामखोराला ते खपत नसत मुळीं देखील. प्रत्यक्ष विजयानगरच्या गादीचा शिरपेंच आणि मुकुट ह्या हरमखोरानं आपल्या डोक्यावर घालणें ह्मणजे कोण साहस ?

भोज०—(साश्चर्य) काय म्हटलंत? ह्या हरामखोरानं विजयानगरच्या महाराजांचा मुकुट आणि शिरपेंच आपल्या डोक्यावर घालून भ्रष्ट केलान् !

शंभू०—हो हो-मग आतांशा इतकं जामदारखान्यांत जाऊन काय चाललंय् !

भो०—[सुस्कारा टाकून] वः ! तर अशा नराधमाचा शिरच्छेदच केला पाहिजे. या तुह्मी आतां.

शंभू.—मी तरी तेंच ह्मणतों. त्याचा शिरच्छेद होऊन आपल्या हातीं सगळा राज्यकारभार यावा अशी माझीच काय, पण विजयानगरच्या सगळ्या सरदारांची इच्छा आहे. माझ्या मनांत फार दिवसांपासून आहे कीं, खुद्द आपल्याजवळ राहून कांहीं सेवाचाकरी करून दाखवावी, ह्मणजे चीज होईल आपल्या कर्तबगारीचं. अन् तसा योग आतां आला आहे असं ह्मणायला कांहीं हरकत नाहीं.

भोज०—अगोदर याचा काय तो निकाल लावूं, आणि मग पुढचं पुढं. या, या तर आतां.

शंभ०—येतों तर. काकासाहेबांचं हित चिंतायचं हेंच मी आपलं कर्तव्य समजतों. येतों तर. मात्र या गरीब सेवकावर मेहेर नजर असावी. इतकीच विनंति आहे. येतों तर. [जातो.]

भोज०—(आपल्याशीं) एकंदरींत माझ्या सरदारांचं माझ्यावर प्रेम आहे तर. ही एक गोष्ट बरीच आहे ह्मणायची. तो गुलाम जातां जातां काय म्हणाला कीं, "सूड—सूड घेईन !" अगोदर तुरुंगांत जा अन् तिथून घे ह्मणावं कसा काय सूड घेतोस तो ! आजचेआज दरबार भरवून सगळ्या सरदारांच्या सल्ल्यानं उद्यां ह्या वेळेच्या आंत तुला ह्या जगांतून हांकलून देतों. मग कसा घेणार तूं माझा सूड ! जातां जातां तो "तुझं सारं कारस्थान आणि बिंग बाहेर काढीन." असं एकेरीवर येऊन कायसंसं पुटपुटला. पण ह्या पुटपुटण्यापलीकडे ह्याची मजल जाऊंच दिली नाहीं ह्मणजे झालं ! पद्मावती ह्मणाली कीं, हा आपल्या अंगावर हात टाकणार होता. सगळ्या सरदारांचीं मनं देतों भरवून कीं, गुलाम पद्मावतीला भ्रष्ट करण्याचा प्रयत्न करीत होता. ह्मणजे

त्यांच्याकडूनही मग नाहीं कसली आडकाठी यायची. अन् आपला बारही फार जोराचा भरला जाईल! बस्स हीच युक्ति! आतां अगोदर जाऊन त्या तुरुंगावरच्या बाळोजीरावाला गुलामाच्या व्यवस्थेसंबंधानं हुकूम देतों: अन् आज दरबार भरविण्याबद्दल सगळे सरदार–मानकरी– आणि मुत्सद्दी यांना निमंत्रण करवतों.

[जातो.]

प्र० २ रा.

राम०–(पत्र वाचित आहे.) "तुमची बायको, तुमची पट्टराणी, तुमची आराध्य देवता, जिला तुम्ही आपला जीव कीं प्राण समजत होतां, ती तुमची लाडकी–प्यारी–पट्टराणी–पद्मावती–ज्याअर्थी कृष्णरायाला—आपल्या भावाला—गुलामाकडून विषप्रयोग करवून त्याला ठार करून त्याच्या राज्याचा अपहार करण्याचे तमचे दुष्ट बेत चालले होते, त्याअर्थी यापुढें तुमची जन्माची हाडवैरीण बनलें ह्मणून विजयानगरभर सगळ्यांना सांगत सुटली आहे! दुर्दैवानं तुमच्याशीं तिचं जरी लग्न झालं आहे तरी यापुढें ती आपला नवरा मेला असं समजून राहणार! तिनं आपल मंगळसूत्र तोडून टाकून हातांतील बांगड्या वाढवून घेऊन, कपाळाचं कुंकूं देखील पुसून टाकलं आहेन्, ह्मणून आफवा ऐकतों. अन् त्या खोट्या असतील असेंही वाटत नाहीं!" 'आफवा'! आफवा कसल्या ह्या! मला तर असं वाटतं कीं, हें अक्षरशः खरं असेल! अरे, अरे, अरे, अरे! (कपाळावर हात मारून घेऊन) रामराया, कशाला–जन्माला तरी कशाला आलास तूं? अथवा बाबांनींच जर ह्या राजकन्येशीं माझं लग्न नसतं केलं तर आज हें असं दुःख करण्याचा प्रसंग कां आला असता? आमच्या लग्नाचा परिणाम असा होईल हें ह्या वेळपर्यंत माझ्या लक्षांत आलं नव्हतं! हिच्या बापाला बाबांनीं विषप्रयोग करून ठार मारल्याची बातमी हिच्या कानावर एवढीशी देखील जाऊं नये ह्मणून मीं किती खबरदारी घेतली? त्यासंबंधानें मी किती सावध राहिलों? विजयानगर सोडून इकडे येतांना देखील तिथला मी सारा बंदोबस्त करून आलों होतों. पण तें त्या हरामखोर गुलामाच्या दगलबाजीनं सारं व्यर्थ झालं; आणि हें सारं अशा थराला येऊन पोंचलं! तेव्हां दुर्दैव माझं अन् दुसरं काय? राजकन्येशीं माझं लग्न झालं ह्मणून मला एक प्रकारचा अभिमान आणि गर्व वाटे! आणि तिचं माझ्यावरील तें निष्कपट प्रेम आणि तिची ती गोड आणि प्रेमळ वागणूक पाहून मला किती तरी आनंद होई! पण आतां काय त्याचं? तेंच सगळं माझ्या दुःखाचं कारण झालं आहे! तिच्याशीं माझं लग्न झाल्यामुळें इतर सरदारांना मीं जुमानलें नाहीं. एवढंच नव्हे, पण प्रसंगीं मीं त्यांचा धिक्कार करून त्यांचा अपमान देखील केला; आणि तो केवळ राजवंशांतील रा-

जकन्येशीं माझं लग्न झालं आहे ह्मणून गर्वानं ताठून जाऊन! एकंदरींत गर्वाचं घर खालीं ह्मणतात तें कांहीं खोटं नव्हे तर! माझ्या तरी आज हें पक्कं अनुभवास येऊन चुकलं! "स्वप्नांत तूं राणी झाली आहेस असं मीं पाहिलं." असं ह्मटल्याबरोबर ती काय चपापली! मला वाटतं त्याचवेळीं तिला माझ्या संबंधानं पहिल्यानंदां संशय आला! त्या वेळचं तिचं तें चपापणं अन् ती कावरीबावरी मुद्रा अजून जशीच्या तशी माझ्या डोळ्यांपुढं उभी राहते! बाबांनीं आपल्या प्राणोत्क्रमणसमयीं काढलेले उद्गार-"विजयानगरच्या गादीवर तुला बसलेलं पहाण्याची एकच माझी इच्छा राहिली आहे, तेवढी तूं पुरीव, तोंपर्यंत मी मेलों तरी माझे प्राण इथं घोंटाळत राहतील."-हे उद्गार माझ्या पुढच्या आयुष्यांतील वर्तनक्रमाला आधारभूत होणार होते! पण प्रियेच्या-छेः प्रिया कसली आतां? ती तर आतां मला आपला जन्माचा कट्टा हाडवैरी समजते, पण मी मात्र शेवटपर्यंत तिला आपली प्रियाच समजणार! मग कांहीं होवो माझं! (सुस्कारा टाकतो) तिचं कृष्णरायावरील-आपल्या भावावरील-तें अलौकिक प्रेम पाहून मी माझ्या दुष्ट मनांत येणाऱ्या खुनी आणि भयंकर विचारांना जागच्या जागीं दाबून टाकून तिच्या उज्ज्वळ आणि निष्कपट प्रेमाच्या प्रीतिराज्यांतल्या दिव्य व आरक्त तक्तावर बसन तिथला मी अभिषिक्त राजा आहें, असें मानीत होतों. पण आतां काय, तिथून देखील तिनं-छेः तिनं कसचं माझ्या दुर्दैवानं मला हुसकून लावून मला भ्रष्ट करून-पदच्युत करून-एक यःकश्चित् भिकारी-कंगाल भिकारी-करून सोडलं आहेन्! अहा रे दुर्दैवी रामराया! आतां तुला हें ताठ्याचं अन् मानाचं नांव पाहिजे कशाला! सोडून दे हें तूं नांव आणि बन एखादा भिकारी-(एकदम विचार सुचून विचारयुक्त होऊन) अथवा हुजऱ्या बनून, वेष पालटून, मी जर तिच्या तैनातींत राहिलों तर-छेः, पण साधणार कसं हें मला! आणखी धीर धरून इतकंही साहस करून गेलों मी, आणि कांहीं युक्तिप्रयुक्ती करून तिची गांठ घेतली, तर काय-होणार काय त्यापासून? तिचं मन पालटावं कसं? कारण वरून दिसण्यांत तरी सगळ्याच गोष्टी तिला-तिलाच काय पण कोणालाही-मला स्वतःला देखील-उघड उघड माझ्या विरुद्धच दिसणार! अथवा असं केलं तर! तिच्या नांवानं अगोदर एक पत्र पाठवून द्यावं. मग आपण तिला जाऊन भेटावं! असं केल्यानं काय होईल? (पत्र पुनः पाहून) असं केल्यानं काय होईल? काय होणार! जिनं मी मेलों असंच समजून आपलं मंगळसूत्र तोडून, बांगड्या वाढवून, कुंकूं देखील पुसून टाकलंन्, ती माझ्या पत्राला काय मान देईल आणि त्याच्यावर कितपत विश्वास ठेवील हें उघडच दिसतंय्! तरी पण मनुष्याची आ-

शा तुटतां तुटत नाहीं. (पत्र वाचतो) " हिंमतराव देखील अशाच कंड्या पिकवतो. तुमच्या विरुद्ध त्याच्या तोंडून जे एकेक तारे तुटतात त्याला ताळ ना तंत्र. त्याचें अन्–तुमचा शरमिंध आहे मी ल्याहायला, पण इथला सगळा प्रकार मी जर तुमच्या कानावर घालीन तर या पुढें इथं आणखी काय काय प्रकार ओढवतील तें कांहीं लिहितां येत नाहीं मला पत्रीं. हिंमतरावाचीं अन् पद्मावतीचीं खलबतं होतात. " (ओंठ चावून) त्या हिंमतरावाचीं खलबतं ! आणि तीं या रामयाच्या बायकोशीं ! यापेक्षां माझं एखाद्या भिकाऱ्याच्या पोरीशीं लग्न झालं असतं तर आज मी किती आनंदांत असतों ! (पत्र पाहून) " खलबतं होतात, ह्मणून राणीवशांतली ती मंजुळा दासी सांगत होती ! हें लिहिणार नव्हतों मी आणि लिहायला माझा हात देखील वहात नव्हता. पण पुढं मागं इस्तकबील हकीकत न लिहिल्याबद्दल मला शब्द लागेल ह्मणून लिहिणं भाग पडलं. " (पत्र वाचल्यावर) मग कुणी सांगितलं होतं तुला लिहायला? मंजुळेकडची बातमी ही! मग खोटी कशी असणार ती ! मनुष्याचं एक नशीब फिरलं ह्मणजे सारं फिरतं असं ह्मणतात तें कांहीं खोटं नव्हे तर एकून. विजयानगर सोडून मी कोणत्या मुहूर्तावर बाहेर पडलों तें मला समजत नाहीं ! तें सोडल्यापासून हा वेळपर्यंत मला बहुतेक अपयशच येत गेलं, आणि आतां तर खुद्द माझें विजयानगर, माझे आप्त, आणि माझ्या ताटाखालचे सारे सरदार लोक पार उलटून जाऊन माझा नायनाट कसा होईल ह्मणून अगदीं टपून बसले आहेत ! हें सारं मला पत्करेल. पण जिच्याशीं माझं लग्न झालं, जिचा हात मोज तिरमलानं आपल्या हातानं माझ्या हातांत दिला न्, तिनं मी जिवंत असतां आपलं मंगळसूत्र तोडून, आपल्या बांगड्या वाढवून आणि आपलं कुंकूं पुसून टाकून माझ्या बाबांच्या प्रतिस्पर्ध्याच्या–प्रतिस्पर्ध्याच्या कांहाडवैऱ्याच्या पोराशीं खलबतं सुरू करावींत यासारखी मला लाजिरवाणी गोष्ट कोणती आहे दुसरी ! धिक्, धिक्, माझा जन्म ! (पत्र फाडून टाकून) जा, जा, या चिठोऱ्याबरोबरच तिच्यावरील माझी प्रीतीही उडून गेली ! आतां दुसरं तिसरं जरी माझ्या हातून कांहीं झालं नाहीं तरी मी वेषांतर करून अथवा काय पाहिजे तें करून विजयानगरांत जाणार आणि पहिल्यानं त्या गुलामाचा, अन् मग त्या हिंमतरावाचा अन् त्या जारिणीचा असे दोघांचेही आपल्या ह्या हातांनीं खून पडणार ! (जाऊं लागतो.)

(इतक्यांत खंडू हलकारा पत्रें आणून देतो ; त्यास—कोण कुठला रे तूं ! काय आहे बातमी !—

खंडू—माजं नांव खंडू हलकऱ्या. मी धनगरवाडींचा ऱ्हानारा.

राम०—धनगरवाडीचा ऐस नाहीं तर मसणवाडीचा ऐस ! पण आतां आ-

लास कोटून तूं ! आणखी पत्रंबित्रं कां हीं आणलीं आहेस कां !

खंडू—आतां सांगाल तर मी आलों—कुसुंब्याहून—

राम०—कुसुंब्याहून ! कुसुंबा पिऊन आला आहेस वाटतं ? नीट सरळ उत्तर द्यायला काय झालं तुला ? पत्रंबित्रं आहेत का कांहीं ?

खंडू—व्हय, हैत कीं. (पत्रें काढून) इजयानगरच्या हिंमतरावांनीं बजावूनशेनी दिलीं हैत हीं. माझ्या हातामंदीं देऊनशेनी त्ये सांगाले "स्येका खंड्या, जर का दुसऱ्यातिसऱ्याच्या हातामंदी गेलीं तर येडछतं व्हईल. न्येमकी रामरायांच्या हातामंदीच जाऊं द्येत." (पत्रें देतो.)

राम०—[पत्रें घेऊन) काय ! हिंमतरावाकडून मला पत्रें ? ह्मणजे सगळंच विचित्र ! मला वाटतं त्या जारिणीचीं आणि त्याचीं खलबतं होतां होतां तिनं मी जिवंत असतांना त्याच्याशीं पुनः लग्न लावून माझी हेंटाळणी करण्याकरितां तर नसेल ही युक्ति केली ! [पत्रें फोडून] काय ह्यांत पद्मावतींचं पत्र ! (वाचण्यांत गर्क होतो)

खंडू—(आपल्याशीं) काय ह्मनं धनगरवाडीचा ऐस न्हे तर मसनवाडीचा ऐस ! इचीभन् मसनवाडीला इकुल्या लौकर कशा पायीं ? जिमला काई हाडबीड नग का मानसाच्या ! साट बी वर्सं न्हे झालीं माझ्या उमरीला अजूनशेनी, अन् म्हनं म्हसनवाडीला जा. जा म्हून कोन जातोय, अन् ये म्हून कोन् येतोया दुनयेमंदी ? जवा का त्या यमाजीरावाच दूत येत्यात तवा आपसूकच समद् जातात. शेनवड्याहून शेनी यायचं अन् मसनवाडीला जायचं ! त्येच्या शिवाय गत कुट है मानसाला !

राम०—अरे हा इथंच आहे कीं अजून ! (उघड) अहो खंडबा, तुह्मी बाहेर बसा अंमळ. सुभानबा, (सुभानबा येतो.) या खंडबाची नीट व्यवस्था लावा. हें पहा सुभानबा, विजयानगराहून पत्रें घेऊन दौडत आला आहे हा. आमचा मुक्काम बदलल्यामुळें त्याला लौकर येतां आलं नाहीं. याच्या दुधाची अन् कुसुंब्याची नीट व्यवस्था लावा. पुनः याला पत्रें देऊन उद्यां परत पाठवायाचं आहे. खंडबा, हीं पत्रें घेऊन आल्याबद्दल हें घ्या तुह्मांला बक्षीस–(सलकडें देतो.)

खंडू०—नग, नग. हें कशापायीं म्हाराज ! मी तर म्हसनवाडीला जानार अन् तथं हे न्हेऊनशेनी करूं काय ह्याचं ? अन् संबाळनार कोन् अन् कसं याला ?

राम०—(हंसून) खंडबा, अहो त्या वेळेस मीं तुह्मांला तसं ह्मटलं ह्मणून मनांत नका आणूं त्याचं कांहीं. पत्र न आल्यामुळें मी जरा फिकीरीत होतों अन् तुह्मीं तर अगदीं ओढून आणलं होतंत, त्यामुळें माझ्या तोंडांतून तसे शब्द गेले—

खंडू०—मग मी काय सांगतों स्येचं ? (हंसून) बसतों मी भाईर ! चला सुबा-

नवा. पैल्यापैल्यांदा मानूस जरा कडक अन् गरम असतं, अन् मागूनशेनी तवाच तडक येतं अक्शी नरम अपसुकच ! (ते जातात).

राम०—एकंदरींत "कृष्णरायाच्या जवळ राहण्याकरितां मला ही युक्ति करावी लागली. तिकडच्या संबंधानं हिंमतरावाचं मन देखील आजपर्यंत अगदीं संशयी होतं. पण त्या गुलामानं मला विषप्रयोग करून ठार करण्याची नाजूक कामागिरी जेव्हां त्यांना सांगितलीन् आणि ती बजाविल्यास आहे त्यापेक्षां मोठी सरदारी देण्याची लालूच दाखविलीन्, तेव्हां चक्कन् त्यांच्या डोक्यांत प्रकाश पडला, अन् मग गुलामाचे अन् काकाचे सगळे डावपेंच त्यांना कळूं लागले." एकूण हिंमतरावाची राजनिष्ठा या वेळीं माझ्या उपयोगीं पडली तर ! हिच्याशीं जर माझं लग्न झालं नसतं तर मला उलथून पाडण्याकरितां विजयानगरच्या सरदारांनीं जो कट केला आहे, त्या सरदारांचा खास हा पुढारी होता ! केवळ या राजकन्येमुळें आज माझा कट्टा दुस्मान माझा पक्का दोस्त बनला. तेव्हां या पुढें आपले ग्रह फिरले ह्मणायचें ! ही आणखी लिहिते कीं, "आमच्या या अशा वागण्यानं तिकडच्या संबंधानं कोणाकोणाचीं मनं कशीं आहेत तें वाड्यांत बसल्या बसल्याच समजतें." कां नाहीं समजणार ? आणि त्यांतून तुझ्यासारख्या बुद्धिमान आणि चाणाक्ष स्त्रीच्या तर हें तेव्हांच यायचं दृष्टोत्पत्तीला. ही लिहिते कीं,—"हिंमतरावाकडे आज्ञा पत्रं पाठवावीं ह्मणजे मला पोंचतील. थेट मलाच आलीं तर संशय घेईल कोणी उगीच. गुप्त हेर आणि तोंडपुज्या दासी पुष्कळ आहेत इथं इकडचं तिकडे आणि तिकडचं हिकडे करून लावालावी करायला ! काकींचं बरीक माझ्यावर प्रेम आहे. अन् विजया माझ्याशीं प्रेमानं वागते. काकांच्या डोळ्यांत मात्र मी सलत आहें जशी ! ह्मणून ह्मणतें या राजवाड्यांत राहण्यापेक्षां आपल्याबरोबर स्वारीशिकारींत—रानावनांत—राहिलेलं पुरवेल मला. पण कृष्णराय अजून लहान आहे. त्याला इथं कोणी बरं पहात नाहीं. अन् ह्मणूनच त्याला इथं एकटा सोडून जायला माझा पाय निघत नाहीं इथून." अहाहा ! किती प्रेमळ उद्गार हे ! इकक्या प्रेमळ अंतःकरणाची मला मात्र अजून परीक्षा नाहीं हेंच खरं ! कारण मी एका घटकेच्या पूर्वी त्या विश्वासरावाचं तें पत्र वाचून ह्या सद्गुण मंजिरीवर अन् ह्या दिलदार हिंमतरावावर भलतीच आग पांखडून स्वतः विजयानगरला गुप्तपणें जाऊन त्यांचे खून पाडणार होतों ! हीं पत्रं जर आज न येतीं तर यापुढें कोण निष्कारण भयंकर. प्रसंग ओढवता माझ्या हातून ? अन् मी काय काय करायला उद्युक्त झालों असतों ! असो, परमेश्वर जें जें करतो, तें मनुष्याच्या बऱ्या-

करितांच करितो, हेंच खरं. एरवीं हिंमतरावासारखा माझा कट्टा दुस्मान माझा पक्का दोस्त होणं हें माझ्या स्वप्नीं दिखील नव्हतं आलं कधीं! मला वाटतं विजयानगरच्या सरदारांत फूट पाडायला हीच वेळ उत्तम आहे. आतां अगोदर हिंमतरावाला पत्र लिहितों. अन् त्याच्यावरच देतों सगळा विश्वास टाकून. ह्मणजे विजयानगराकडे मला मग बघायाला नको. दुसऱ्यावर आपण आपला विश्वास टाकल्याशिवाय तो तरी काय ह्मणून टाकील आपल्यावर? अन् मग इकडे ह्या जमेदार यशवंतरावाचं पाहून घेतों मी. व्यंकटाद्रीला एतगीर आणि मुदगल हे किल्ले, आणि यलतम राजाला रायचूर आणि बागलकोट हे किल्ले राजीचे मोर्चे लाऊन एकदम हल्ले करून सर करायाला सांगतों. माझ्या पाठीवर हात देऊन आले आहेत. ते कांहीं कसूर नाहीं करणार शत्रूला खामखा गांठून त्यांची दम छाट करयाला! शत्रूशीं कजाखी करून, त्यांची अशी दमछाट करून मग आह्मी तिघेजण एकदम आपल्या ढाला विजयानगराकडे वळिवतों, ह्मणजे तिथले सगळे सरदार जागच्या जागीं थिजून जाऊन त्यांचा कट आपोआप मोडून जाईल. आपण राजा होण्याची एक वेळ मला महत्त्वाकांक्षा होती; पण माझ्या प्रियेच्या कृष्णरायावरील निःसीम प्रेमांत ती विरघळून गेली. आतां माझी महत्त्वाकांक्षा ह्मटली ह्मणजे कृष्णरायाला राजा करून त्याची इमानें इतबारें दिवाणगिरी करायची, आणि पद्मावतीला ज्यापासून सुख होईल तें करायचें. आतां अगोदर हिंमतरावाला अन् प्रियेला त्यांच्या पत्रांचीं उत्तरें लिहितों अगोदर, अन् मग व्यंकटाद्रीकडे अन् यलमतराजाकडे देतों हलकारे पाठवून. असं केल्याशिवाय नाहीं कांहीं जमून यायचं. [जातो.]

प्र. ३ रा.

स्थळः—भोजवेश.

[प्रवेश—गुलामाचा शिरच्छेद पाहण्याकरितां पुष्कळ लोक जमले आहेत. हत्तीच्या अंबारींत बसून कृष्णराय, भोज तिरमलव उदाजीराव आहेत; हिंमतराव, शंभुराव व इतर सरदारही तेथें आले आहेत.]

हिंम०—त्या हरामखोर गुलामाला शिरच्छेदाची शिक्षा होऊन त्याला भोजवेशीकडे चालिवला आहे. प्रत्यक्ष राजपुत्राच्या—छेः,राज्याभिषेक झाल्यावर आतां राजपुत्र कसला—राजांच्या—या विजयानगरच्या गादीच्या मालकाच्या—पाठीवर हा यःकश्चित् बेवकूब हरामखोर छड्या ओढतो! आणि तेंही राजपुत्राला चांगली शिक्षा लावण्याच्या बहाण्यानं! राजपुत्र लहान असून सगळा अधिकार दिवाणांच्या हातांत असला ह्मणजे त्या अधिकारमदानं त्यांना एक प्रकारची धुंदी येऊन त्यांचे डोळे दिपून जातात. आणि ते आंधळ्यापेक्षां देखील आंधळे

होऊन काय हवं तें करायला प्रवृत्त होतात. राजपुत्र वयांत आल्याबरोबर आपल्या हातची सर्व सत्ता जाईल याची त्यांना अगोदरपासूनच जशी काय धडकी भरली असते. ह्मणूनच अधिकार मिळाल्यावर देखील राजपुत्रांनीं आपल्या मुठींत रहावें याबद्दल ते पहिल्यापासूनच खबरदारी ठेवतात. राजपुत्राच्या जवळ जे लोक ठेवायचे तेच प्रथमता हलक्या आणि क्षुद्र बुद्धीचे, चहाडखोर, चुगलखोर, हलकट, आणि वाईट चालीचे—आणि सगळ्यांत मुख्य गोष्ट ह्मटली ह्मणजे ते आपल्या छापेंत राहून आपल्या तंत्रानं चालतील असे ठेवायचे. राजपुत्राच्या विद्येसंबंधानं काळजी घ्यायची ह्मणजे ते नामर्द, बेहिमती, कम्अक्कल, आणि महामूर्ख कसे निपजतील याची चांगली खबरदारी ठेवायची! राजकीय गोष्टींसंबंधानं त्यांना पुरं अज्ञानांत ठेवून कांहीं तरी खोडसाळ कल्पना त्यांच्या डोक्यांत भरवून देऊन भलत्याच दिशेनें त्यांच्या विद्याभ्यासाचा ओघ वळवायाचा. आणि त्यांचे आप्त, त्यांचे सगेसोयरे, त्यांचे भाऊबंद, यासंबंधानें त्यांचीं मनं कलुषित करून टाकून द्वंद्व, मत्सर, द्वेष, तिरस्कार आणि अप्रीति यांचं सकलसंहारक बीं रुजत घालून भयंकर रान माजवूं द्यायचं! आणि मग ते जसजसे मोठे होत जातील तसतशा त्यांच्या आणि त्यांच्या आप्तांच्या आणि त्यांच्या भाऊबंदांच्या गांटी न पडतील अशाबद्दल खबरदारी घ्यायची; प्रत्यक्ष राजपुत्राची आई,—त्याचं लग्न झालं असेल तर त्याची बायको,—त्याचे भाऊ, त्याच्या बहिणी, त्याचे मामे, त्याचे चुलते, या सर्वांशीं त्याच्या मुलाखती बंद करायाच्या! कधीं झाल्याच तर या दिवाण साहेबांच्या कानमंत्रानें भारलेल्या हलकट कुत्र्यांच्या टापूंत व्हायच्या. अन् मग ह्या लाळघोट्या लबाड कुत्र्यांनीं शेंपटी हालवीत हालवीत—आणि जिभली चाटीत जाऊन सगळी वर्दी द्यायची दिवाण साहेबांना! असा प्रकार राजपुत्रांच्या विद्याभ्यासाचा आणि शिक्षेचा! प्रत्यक्ष राजमातेच्या आणि राजपुत्रांच्या जिथं गांठी पडण्याची मुष्कील तिथं मातृप्रेम आणि पुत्रवात्सल्य यांच्या शुद्ध व उदात्त कल्पनांची त्यांना ओळख तरी कशी व्हावी? हंः, कुठें राजपुत्र दत्तक घेतला असेल तर त्याच्या पहिल्या घरच्या आईबापांच्या अन् भावाबहिणींच्या भेटी संबंधानं हाच प्रकार. ते येऊन कुठं तरी चिकटतील आणि त्यांच्या वाईट चालचलणुकी लागतील ह्मणून त्यांच्यापासून होतां होईल तों त्यांना अगदीं अलग ठेवायचं! इकडे दत्तक घेणाऱ्या राजमातेचे कान मधल्या लुच्च्या लोकांकडून भारून टाकून राजपुत्रासंबंधानं तिचं, आणि—आपल्या हातांत सत्ता असावी ह्मणून दत्तक घेतलेल्या राजपुत्राला विषप्रयोग करण्याच्या तिच्या खटपटी झालल्या आहेत असं राजपुत्रा-

ला भासवून त्याचं,—अशीं दोघांचीं मनं कलुषित करून टाकायचीं! इकडे राजपुत्र वयांत येत चालला आहे नाहीं तोंच त्याच्यांत आणि त्याच्या बायकोंत कांहीं तरी तंटा लागून राहील अशी तजवीज राखायची. तिच्या चालचलणुकीसंबंधानं त्याच्या मनांत कांहीं काळं बेरं भरवून दिलं कीं झालं! मग राजपुत्र वेडे, तिरसट, माथेफिरू, बनायला किती उशीर! आणि असे ते वेडे बनले कीं मग आपली दिवाणगिरी गाजवायाला दिवाण साहेबांना अनायासेंच चांगलें फावायचें. इथपर्यंत मजल आणून ठेवल्यावर मग पुढचा मार्ग सहजच सोपा होतो! राजपुत्र असे एकदां भ्रमिष्ट, माथेफिरू, आणि वेडेपीर बनविले ह्मणजे मग त्यांना ताळ्यावर आणण्याकरितां नानाप्रकारचे उपचार सुरू होतात. त्यांत दिवाणांच्या शिफारशीनें एखाद्या मुद्दाम नव्या राजवैद्याची नेमणूक होऊन औषधें चालू होतात. हीं औषधें ह्मणजे प्राणरक्षक औषधें नव्हेत तर प्राणभक्षक शस्त्रें होत! आणि हे राजवैद्य ह्मणजे दिवाणांनीं नेमलेले राजरोसपणें—बिनदिक्कत—खून करणारे मारेकरी! अशा रीतीनें औषधांच्या द्वारें विषप्रयोग सुरू झाले ह्मणजे राजपुत्राच्या मरणाचे दिवस बटका आणि पळं मोजण्याला—त्या दिवाणांकडून —त्या नराधम मांगांच्याकडून—सुरवात होते! अन् अशा रीतीनं त्या राजपुत्राचे त्या गादीला बळी दिले कीं मग दुसरा नवा बळी निवडून काढायला पुन्हां सुरवात होते. अन् मग अर्थातच ह्या दिवाणांची पुनः नवी कारकीर्द सुरू होते! असले स्वार्थसाधु, स्वहितपरायण, आणि राजद्रोही दिवाण जिथं आहेत तिथं प्रजाजनांचं कल्याण आणि त्यांचं पालन हें कोठून होणार! आणि प्रत्यक्ष राजाच्या अधिकाराचं जर त्यांना वारंच नाहीं तर त्यापासून मिळणारं सौख्य तरी त्यांना कोठून प्राप्त होणार? राजाच्या आणि प्रजेच्या अशा दोघांच्याही सुखांत विष कालवून सोडणाऱ्या अशा या हरामखोर नराधमांना —त्यांची कावेबाजी आणि लुच्चेगिरी बाहेर पडून—जर कधींकाळीं त्यांच्या अपराधाबद्दल खडतर शिक्षा होण्याचा सुयोग आला तर ती मोठी पर्वणीच समजली पाहिजे! तिमरायांनीं कृष्णरायाच्या बापाचे आणि चुलत्याचें याचप्रमाणें खून केले, हें सगळं या गुलामानं पाहिलेलं! अर्थात् हाही त्यांचाच कित्ता गिरवूं लागला. पण हा पक्का वाकबगार नसल्यामुळं याचं हें असं उघडकीला आलं. (ओंठ चावून) आपली पायरी विसरून हातीं असलेल्या सत्तेच्या आणि अधिकाराच्या बळानें धुंद होऊन प्रत्यक्ष आपल्या राजाच्या अंगावर छड्या ओढायला तयार होणाऱ्या चढेल, पाजी, आणि बेवकूब माणसांना शिरच्छेदाचीच काय पण याहून देखील भयंकर आणि कडक शिक्षा पाहिजे. लाल केलेल्या पोलादी सळयांनीं ह्याचे डोळे काढवून, ह्याच्या

कानांत कढत तापविलेलें तेल ओतवून याचे डोळे आणि कान कधीं होते कां नव्हते असं करून टाकलं पाहिजे; याच्या सगळ्या अंगाचे सांडसानें तुकडे काढवून ह्याच्या अशा उलट्या आणि बेगुमान काळजाचे जागजागीं लचके तोडवून, त्यांत घरं करून, त्यांत रखरखित निखारे भरून ठेवले पाहिजेत. ह्याच्या अंगांत वाहणारं सारं रक्त तुंबड्या लावून अथवा जळवा लावून—पण जळवा ह्मणजे अगदीं निर्जीव प्राणी ते—साप जर जळवांचें काम करिते तर फार चांगलं झालं असतं—त्यांना लावून ह्याचं मस्तीला आलेलं सगळं रक्त शोषून घेऊन त्याच्या ऐवजीं भयंकर जहराचे पाट ह्याच्या सारख्या मंदांधांच्या सगळ्या शरीरांतून खेळविले पाहिजेत; आणि मग ह्याच्या सगळ्या अंगाला उकिरड्यावर पडणाऱ्या चिंध्या कुंध्या बांधून—त्यांवर तेल ओतून आगीचा एकच भयंकर डोंब उसळून, भडका करून दिला पाहिजे होता; अन् मग सगळ्या नगरभर ह्याची धिंड काढून ज्यांच्या ज्यांच्या काळजांत अशा प्रकारच्या राजद्रोही, चढेल, आणि उद्दाम मनोवृत्तींचीं मुळं जर कुठं बाहेर तोंड काढीत असतील तर तीं देखील ह्या भयंकर आगीच्या धगीनें पार खाक जाळून टाकलीं पाहिजे होतीं! नाहीं तर पुढें मागें तींच बळावून जाऊन काय काय अनर्थ करतील आणि कसकसे प्रसंग ओढवून आणतील हें प्रत्यक्ष ब्रह्मदेवाला देखील सांगतां येणार नाहीं! ह्मणून ह्मणतों ह्या हरामखोराला नुसत्या शिरच्छेदापेक्षां निराळीच कांहींतरी भयंकर शिक्षा पाहिजे होती. प्रमत्त तिमराजाचीं सगळीं भयंकर कृत्यें यानें पाहिलेलीं होतीं. त्यामुळंच हा इतका बेगुमान झाला. (शंभूराव आलेला पाहून) अशा दिवाणांच्या जवळ कांहीं तोंडपुजे लोक असतात. ते त्यांची झील ओढून आपला कार्यभाग साधण्यांत नेहमीं दक्ष असतात. हे लोक ह्मणजे वारा वाहील तशी पाठ करणारे; दिवाण-अथवा ज्यांच्याकडुन त्यांचं कल्याण होण्याचं असेल ते अधिकारांत असत तोंपर्यंत त्यांच्या बोलण्याप्रमाणें चालायला आणि होला हो ठेवून देऊन पुढचा मागचा कांहीं एक विचार न पाहतां हवें तसें वागायला तयार. आणि तेच दैववशात् अधिकारांतून दूर झाले म्हणजे त्यांच्यावरच उलट तुटून पडून नवीन अधिकारांत येणाऱ्यांच्या खुशामतीलाही तयारच! (शंभूराव जवळ येतो त्यास) या, या, या, या. केव्हां आलांत तुह्मी? इतका उशीर?

शंभू०—नाहीं, उशीर नाहीं. मी जरा गुंतलों होतों.

हिंम०—गुंतला होता? हो, बरोबरच आहे. तुमची गुंतागुंतच फार! कुठें, गुंतला होता कुठें?

शंभू०—त्या हरामखोर गुलामानं ज्या छब्या राजपुत्राच्या—नाहीं आपल्या राजेसाहेबांच्या—अंगावर फोडल्यान्, त्याच छब्या भोज तिरमळांनीं—कौकासाहेबांनीं—

त्या हरामखोराचा शिरच्छेद होण्यापूर्वी राजवाड्यापुढल्या खुल्या मैदानांत त्या हरामखोराच्या अंगावर ओढण्याची कामगिरी माझ्यावर सोंपविली होती, तिकडं जरा गुंतल्यामुळें मला किंचित् उशीर झाला इकडे यायला.

हिंम०—हं! तर मोठ्याच कामगिरीवर होतां तुह्मी ह्मणायचें! (एकीकडे) हाच हरामखोर, त्या गुलामानं जेव्हां महाराजांना छड्या मारल्या तेव्हां (वेडावल्यासारखें करून) 'लहानपणीं ही अशीच शिक्शा लावली पाहिजे.' असं ह्मणत होता, ह्मणून ते उदाजीराव अन् पद्मावतीताई अशीं दोघेंही सांगत होतीं; अन् आतां त्या गुलामाच्या अंगावर आपण छड्या फोडल्याची हा फुशारकी मिरवतो! (उघड) शंभूराव, तुमच्यसारखीं खानदानीचीं माणसं पदरीं आहेत ह्मणूनच ठीक आहे. पण काय हो शंभूराव, तुह्मी त्याला छड्या मारीत असतांना तो कांहीं ह्मणाला कां तुम्हांला?

शंभू०—(हंसून) हः हः हः ह. माझ्यावर पुष्कळ दांतओंठ चावून मला ह्मणाला. 'सूड उगवीन तुमच्यावर सूड!'

हिंम०—सूड? केव्हां मेल्यावर कीं काय?

शंभू०—(हंसत) हो. मेल्यावरच अन् दुसरं काय?

हिंम०—पण संभाळा हो शंभूराव, तो जातीचा मुसलमान आहे. तो बोलल्यांप्रमाणें करायाला चुकणार नव्हे. आपल्या दफनींतून नाहीं तर थडग्यांतून उठून येऊन देखील तुमच्यावर आपला सूड उगवायला तो कमी करणार नाहीं!

शंभू०—(हंसत) हो, हेंही कांहीं खोटं नव्हे! ही पहा लोकांची किती झुंड तिकडच चालली आहे. त्याला शिरच्छेदाच्या ठिकाणीं आणून उभा दिखील केला. चला आपणही अंमळ पुढं जाऊं.

[जातात]

(पडदा वर जातो.)

भोज०—(गुलामाचा शिरच्छेद करावयास तरवारी उपसून मांग उभे आहेत त्यांस) त्याच्या धडापासून त्याचं शीर वेगळं होईतोंपर्यंत त्याच्या तोंडाला राखेचा तोबरा आहे तो तसाच असूं द्या.

गुला०—(तोंडाचा तोबरा तोडून घेऊन) हे सरदार आणि नगरवासी लोक हो, अधिकारमदानं धुंद होऊन माझ्या हातून होऊं नये तो अपराध घडला याबद्दल मी फार लाचार आहें. रामरायासंबंधानं नाहक खोटं नाटं उठवून—

भोज०—अरे बघतां काय, त्या हरामखोराच्या तोंडाला तो राखेचा तोबरा नीट खेंचून बांधा—अन् यापुढें त्या हरामखोराला एक शब्द दिखील न बोलूं देतां त्याची गर्दन उडवा—

गुला०—(ते तोबरा बांधित असतां त्यांस दूर करून) मी त्याच्यावर व्यर्थ तोहमत घेतली. राजकन्येला मी विषप्रयोग करविणार होतों; अन् पुढें मग तिमराजांचा कित्ता गिरवून खुद्द कृष्ण-

रायाला ठार करणार होतों; तर अशा सैतानानं यापुढें या जगांत जगणं—

भोज०—(मांगांस) उडवा गर्दन ब घतां काय ? (तो एकसारखा गर्दन उडविण्याविषयीं त्या मांगांस आग्रहपूर्वक सांगत आहे.)

गुला०—चांगलं नाहीं ! भोजतिरमलाकडून माझ्या शिरच्छेदाचा हुकूम सुटेल असं मला वाटलं नव्हतं! पण आतां काय ? मी तर आतां सुखानं मरतों. कारण माझ्याकडून तसे अपराधच झाले आहेत. पण ज्यानं हा सारा भूतखाना माजिवला त्या या भोज तिरमलाच्या त्या या मायावी काकासाहेबांच्या—तडाक्यांतून मात्र महाराजांचं संरक्षण करा.

भोज०—अरे अजून काय बघतां ? आटपा उरका—झटपट. मी याचा शिरच्छेद करवितों आहे त्याअर्थी माझं नांव घेणारच हा! हरामखोर नाहीं तर! हं आटपा, आटपा झटपट.

[मांग तरवारी उचलतात व त्याचा शिरच्छेद करतात.]

(पडदा पडतो)

अंक ३ रा.

प्रवेश १ ला.

हिंम०—(आपल्याशीं) ह्या गुलामाच्या शेवटच्या शब्दांचा काय अर्थ असावा ? त्याचा लौकर शिरच्छेद करण्याची भोजतिरमलाची ती घाई आणि त्या गुलामाचे ते अखेरचे उद्गार यांचा काय अर्थ तरी काय समजायचा ? “ मी तर सुखानं मरतों पण ज्यानं हा सगळा भूतखाना माजिवला त्या भोजतिरमलाच्या”—“भोजतिरमलाच्या” हे त्याचे शब्द अगदीं स्पष्ट होते; आणि तो हे शब्द उच्चारीत असतांनाच, भोजतिरमल त्या मांगांना झटपट तरवारी चालविण्याकरितां एकसारखा स्वतः अगदीं घाईघाईत सांगत सुटला होता. “भोजतिरमलाच्या” इतकंच ह्मणून नाहीं तो राहिला; “ त्या मायावी काकासाहेबांच्या—त्या बड्या सैतानाच्या तडाक्यांतून मात्र आपल्या महाराजांचं संरक्षण करा.” इतकं तो आडखळत आडखळत ह्मणाला, तोंच त्याच्या मानेवर त्या मांगांच्या तरवारी पडल्या ! त्या गुलामाच्या तोंडून हे बाहेर पडत असतां भोजतिरमलाचें तोंड एक निमिषभरच कां होईना पण अगदीं फिकं पडून किती चमत्कारिक झालं होतं ! त्याची ती मुद्रा कावरी बावरी होऊन त्या गुलामाच्या शिरच्छेदाविषयीं तो किती उतावीळ आणि आतुर झाला होता, हें त्याच्या त्यावेळच्या त्या तुटक आणि घाईच्या उद्गारांवरून अगदीं स्पष्टपणें व्यक्त होत होतें ! पण ह्याला ह्या एका गोष्टीशिवाय दुसरा पुरावा काय ? अथवा असल्या गोष्टींना ह्या असल्या पुराव्याशिवाय दुसरा पुरावा तरी काय असणार? “ मी तर आतां सुखानं मरतों. ” कारण माझ्याकडून अपराधच तसे झाले आहे-

त. " असं कायससं तो ह्मणाला ! भोजतिरमलाकडून आपल्या शिरच्छेदाचा हुकूम सुटेल असं त्याला वाटलं नव्हतं ! ह्यावरून ह्या दोघांची कांहीं तरी खास खलबतं चालत असावींत असं अगदीं स्पष्ट होतं. काहीं असो, मनुष्याचे दुष्ट हेतू हे बाहेर पडल्याशिवाय कधींच राहावयाचे नाहींत. एखादवेळेला नाहीं, एखादवेळेला तरी ते उजेडांत येतीलच येतील ! बरं पण मला आज भोजतिरमलानं जें बोलावणं पाठविलं आहे तें कशाकरितां असेल बरं ! कशाकरितांही असो. बोलावल्याप्रमाणें आपल्याला आतां तिकडे गेलं पाहिजे येवढं मात्र खरं. तिकडेच जावं तर.

[जातो.]

———

प्रवेश २ रा.

स्थळ—राजमहाल.

[प्र०—भोजतिरमल, कृष्णराव, व शंभूराव.]

कृष्ण०—काका, हा राजमुकूट फार जड आहे. हा माझ्या डोक्यावर नीट बसत नाहीं. सैल होतो हा फार. (काढतो)

शंभू०—(हंसत हंसत) हा लहान डोक्याकरितां केलेलाच नाहीं. आँ! काय ह्मणतों मी काकासाहेब ! काकासाहेबांच्या डोक्याला तो ठीक बसेल ! आणि त्यांना तो जडही पण वाटणार नाहीं. पहावा पाहिजे तर घालून

भोज०—(स्वगत) हा कोणच्या अर्थानं बोलत आहे बरं हें ? (उघड) शंभूराव, तुमच्यासुद्धां डोक्याला तो ठीक बसेल. आणि तुह्मांलाही तो जड नाहीं वाटायचा. पहा पाहिजे तर घालून

शंभू०—छेः छेः छेः छेः! विजयानगरच्या गादीचा मुकूट आणि माझ्या डोक्यावर! ह्मणजे कोण भयंकर पाप! आणि या गादीचा केवढा अपमान ! तुह्मी अस्सल राजवंशांतले आहांत. ह्या गादीवर सर्वतोपरी तुमचा हक आहे. ह्मणून ह्मटलं तुह्मीं घातलांत तर तुमच्या डोक्याला हा एक वेळ शोभेल, ठीकही बसेल, अन् जडही पण नाहीं वाटायचा तुह्मांला.

कृष्ण०—खरंच काका, हा तुमच्या डोक्याच्या बेताचा आहे. घालून पहा. (देतो.)

शंभू०—घाला कीं-घालून पहायला काय हरकत आहे ? घाला घाला.

भोज०—(मुकूट हातांत घेऊन) शिवराय, अजितराय, कृष्णराय, या एकेकांच्या कारकीर्दींत याच्यावर हीं मोत्यें, ह्या हिरकण्या, आणि ह्या पाचा बसविल्या आहेत आमच्या अमदानींत.

शंभू०—(स्वगत) आमच्या अमदानींत आँ! सुटलं, खास पाणी सुटलं आहे याच्या तोंडाला !

भोज०—अर्थात् आमच्या चिक्क कृष्णरायाच्या कारकीर्दींत याचा कळस नुसत्या हिऱ्यांनीं जडवून घेऊं !

शंभू०—घालून तर पाहूं आपल्या डोक्यावर (भोजतिरमलास घालूं लागतो.) (भालदार " अदब रखो "—"सरदार

हिंमतराव आया " म्हणून ललकारतो)

भोज०–(दचकून, स्वगत) अदब रखो ! शंभूराव, हें असं भलतंच करणं ठीक नव्हे !

(हिंमतराव येतो.)

या, या हिंमतराव. तुम्हांला केव्हांचं बोलावणं पाठविलं होतं.

हिंमत०–आपलं बोलावणं मला पोंचलं अन् मी लगेच निघालों तों इकडंच आलों. (शंभूरावाचे हातांत मुकुट पाहून चकित होऊन) महाराजांचा मुकुट तुमच्या हातांतसा ?

कृष्ण०–माझ्या डोक्यावर तो नीट बसत नाहीं. मोठा होतो तो मला.

शंभू०–(हंसत) मी सांगितलं महाराजांना कीं लहान डोक्याकरितां म्हणून तो केलेलाच नाहीं. काकासाहेबांच्या डोक्याला ठीक बसेल तो.

हिंमत–०(एकीकडे) काय ! काकासाहेबांच्या डोक्याला ठीक बसेल ! कोण बेवकूब माणूस आहे हा ! तिमराजाच्या अमदानींत हा तिमराजाची खुशामत करीत होता. त्यांच्या मागं रामरायाच्या हातीं अधिकार आला तेव्हां त्याची हा खुशामत करूं लागला. रामराय मोहिमेवर गेला न गेला तोंच गुलामाच्या नाकांतला हा बाल होऊन बसला–आणि आतां या काकासाहेबांच्या खुशामतीला यानं आरंभ केला आहेन्. (उघड) काकासाहेबांच्याच कां तुमच्या देखील तो डोक्याला बसेल, पण अभिषिक्त राजांच्याशिवाय दुसऱ्यानें तो धारण करणं म्हणजे विजयानगरच्या गादीचा अपमान करण्यासारखं आहे. आणि काकासाहेबांना विजयानरच्या गादीचा अपमान कध्धीं सहन व्हायचा नाहीं.

भोज०–अलबत् कध्धीं नाहीं सहन व्हावयाचा !

शंभू०–हो. हो. नाहींच व्हावयाचा. पण मी म्हणतों काकासाहेबांच्या अंगांत तरी राजवंशांतलंच रक्त खेळतंय ना ?

हिंमत०–मग तें कोण नाहीं म्हणतं ? पण हा किरीट घालायला अभिषिक्त राजाच पाहिजे. काका साहेब, याला आंतून मखमलीची मऊ गादी बसवून आणली म्हणजे महाराजांच्या हा अगदीं बेताचा होईल. जामदार, तो किरीट घ्या अन् त्याला मखमालीची गादी बसवून तो महाराजांच्या डोक्याला नीट बसेसा करा. (महाराजांस) महाराज, शिकारीला येणार ना आज ? मी महाराजांना अगोदरच सुचिवलं होतं.

कृष्ण०–हा आलोंच मी शिकारीचा पोषाक करून. विजयाताई देखील येणार आहे म्हणे आज आपल्या बरोबर.

हिंमत०–अस्सं–येऊं द्या.

भोज०–होय, मीही तसंच योजलं आहे.

शंभू०–(स्वगत) गादी बसविण्यापेक्षां त्याच्या बेताचं एखादं डोकंच पाहिलं तर ? यांनीं हा विषयच बदलला. हेंही एकप्रकारें बरंच झालं म्हणायचं.

हिंमत०–बरं पण मला कशाला बोलिवलं होतं ?

भोज०–तुम्हांला दोन गोष्टींसंबंधानं बोलिवलं होतं–एक त्या रामरायाची खुद्द विजयानगरच्या कांहीं सरदारांशीं गुप्त कारस्थानं अन् खलबतं चालल्याची बातमी लागली, त्यासंबंधानं विशेष नजर ठेवायला तुम्हांला सांगावं, अन् दुसरं–ती गोष्ट जरा नाजुक आहे–पण तुम्हांला सांगायला कांहीं हरकत नाहीं–पुढें आमच्या मनांतून–आमच्या विजयेचं अन् तुमचं लग्न करावं असं आहे. पण ही गोष्ट तुमच्या मातोश्रींनाच विचारली पाहिजे.

[इतक्यांत कृष्णराय व विजया शिकारीचे वेषांत येतात.]

ओहो, ही शिकारीची मंडळी आली कीं तयार होऊन ! विजये, ये, इकडे ये. (विजयेला जवळ घेऊन) बेटा, शिकारीच्या मर्दानी वेषांत तूं किती छान दिसतेस ! (तिचा हात हिंमतरावाचे हातांत देऊन) हिंमतराव, तुमच्या बरोबर शिकारीला जाण्याचा हिनं अगदीं कालपासून हट्ट घेतला आहेन्. तर हिला सर्वस्वी मी तुमच्या स्वाधीन करतें. हिला नीट संभाळून घेऊन या–आमच्या मनांतून विजयेला तुमच्या स्वाधीन जन्माचीच करावी असं आहे. पण ही गोष्ट तुमच्या मातोश्रींच्या जवळच काढली पाहिजे.

कृष्ण०–ताई–काकांनीं तुझा हात हिंमतरावांच्या हातीं दिलाना !

हिंमत०–हो दिला, शिकारीला नेण्याकरतां दिला–मग ?

कृष्ण०–त्यांनीं तुलाच आपली शिकार समजून नेली आपल्या घरीं तर ?

विजया०–चलरे कांहीं तरीच बोलतोस.

हिंमत०–बरं. मग उशीर कां ? निघायचं ना शिकारीला–शिकारी मंडळी पुढं गेली आहेत. उदाजीराव बाहेर उभे आहेत आपलीच वाट पहात–चला जाऊंच तर. येतों काका साहेब.

भोज०–या. पण रामरायाच्या कारस्थानाची गोष्ट लक्षांत असूं द्या.

हिंमत०–हो आहे लक्षांत. [कृष्णराय, विजया व हिंमतराव जातात.]

भोज०–हे शिकारीला बाहेर जाताहेत, पण मला राजवाड्यांत बसून शिकार साधायची आहे ! शंभूराव, पाहिलंत तुम्ही हा हिंमतराव किती बाणेदार आहे तो ? तुम्ही म्हणालांत कीं माझ्या अंगांत राजवंशांतलं रक्त खेळतंय. पण त्याला तें खपलं नाहीं– ' हा किरीट घालायला अभिषिक्त राजाच पाहिजे ' असं म्हणाला तो. नाहीं तर विजयानगरच्या गादीचा अपमान केलासा होतो! पण एक अभिषिक्त राजा असतां दुसरा कसा होणार ?

शंभू०–मी म्हणतों–महाराज अल्पवयस्क आहेत, त्यांतच त्यांना वेड लागण्याचा बहाणा—

भोज०–वेडाचा बहाणा ? वेडाच्या बहाण्यानं काय होणार ? फार झालं तर

सर्वसत्ता राजरोसपणें माझ्या हातीं येईल येवढंच. पण अभिषिक्त राजा कसं होतां येईल त्यानं ?

शंभू०–(स्वगत) हे विचार जर यांच्या डोक्यांत येऊं लागले आहेत तर आपली इथं चांगली डाळ शिजेल. (उघड) नाहींच. अभिषिक्त राज्यपद पाहिजे असेल तर त्याला एकच उपाय. दुसरा नाहींच.

भोज०–तो कोणचा ?

शंभू०–तो कोणचा तें तुम्ही विचारूं नये अन् मी सांगूं नये !

भोज०–बरं तर शंभूराव, इथं नको हें. इथून माझ्या खलबताच्या खाजगी खोलींत जाऊं अन् तिथंच याबद्दल विचार ! मंडळी शिकारीला गेली कां नाहीं तें पहा अन् तसेच परस्पर खलबतखान्याच्या खोलींत या–मीही असा मागच्या चौकांतून तिकडे जातों.

शंभू०–ठीक आहे. (जातां जातां आपल्याशीं) यांना अभिषिक्त राज्यपद मिळवून दिलं तर दिवाणगिरी अनायासंच आपल्या पदरांत पडणार ! अन् हें नर डळमळीत दिसलं तर तिकडं विजापूरचा बादशहा इस्माएल आदिलशहा याचेकडे राजकारस्थान ठेवावं म्हणजे विजयानगरची सुभेदारी तरी खास आपल्या पदरांत पडेल ! कांहीं असो. सध्यां आपले ग्रह बरे आल्यासारखे दिसतात. (जातो).

भोज०–(स्वगत) मला तो राजमुकुट दिसतो आहे ! शिवरायाचं राजरक्त माझे अंगांत खेळत आहे तरी देखील मी अभिषिक्त राजा नसल्यानें तो मुकुट धारण करायला मी पात्र नाहीं ! तर यापुढं–तो राजमुकुट जर पाहिजे आहे तर मला अभिषिक्त राजाही झालें पाहिजे. आणि तसं व्हायला–तो शंभूराव म्हणाला कीं एकच उपाय आहे, दुसरा उपाय नाहीं, तेंच खरं आहे ! कारण कृष्णरायाला वेडा ठरविण्याच्या कल्पनेंत कांहीं अर्थच नाहीं. कारण त्यायोगानं दुसरे सरदार आपल्याबद्दल शंका घेऊन बंडें करायला देखील प्रवृत्त होतील. आणि मग सगळंच ऑफस होऊन बसेल. कृष्णरायाचं अस्तित्वच उपयोगाचं नाहीं आपल्याला ! त्याला ठेवला कीं राजमुकुट आपल्याला कायमचा अंतरला म्हणून समजावं. हा शंभूराव एक बरा माणूस दिसतो आहे. याला दिवाणगिरीची आशा लावल्यास हा आपल्या फार उपयोगी पडेल. तर यालाच हातीं धरावा ! एक वेळ असं मनांत येतं कीं, कृष्णरायाला तिच्याकडून कांहीं खायाला देऊन विषप्रयोग करावा. म्हणजे हें दुसऱ्या तिसऱ्याला कळवायला नको अन् संवरायला नको. पण पुनः असंही एक आहे कीं, कांहीं कारण नसतां एकदम जर हा मेला तर लोकांना संशय घ्यायलाही एक जागा होणार. शिवाय कृष्णरायावर तिचंही फार प्रेम आहे. तेव्हां तिच्या हातूनही ही गोष्ट होईल न होईल ! (विचार करून) अथवा असं केलं तर–शंभूरावाला दिवा-

णगेरीची आशा लावून त्याच्याकडूनच कृष्णरायावर मारेकरी घालवावेत, अन् ते रामरायानें त्याच्यावर घातले आहेत असं उठवावं! आणखी त्या मारेकऱ्यांच्याकडूनच भर दरबारांत तसं कबूल करवावं म्हणजे मग अर्थातच माझ्याबद्दल शंका येणार नाहीं कोणाला! बस्स, हीच युक्ति! अन् समजा कदाचित् हा शंभूराव अन् हे मारेकरी उलटले, अन् माझ्याच सांगण्यावरून हें सारं केलं असं म्हणूं लागले तर हे रामरायाचे साथीदार आहेत, आणि माझ्या हातांतला राज्याधिकार काढून घेण्याकरितां ही रामरायाचीच क्लृप्ति आहे असं उठिवलं म्हणजे आपल्यावर कांहीं एक न येतां सगळं सुरळीतपणें पार पडेल. इथल्या सगळ्या सरदारांत हिंमतराव प्रमुख आहे. त्याला आपली विजया देऊन आपलासा केला म्हणजे तोही पण आपल्या विरुद्ध जाणार नाहीं. कारण माझ्या मागं ही गादी तुझीच आहे अशी त्याला आशा लावून ठेवली म्हणजे तो तरी माझ्याविरुद्ध कां आणि कसा जाईल? पण विजया त्याला देण्याचं तिच्या मनांत नाहीं. तिच्या मनांत आपल्या बरोबरीच्या अन् तोलाच्या त्या मोऱ्यांच्या इथं तिला द्यावी असं आहे. पण विजया हिंमतरावाला दिल्याशिवाय राजमुकुट जर आपल्या हातीं येत नाहीं तर ह्याला सोडून दुसऱ्याला कां द्या विजया? शिवाय हिंमतराव गख्यात जाधवांच्या कुळांतला आहे. आतां हा जरी आमचा सरदार आहे तरी तो मोठा बाणेदार आणि कर्तृत्वी आहे. तर असंच. हिंमतराव पदरचा, ह्यालाच द्यायची. अन् शंभूरावाला हातीं धरून कृष्णरायाला ह्या जगांतून नाहींसा करायचा! त्या शिवाय अभिषिक्त राजा होऊन आपल्या डोक्यावर मुकुट चढायची आशा नको करायला! [जातो.]

प्रवेश ३ रा.

स्थल–राजमहाल.

प्र० भोजतिरमल, त्याची स्त्री चंपावती, पद्मावती, विजया, कृष्णराय.

चंपा०–अगबाई! काय पोरीची दशा झाली ही.—

विजया०–(भ्रमिष्टपणें) तें आभाळ माझ्या डोक्याला लागतंय हो! (खालीं वांकते) अगं बाई. मेलें मेलें. ह्या आभाळाच्या ओझ्यानं माझं डोकं फुटून जाईल–म्हणून म्हणते धरा कोणी तरी हो तें उचलून. बाबा! बाबा!! बाबा!!! इथं तुम्ही असून देखील कसे असे स्वस्थ उभे हो! ताई पद्मावती, तूं तरी धरगं उचलून हें!

[इतक्यांत हिंमतराव प्रवेश करतो.]

हिंमत०–(आश्चर्यानें चकीत होऊन) हा काय प्रकार आहे!

विजया०–कोण हिंमतराव, तुम्ही का आलांत! बरं झालं वेळेवर आलांत अगदीं! हें पाहयलंत का आकाश माझ्या अगदीं डोक्याला येऊन भिडलं आहे! याच्या दडपणानं

माझं डोकं फुटून त्याच्या चिंधड्या चिंधड्या होऊन जातील–म्हणून म्हणते–तुम्ही आलांत बरं झालं–तुम्ही तरी हें जरा वर उचलून धरून मला वांचवा. ही इतकी मंडळी इथं माझ्या जवळ उभी असून एकजण देखील येत नाहीं कीं हो मला सोडवायला! तुम्ही—

हिंमत०–हिची अशी स्थिती कशामुळं झाली? काय, कारण तरी काय झालं?

कृष्ण०–कांहीं नाहीं हो–काकांसाहेबांनीं दिलेला लाडू खाल्यापासून तिची ही अशी अवस्था झाली!

हिंमत०–लाडू खाऊन असं झालं म्हणालांत?

कृष्ण०–हो.

विजया०–शिकारीला आपण गेलों होतों तेव्हां त्या भयंकर वाघाच्या तडाख्यांतून मला तुम्हीच वांचविलीत ना! मग आतां कां नाहीं यांतून सोडवीत मला?

कृष्ण०–पाहिलंत, हिला ह्या भ्रमांत देखील शिकार दिसते आहे! हिला झोंप आली तर बरं नाहीं कां वाटणार?

हिंमत०–हो तसंच करूं. (तिचा हात धरून तिला) चल ये, हें बघ मी आकाश धरतों वरच्यावर उचलून, भिऊं नकोस तूं मुळीं देखील. (काकासाहेबांस) हिच्या खोलीकडे चला. तिथं आपण हिला घेऊन जाऊं अन् निजवूं जरा; म्हणजे झोंपेनंच बरं वाटेल हिला जरा. महाराज, तुम्ही हा उजवा हात धरा इचा. [जातात.]

भोज०–अरे, अरे, अरे! घात झाला. शंभूरावाच्याकडून जे लाडू करवून आणून कृष्णरायाला देण्याकरितां म्हणून तिच्या जवळ दिले ते तिनं हिला दिल्यामुळें हा भयंकर प्रकार ओढवला. तर आतां अगोदर राजवैद्यांना बोलावणं पाठवून या घोंटल्यावर त्यांचेकडून कांहीं उताराचीं औषधें देववावीं हिला. [जातो.]

[पद्मावती एकटीच स्वगत.]

पद्मा०–विजयेनं आपल्या तोंडानं सांगितलंन कीं आईनं कृष्णरायाला दिलेला तो लाडू खाल्यापासून आपल्या डोक्यांत कांहीं चमत्कारिक होऊं लागलं म्हणून! एकून हे लाडू माझ्या कृष्णरायाला वेड लावण्याकरितां केले आहेत तर! देवा! यांच्या मनांत आहे तरी काय? यापेक्षां मी अन् कृष्णरायानं दोघांनींही जर या विजयानगरांतून बाहेर पाय काढला तर काय होईल! हिंमतरावाला सांगावा आपला बेत. अन् त्याचा जसा रुकार पडेल तसं करावं.

[जाते.]

प्रवेश ४ था.

स्थल—राजमहालांतील–भोजतिरमलाची खोली.

प्रवेश–भोजतिरमल व शंभूराव.

शंभू०–(हलक्या स्वरानें) दोघेजण कबूल झाले आहेत.

भोज०–पण ते अगदीं पक्के विश्वासू आहेत ना?

शंभू०—त्याबद्दल नको शंका.

भोज०—पण त्यांना चांगले लालचून ठेविले आहेत कीं नाहीं?

शंभू०—हो अगदीं!—त्यांना सेनापती आणि दुय्यम सेनापती करण्याचीं वचनं दिलीं आहेत.

भोज०—हरकत नाहीं. पण त्यांना आपलीं खरीं नांवं व गांवं बदलायला सांगितलीं आहेत कां नाहीं!

शंभू०—तें कसा विसरेन! तें तर सगळं पहिल्यांदाच करून टाकून त्यांना चांगलं पढवून देखील ठेवलं आहे.

भोज०—खुना नंतर—त्यांना धरल्यावर—त्यांना तुरुंगांत जावं लागेल आणि दरबारांत चौकशीच्या वेळीं रामरायाचं नांव घ्यावं लागेल हेंही पण त्यांना अगोदरच सांगून ठेवलं आहे का? नाहीं तर आयत्या वेळीं होय नाहीं कांहीं करूं लागले म्हणजे उलट तुमच्या अन् माझ्या दोघांच्या गळ्याला येऊन भिडायचं!

शंभू०—काकासाहेबांनीं त्याबद्दल बिलकूल काळजी नको करायला. सगळ्या गोष्टी मी त्यांना सांगून ठेविल्या आहेत. तुम्ही अगदीं निर्धास्त असा.

भोज०—हें पहा, आणखी असं करा कीं खुद्द रामरायाच्या तलवारी त्यांच्या स्वाधीन करा; आणखी तसंच रामरायाच्या वस्त्रांपैकीं एकादें वस्त्र प्रत्येकाच्या जवळ असूं द्या.

शंभू०—हो. तेवढं करतों. म्हणजे पुढें पुराव्याला तें बरं पडेल! हें मात्र यापूर्वीं माझ्या लक्षांत आलं नव्हतं!

भोज०—आणखी त्यांच्या अंगावर देखील त्यांच्या दागिन्यांपैकीं एखाददुसरा दागिना घालायला द्या. मी ते जामदारखान्यांतून आणवून ठेविले आहेत आज. रामरायाचीं वस्त्रेंही त्याच्या मंदिरांतून मी आणवून ठेविलीं आहेत.

शंभू०—मग मला वाटतं काकासाहेबांनीं तीं त्यांना समक्षच द्यावींत, म्हणजे त्यांना विश्वास पटेल आणि हातीं घेतलेलं काम उरकायला धीरही येईल.

भोज०—पण मी म्हणतों—असं करण्याचं प्रयोजनच नाहीं मुळीं—त्यांचा तुमच्यावर विश्वास नाहीं असं कसं होईल?

शंभू०—माझ्यावर विश्वास नाहीं असं नव्हे—पण असलं धाडसाचं कृत्य करायला धैर्य यायला आपल्या सारख्यांच्या कडूनच त्यांना धीर मिळाला म्हणजे प्रसंगीं कितीही त्यांच्यावर दुसरं भीतीचं कसलंही जरी दडपण पडलं तरी ते उलटायचे नाहींत, कचरायचे नाहींत अथवा डगमगायचे नाहींत. म्हणून म्हणतों—

भोज०—(ओंठ चावीत व विचार करीत तटस्थ उभा राहतो.)

शंभू०—(त्याचा झोंक जाणून) आपण त्यांच्याशीं कांहीं बोलूं नये पाहिजे तर!

भोज०—तर?

शंभू०—तर काय? आपल्या हातांनीं त्यांना तीं रामरायाचीं वस्त्रें आणि तीं भूषणें

दिलीं म्हणजे झालं. मग मनोमनीं साक्ष! ते समजतील मनांत—

भोज०—(स्वगत) पण येवढ्यानं सुद्धां यांत माझं आंग आहे असं कळणार! हें न कळतां सगळं उरकेल तर उत्तम.

शंभू०—कां विचार कसला चालला आहे?

भोज०—'विचार'! विचार कसला? कुठं आहेत ते? त्यांना तुम्ही घेऊन येणार होताना आपल्या बरोबर?

शंभू०—हो, आणले आहेत कीं—बाहेर आहेत ते. त्यांच्या बरोबर आपलं ठरल्या-प्रमाणें महाराजांना भेट म्हणून कांहीं मिठाई व फळफळावळ देऊन त्यांना घेऊन आलों आहें मी आपल्या बरोबर.

भोज०—अस्सं! तर त्यांना आंत बो-लवा—अन् त्यांना घेऊन तुम्ही जा कृष्ण-रायाकडे ती भेट घेऊन आणि येतांना त्यांना राजांचं शयनमंदीर दाखवून ठेवा. अन् त्याची वाटही पण दाखवा नीट. रात्रीं त्यांना तुम्हीं इथवर आणून सोडा—पुढें इथून तिसरा एक इसम त्यांना कृष्णरायाच्या नि-जायच्या खोलींत घेऊन जाईल म्हणून सांगा. आणखी एक तबक माझ्याकडे आण्याचा बहाणा करून त्यांना माझ्याकडे घेऊन या म्हणजे त्यांना बक्षिसादाखल मी रामरायाचीं वस्त्रें आणि भूषणें देईन.

शंभू०—बरं तर—मी जातों. [जातो.]

भोज०—काय वाजलं बरं! कुठलं तरी दार वाजलं खास! आमचं बोलणं तर नाहीं ऐकलं कोणी! छेः इथं कोण येणार ऐकायला? पण नुसत्या भीतीनं काय मलां धडकी भरल्यासारखी झाली आहे ही! माझे हातपाय देखील लटलट कापूं लागले? मी शंभूरावाला सांगितलें आहे कीं त्या मारेकऱ्यांना माझ्याकडे घेऊन या, त्यांना मी आपल्या हातांनीं रामरायाचीं वस्त्रं, भूषणं देतों म्हणून. पण आतां मला असं वाटूं लागलं आहे कीं, ते माझ्या दृष्टीस न पडतील तरच बरं! शंभूरावालाच सांगतों म्हणजे झालं हीं वस्त्रें आणि भूषणं बाहेरच्या बाहेर त्यांना नेऊन द्यायला. हीं माझ्या खोलींतून नेऊन त्यानेंच त्यांना नेऊन दिलीं म्हण[जे] साहजिकच त्यांची खात्री होईल. यापे[क्षा] जास्ती खात्री काय पाहिजे त्यांना घ्यायला? आजची रात्र येवढी पार पडलं म्हणजे अर्धंअधीक काम झालं. पुढ[चं] पाहतां येईल मग. हिंमतरावाचं विजयेशी लग्न ठरलं म्हणून आज राजभुवनांतल्या सगळ्या लोकांना कुसंबा पाजवून टाकतों, व त्यांत थोडा अमली पदार्थ टाकिला कीं सगळी मंडळी जागच्याजागीं बेशुद्ध होऊन निपचित पडतील. मग या मारेक-ऱ्यांचा इथं रिघाव व्हायला बिलकूल पंचाईत पडायची नाहीं. त्यांचा वाड्यांत एकदां रिघाव झाला म्हणजे त्यांना कृष्ण-रायाच्या शयनमंदिराच्या दालनापर्यंत सहज नेतां येईल. शंभूरावाला माझ्या खोलीपर्यंत त्यांना आणून पोंचवायला सांगतों. आणि इथून कृष्णरायाच्या निजायच्या खोलींत मलाच घेऊन गेलं पाहिजे त्यांना. अन्

त्यांना तर मी माझ्या नेहमींच्या वेषांत दि-सून उपयोगाचं नाहीं. शंभूरावाकडून,—'तिसरा एक सायीदार तुम्हांला कृष्णरायाच्या खोलीकडे घेऊन जायला इथं तयार असेल त्याच्या मागोमाग मुकाट्यानं जा'—म्हणून त्यांना सांगून ठेविवतों, म्हणजे सगळं सुयंत्रितपणें अन् बिनबोभाट पार पडेल ! (विचारयुक्त) हो. पण मी शंभूरावाला हें एक विचारायला विसरलोंच कीं, यांनीं आजपर्यंत कुठं असलीं कामं केलीं [illegible] उपयोगी ! भेदरून [illegible]यचे ते आयत्या वेळेला सरावलेले असले [illegible]णजे मग बघायला नको. मग अगदीं निर्धास्त राहायला सांपडेल. पण ह्या गोष्टीचा सर्व गोष्टींच्या अगोदर विचार करायला पाहिजे होता. पहिल्यानें मला सुचलं नाहीं हें. पण शंभूरावानं ज्यांना आणलं आहेन् ते चांगले सरावलेले आणि कसलेले असल्याशिवाय तो काय म्हणून आणील त्यांना ? तरी पण त्याला विचारलंच पाहिजे यासंबंधानं. (स्तब्ध—व पुनः विचारयुक्त होऊन) शंभूरावानं हे मारेकरी गांठले असतील तरी कसे, याचं मला सगळ्यांत मोठं गूढ पडलं आहे ? पुढंमागं हा शंभूरावच जर माझ्यावर उलटला तर हेच मारेकरी तो माझ्यावर घालायला देखील मागंपुढं पाहणार नाहीं ! छेः कोण भयंकर कल्पना या ! एकूण आज माझे प्राण मी सर्वस्वीं ह्या शंभूरावाच्या हातांत दिले तर ! (विचार बदलून) अथवा आपला सगळा डाव साधला आणि याला आपली दिवाणगिरी सांगितली म्हणजे हा आपला मिंधाच होणार कीं नाहीं ? यदाकदाचित् उलटलाच हा, तर आंतून रामराजाला हा सामील आहे असा याच्यावर आरोप ठेवून त्या गुलाबाप्रमाणेंच याचीही वाट लावली म्हणजे झालं! शंभूराव त्यांना घेऊन [illegible] रायाकडे गेला असेल. त[illegible] [illegible] त्या दों[illegible] [illegible] ध्यानांत येईल !

([illegible]

प्रवेश ५ वा.

स्थलः—कृष्णरायाचें शयनमंदीर.

प्र०—कृष्णराय व पद्मावती.

पद्मा०—कृष्णराय, काकासाहेबांनीं राजवैद्याकडून विजयेला औषध देऊन तिला जरी बरी केली, अन् तिचं आणि हिंमतरावांचं उद्यां लग्न करायचं जरी त्यांनीं ठरविलं आहे तरी त्यापासून मला विशेषसा आनंद होत नाहीं.

कृष्ण०—तें कां ?

पद्मा०—तें कां तें नाहीं मला सांगतां येत ! पण विजयेच्या वेडाचं कारण काय हेंच राहून राहून माझ्या मनांत येतं. अन् त्यानंच अतांशा माझं डोकं अगदीं भणाणून जातं ! विजया अन् तूं दिरवील म्हणालास कीं काकूंनीं तो लाडू तिला खायला दिला

अन् त्यापासून तिची अशी अवस्था झाली. तें सगळं माझ्या डोक्यांत उभं राहतं, अन् मला नाहीं नाहीं तीं भयंकर स्वप्नं पडतात. काल तर मी स्वप्नांत असं पाह्यलं कीं, तूं त्यांतला एक लाडू खाल्लास आणि त्यामुळं तुलाही विजयेसारखंच वेड लागलं ! मी जागी झालें आणि मग मला राहवेना. मी तुझ्या खोलीशीं येऊन कानोसा घेतला तों तुला गाढ झोंप लागलेली. तुला अशी झोंप लागलेली पाहून मी परत आपल्या खोलींत गेलें अन् मग अंमळ कुठें जरासा माझा डोळा लागला. हें बघ तुला सांगून ठेवतें कीं, तुला काकांनीं अथवा काकूंनीं कोणी जरी कांहीं खायला दिलं तरी विजयेला अन् मला असं दोघींना दिल्याशिवाय तूं तें खात जाऊं नकोस.

कृष्ण०—तें कां ?

पद्मा०—तें कां तें विचारूं नकोस. मला त्या लाडवाचाच कांहीं संबंध दिसतो आहे विजयेच्या वेडाशीं ! म्हणून म्हणते—

कृष्ण०—बरं तर. मी कांहीं तुझ्या सांगीच्या बाहेर नाहीं.

पद्मा०—येवढंच सांगण्याकरितां आलें होतें मी तुला.

कृष्ण०—ताई, उद्यां विनयाताईचं लग्न, अन् आपले रामराजे नाहींत इथं !

पद्मा०—हं ती गोष्टसुद्धां काढायची नाहीं इथं. तुला ठाऊकच आहे सगळं मी इथं कसकशी वागत आहे ती. (डोळ्यांत पाणी आणून) नाहीं तर नाहीं ! आपण काय करणार त्याला. आपल्या दैवीं पाहिजे ना सारं ? आपण देवाजवळ जर तसं दिलंच नसलं तर देव तरी कुठून देईल तसं आपल्याला ?

कृष्ण०—ताई, तूं डोळ्यांनीं पाणी नको काढूंस असं. मी मोठा झालों अन् माझ्या हातीं अधिकार आला म्हणजे पहिल्यांदा रामरायांना बोलावून आणीन मी.

पद्मा०—तिकडच्या संबंधानं तुझी जरी एवढी खात्री असली तरी पुरे आहे. पण इथल्या सरदार मंडळींनीं—या शंभूराव मान्यासारख्या—मेल्या मानकाप्यांनीं तिकडच्या संबंधानं एक एक काय तरी उठवलं आहे म्हणून सांगत होते हिंमतराव ! पण तें सगळं आज गिळूनच गेलं पाहिजे मला. हिंमतरावांखेरीज इथले बहुतेक सरदार तिकडच्या विरुद्ध आहेत. म्हणून हिंमतरावांनाही इतक्यांतच कांहीं करतां येत नाहीं. पण तिकडचीं त्यांना पत्रंबित्रं येतात. व त्यांच्या सल्लयानंच पुढं कसं काय करायचं तें ठरवायचं आहे.

कृष्ण०—ठरेलगं. पण उद्यां हिंमतरावांच्या अन् ताईच्या लग्नाला कांहीं येत नाहींत ना ते ?

पद्मा०—छेः. ती कशाला पाहिजे आशा ?

कृष्ण०—छेः ताई. तूं डोळ्यानं पाणी नको काढूंस असं. [तो तिचे डोळे पुसतो]

पद्मा०—अरे हें मुद्दाम काढून कां येतं ?

तिकडची आठवण होऊन माझी ही अशी स्थिति होते, याला मी तरी काय करूं? (डोळे पुसून) बरं, आतां बरीच रात्र झाली आहे. नीज तूं, अन् मीही निजतें जाऊन.

कृष्ण०–[जांभई देऊन] मलाही झोंपच येते आहे.

पद्मा०–येते तर, नीज तूं.

कृष्ण०–[निजतो] हा निजलों मी. जा, तूंही नीज जा. [ती जाते]

पद्मा०–हे रात्रि! आज रात्रीं तरी तूं मला सुखाची निद्रा दे. घोर आणि भयंकर स्वप्नांनीं मला भिववून अस्वस्थ करूं नकोस. मनुष्याला एक दोन चार घटका जरी गाढ झोंप मिळाली तरी तिच्या योगानं त्याला पांच सहा घटका स्वप्नांवर स्वप्नं पडून चाळवलेल्या झोंपेपेक्षां देखील फार हुषारी वाटते. दिवसा आंगभर कामधंदा अन् मोलमजूरी करून आपल्या झोंपड्यांतून फाटक्या तुटक्यातरटावर पडून निजणाऱ्या गोरगरीबांना जी स्वस्थ झोंप येते तिचा एक लवलेश देखील राजवंशांत जन्मून सुखांत मऊ मऊ पऱ्यांच्या पलंगावर पडणारांच्या वांटयाला येऊं नये म्हणजे हें खडतर दुर्दैवच नव्हे का! म्हणून म्हणतें आज तरी स्वस्थ येऊं दे मला झोंप. [जाते]

प्रवेश ६ वा.

स्थल—भोजतिरमलाचा निद्रामहाल.

चंपावतीस स्वस्थ झोंप लागली आहे.

भोज०–हिला किती स्वस्थ झोंप लागली आहे! अन् मला झोंपेचा लवलेश देखील नाहीं! ज्याच्या मनांत भयंकर विचारांचं काहूर उसळून गेलं आहे त्याला येणार कोठून झोंप! कालचा दिवस मला किती लांबट वाटला! तो संपतां संपेना. आणि दिवस संपून संध्याकाळ आली तेव्हां पासून हा आतांपर्यंतचा वेळ तर मला एखाद्या युगाप्रमाणें वाटतो आहे! यांतील प्रत्येक क्षण वर्षाप्रमाणें जात आहे. मला वाटतें आतां बहुतेक मध्यरात्रीचा अंमल झाला असावा. या वेळीं जिकडे तिकडे अगदीं सामसूम आणि स्वस्थ झालं आहे. वारा देखील बंद पडला आहे. सारं जग काळ्या कुट्ट काळोखानं अगदीं गडद् भरून गेलं आहे! जणूं काय भयंकर कृत्यें उरकायला ह्या रात्रीचं अनुमतच आहे! हा काळोख, ही रात्र, आणि ही शांतता—पण मधून मधून हा होणारा किर्र शब्द कुठून ऐकूं येत आहे! छेः या रात्रीचंच किरकिरणं हें! आणि घूऽऽ घूऽऽ करून जी ही ओरड चालली आहे ही कुठली? घुबडाचा घूत्कार तर नाहीं हा! (इतक्यांत मध्यरात्रीचा डंका होतो) हा मध्यरात्रीचा डंका हो. हीच हीच, वेळ ठरली होती त्यांची

यायची! या डंक्याच्या आवाजाबरोबर तें उरकून टाकायला पाहिजे होतं! पण ज्या अर्थी अजून ते आले नाहींत त्या अर्थी पुढच्याच दरवाज्यावर कोणी अटकावलं तर नसेल त्यांना? राजमहालाचा गुप्त दरवाजा तर मी केव्हांच उघडून ठेविला आहे. एकदां थोरल्या दरवाजांतून आंत आलें म्हणजे इथं यायची कांहींच पंचाईत नाहीं पडणार. मला वाटतं इतक्यांत येतीलही ते! तर आपण पोषाख करून तयार रहावं. म्हणजे माझ्यामुळं नको आणखी खोळंबा. [एक काळा पोषाख व काळी टोपी घालतो व आरशांत उभा राहून पाहतो.] या पोषाखांत स्वतःला पाहून माझं मला देखील भय वाटतं! आणि माझं मला देखील या पोषाखांत ओळखतां येणार नाहीं! मग दुसऱ्यांना कशी ओळख पटणार? (पाहून) ही जागी झाली कीं काय? हिनं जागी होऊन मला या पोषाखांत पाहिलंन तर भीतीनं ही गर्भगळित होऊन जाईल! छेः ही चक्क घोरते आहे. हिला अगदीं गाढ झोंप लागली आहे. बाहेरचीच चाहूल ही! (चाहूल ऐकून) दरवाजाच वाजला. मला वाटतं तेच आले असावे! तर मी अगदीं वेळेवरच तयारीला लागलों म्हणायचा! तर आपण आपल्या शय्यामंदिराच्या बाहेर जाऊनच उभं रहावं. पण मी गेलों आणि इकडे ही जागी झाली, आणि पलंगावर मी नाहीं असं हिनं पाहिलन तर काय वाटेल हिला? अथवा हिची समजूत करायला काय उशीर!—आलेच वाटतं ते. [बाहेर जातो.]

[मारेकरी येतात व शंभूराव परत जातो.]

भोज०—[मारेकऱ्यांस " आपल्या मागून सावकाश हळू या म्हणून खुणावतो] (व ते कृष्णरायाच्या निद्रामंदिरांत जातात. एकाचा धक्का लागून एक दरवाजा मोठ्यानें वाजतो. भोज व ते भीतीनें कचरतात. व कांहींसे थबकतात.) (त्यांस) तरी सावकास या म्हणून सांगितलं होतं! (स्वगत) दरवाजा वाजलेला ऐकून कोणी यायचं तर नाहीं! छेः, कोण येणार अशा मध्यरात्रीचं उठून? अन् जागं तरी कोण होणार अशा वेळीं एवढ्याशा आवाजानं! मला वाटतं अशा वेळीं मोठा धरणीकंप झाला तरी देखील निजलेले लोक जागे व्हायचे नाहींत. मग एवढ्याशा धक्क्यानें हे कुसुंबा घेऊन अंमल केलेले लोक जागे कसे होणार! (त्यांस) तुम्ही घाबरूं नका. आपलीं हत्यारं उपसा आणि ज्या कामाकरतां तुम्ही आलां आहां तें काम अगोदर उरकून घ्या.

[इतक्यांत एका बाजूनें पद्मावती येते.]

पद्मा०—हो दरवाजाच वाजला. केवढ्यानं वाजला पण तो! मला वाटतं कीं वीज पडून एखादी इमारतच कडकडून पडली कीं काय कोण जाणें! अशा शांत वेळीं थोडंसं जरी कुठं खुजबुजलं तरी तें मोठ्यानं ऐकू येतं! (पाहून घाबऱ्या मुद्रेनें) कृष्णरायाच्या शय्यामंदिराचा हा दरवाजा

तर उघडा आहे. हा दरवाजा वाजला की काय ? (घाबरून जाऊन) हा दरवाजा उघडून तर नाहीं कोणी आंत गेलं ! [पुढें पाऊल टाकते. तो कृष्णरायावर त्या मारेकऱ्यांनीं आपलीं हत्यारं चालविलीं आहेत–कृष्णराय किंकाळी ठोकतो. मारेकरी त्याच्या गळ्यावर हात टाकण्यास कचरतात. मारेकऱ्यांस हत्यारं उचलून वार करण्यास भोज खुणावतो. पद्मावती हा प्रकार पाहून किंकाळी ठोकते. तिची बोबडी वळते. त्याबरोबर भोज कचरतो. व दरवाजाबाहेरं जाऊन आपण घेतलेला काळा पोषाख टाकून देतो.]

भोज०–(स्वगत) त्यांच्या वारानं उडालेल्या रक्ताच्या चिरकांड्या तर उडाल्या नाहींत माझ्या अंगावर ? हा वरचा अंगरखा काढून टाकला म्हणजे झालं ! (एकदम येऊन उघड) काय ! आहे काय ! ओरडलं कोण ? किंकाळी कोणी ठोकली ? ही किंकाळी ऐकून मी झोंपेंतून दचकून जागा झालों ! अरे खून ! खून ! ! खून ! ! ! दरवाजे बंद करा, अन् धरा, धरा, ह्या पळून जाणाऱ्या हरामखोरांना. (भोज त्यांस आडवूं लागतो तों ते मारेकरी भोजावर हत्यार उगारून त्यास भेवडावून पळून जातात; व भोजतिरमल कृष्णरायाचे जवळ जाऊन.) कृष्णराय ! कृष्णराय ! !—

[चंपावती व विजया एका बाजूस येतात.]

कृष्ण०–(तुटक शब्दांनीं) का-का ! का–का–! तुम्हींच का हो—

भोज०–(स्वगत) हा माझं नांव तर नाहीं घेत ! (उघड) कृष्णराय, कायरे ?

(असें म्हणून त्याचा गळा दाबतो तोंच त्याचे प्राण जातात.)

कृष्ण०–राऽऽम !

पद्मा०–आ–आ–आ–(किंकाळी ठोकते व मुकी होते.)

भोज०–पद्मावती ! पद्मावती ! (तिला बोलतां येत नाहींसें पाहून) अरे हिला बोलतां येईनासं झालं ! (आपल्यास बोलतां येत नाहीं अशी ती खूण करते]

[इतक्यांत चंपा व विजया बाजूस असलेल्या पुढें येतात. व कृष्णरायाचा खून पाहून]

चंपा०–अगबाई, कृष्णरायाचा खून ! तरी म्हटलं मला एकटीला टाकून कुणीकडे जायचं ? अन् ही पद्मावती कां अशी करते !

भोज०–कृष्णरायाचा खून पाहून तिची वाचा बसली ! कृष्णरायाची किंकाळी ऐकल्याबरोबर मी जो दचकून जागा झालों तो इकडंच आलों तों हा प्रकार ! पण ही विजया कशाला आली इकडं—

विजया०–मी कां ? हो म्हटलं माझ्या लग्नाचं देवदेवक बसवायला तुम्हीं इकडं आलांत, अन् मला हांक मारलीत ! अगबाई वाजंत्री कुठं आहेत पण ते ! अन् फुलं, अन् नारळ, अन् सुपाऱ्या–कुठं आहे तें सगळं पुनेचं ! त्या रोंवळ्या अन् तीं मुसळं कुठं आहेत ? त्यांत गहूं घालून चांगले चेंचूं या ! रक्तंच काढूं त्यांचीं

चेंचून चेंचून ! माझं अन् हिंमतरावांचं अशीं दोघांचीं डोकीं घालून चेंचा त्यांत !

भोज०—मला वाटलं हिचा भ्रम गेला असेल ! पण छेः. पुन्हां ही पूर्वींप्रमाणें बहकूं लागली वाटेल तसं ! हिच्या लग्नाला हें एक दुसरंच विघ्न ! (चंपावतीस) तूं या दोघींना इथून घेऊन जा !

[ती दोघींस घेऊन जाऊं लागते इतक्यांत जामदार व शिपाई मारेकऱ्यांस धरून घेऊन येतात.]

जामदार—हे मारेकरी पळून जात होते; पण खून चढल्यामुळें ह्यांना रस्ता मिळेना; दरवाजे लावले गेल्यामुळें हे पकडले गेले !

भोज०—(क्रोधाविर्भावानें) पोलादी सळया लाल तापवून यांचे डोळे काढवा. अन् सांडसानें यांच्या अंगाचे लचके तोडवा—हरामखोर—नाहीं तर ! राजहत्येसारखं घोर पातक केलंत ! बोला, कोणाच्या सांगीवरून केलंत तुम्ही हें कृत्य ? महाराजांचा खून करायला कसे झालांत तुम्ही उद्युक्त—

मारेकरी.—महाराज, सगळं कबूल करतों आम्ही, पण आम्हांला जिवदान मिळेल तर—

भोज०—' जिवदान ! ' अगोदर सांगा तर खरं. मग पाहूं.

मारेकरी.—रामरायांनीं सांगितल्यावरून हें काम उरकलं !

भोज०—' रामरायानं सांगितल्यावरून हें काम उरकलं ' ! अस्सं ! म्हणजे एकंदरींत हा प्रकार फारच भयंकर आहे तर ! जामदार, यांना नाईकांच्या स्वाधीन करून तुरुंगाकडे घेऊन जायला सांगा. उद्यां उजाडलं नाहीं तों अगोदर ह्याच गोष्टीचा छडा लावला पाहिजे ! यांच्याजवळ असलेली सारी चीजवस्त तुरुंगावरील अधिकाऱ्यांना म्हणावं नीट कसोसीनं नोंदून ठेवा. जा, जा ह्यांना घेऊन. त्या रामरायाला धरून आणवून त्याचा शिरच्छेद केल्याशिवाय यापुढं मला झोंप नाहीं यायची ! माझ्या पुतण्याची—अर्थात कृष्णरायाची—गादी मिळविण्याकरितां काय ह्याचीं हीं एक एक कारस्थानं, आणि अघोर कृत्यं ! ! (कृष्णरायाकडे पाहून) निःश्वास टाकून—[ते जातात.] राम ! राम ! राम ! परमेश्वरानं काय दाखविलान हा दिवस ! हे गेले इथून हें एक बरं झालं. [स्वगत] मी काळा पोषाख काढून येऊन कृष्णरायाचा गळा दाबलेला पद्मावतीनं पाहिलान् खास ! तिला माझाच तर नाहीं संशय आला ! अथवा असंच उठविलं तर ! कीं आपल्याला राज्य मिळावं म्हणून कृष्णरायाचा खून करायला रामरायाच्या सांगण्यावरून हिनंच मारेकरी घातलेन् ! हिची वाचाही बंद झाली आहे. तेव्हां हें असं उठवून द्यायला कांहीं हरकत नाहीं म्हणजे आपल्या अंगावर तरी नको शेकायला ! बस्स हीच तोड ! रामराजांचे दागिने आणि शेले हिनंच त्या मारेकऱ्यांना दिलेन् असं त्यांच्याकडून कबूल करविलं म्हणजे झालं !

(पडदा पडतो)

अंक ४ था.

प्रवेश १ ला.

स्थल.–राजवाडा पद्मावतीचा महाल.

प्रवेश.–हिंमतराव व पद्मावती.

हिंमतराव०–अरेरे! ह्या पद्मावतीची काय ही अवस्था झाली आहे! कृष्णरायावर हिचं किती अलोट प्रेम! त्या प्रेमामुळंच–त्याचा खून पाहून हिची जी बोबडी वळली ती वळली!–हिला बोलताही येईना! असं असून पद्मावतीनंच कृष्णरायाचा खून करणाऱ्या त्या मारेकऱ्यांना रामरायाचे शेले आणि दागीनें दिले म्हणून ते मारेकरी सांगतात! तेव्हां काय म्हणावं काय या प्रकाराला! [पद्मावतीस] पण तुम्हांला ऐकूं येतंना?

पद्मा०–[ती आपल्यास सर्व ऐकूं येत असल्याचें दर्शविते व हिंमतरावास भोजतिरमलाविषयीं आपला संशय असल्याचें खुणांनीं दर्शविते! भोजकाका आपण येतांच बाहेर जाऊन काळा पोषाख काढून टाकून पुन्हा आंत कसा आला, व नंतर त्यानें झोंपेंतूनच उठून आल्याची कशी बतावणी केलीन् व मग कृष्णरायाचा गळा कसा दाबला, हें सर्व खुणांनीं दाखविते. व रामरायाचे जे कपडे मारेकऱ्यांजवळ सांपडले ते आपल्या महालांतून मंजुळेकडून भोजानें मागून नेल्याचें खुणांनीं सांगते.]

हिंमत०–एकंदरींत जामदार-मन्याबापूयाच्या सांगण्याला आणि हिच्या सांगण्याला अगदीं मेळ बसतो! मारेकऱ्यांजवळ रामरायाचे जे दागिने सांपडले ते भोजानींं त्याच दिवशीं सकाळीं आपल्याकडून मागून नेल्याचं तो सांगत होता! तेव्हां या काकासाहेबांचेच कावे दिसतात हे सारे! तेव्हां यापुढं आपल्याला फार सावध राहिलं पाहिजे इथं!

हिंमत०–[मन्याबापू येतो. त्यास] मन्याबापू, काय आणखी काय आहे बातमी!

मन्या०–बातमी! खुनाचा समदा सोध लागावा अशी है!

हिंमत०–ती काय?

मन्या०–परवां सारखीच–कालच्याबी रातीची गोष्ट पगा–भर मदरात जाली व्हती. मदरातीचा डंका नुकताच झाला व्हता. अन् इतक्यामंदी काकासाहेब जामदारखान्यानजीक आलं–अन् मला हाक मारूनशेनी म्हंगालें–मन्याबापू, मन्याबापू त्ये त्येवड रामरायांचे दागीन आन हकड. अरे बापरे! त्ये त्येंच वटारलेलं डोळं बघूनशेनी मी तर लई भेदरूनच गेलों! अरे बापरे त्ये अजूनी दिसत्याती मला!

हिंमत०–आतां तर संशयच नको! काकांचंच–काकांचंच–सारं कृत्य हें! [त्यास] बरं पण पुढें मग—

मन्या०–म्होर काय म्हून इचारता? म्होर–तयंच खुटीवर योक होता फुलांचा गजरा. तो घेतला स्वारीनं अन् जी सवारी गेली ती शंबूराव शंबूराव म्हनूनशेनी लागली हाका माराया अन् शिवरायांचा पुतळा

नाहीं का तयं उबा त्येच्या हातामंदी त्यो हार–दागीना म्हूनशेनी दिला त्येनी. अन् बोलल्ये कायससं त्येच्याच संग अन् मग महाराजांच्या पलंगाकडं जाऊनशेनी त्येंचा जनू काय गळा दाबल्यावानीच करूं लागलं !

हिंमत०–त्याचंच त्याचंच कृत्य हें ! त्यांना हा खून चढला आहे खून ! झोंपेंतला दिसतोय हा सारा प्रकार !

मन्या०–अन् मग एकदम खून ! खून ! धरा, धरा, म्हनुनशेनी आरडले ! आरडले अन् झाले जागे. अन् जागे झाल्ये तवा लगच आल्ये सुद्दीवर. अन् मग पट्‌करन आपल्या निजायच्या खोलींत गेलं अन् कवाड घेतलं लाऊनशेनी पट्‌करनं !

हिंमत०–ताई ! तुमचाच संशय खरा आहे. राज्यलोभाला गुंतून तुमच्या ह्या काकांनींच मारेकरी घालिवलेन् हे ! ह्या संबंधानं मला आतां तरी मुळींच शंका उरली नाहीं ! शंभूरावाचंही त्यांनीं नांव घेतलं नाहीं ! तो तोंडपूजाही त्यांना सामील असेल. एरवीं ह्यांना हे मारेकरी कुठून पैदा होणार? मन्याबापू, मला वाटतं या खुनाची आठवण ह्याच्या डोक्यांतून सगळी पार जाईपर्यंत हें असंच रोज चालणार !

मन्या०–मी तर दोन दीस तरी बगतूया.

हिंमत०–तर मग आज मी येईन इयंच निजायला. आपण जागत बसूं. अन् तूं आपल्याजवळ थोडे खरोखरीचे दागिने ठेव.

मन्या०–ठीक है.

हिंमत०–जा तर तूं. [तो जातो.] ताई, आज रात्रीं मी इथं येईन म्हणजे काय आहे, काय नाहीं तें सारं प्रत्यक्षच पाह्यला मिळेल ! बरोबर एक दोघां सरदारांनाही घेऊन येतों म्हणजे त्यांची खात्री होईल. अन् मग त्यांना आपल्या बाजूचे करून घ्यायला मुळीं देखील उशीर लागायचा नाहीं.

पद्मा०–[बाशिंगाची खूण करून त्याचें व विजयेचं लग्न ठरलं होतं तें विजयेच्या वेडामुळें फिसकटलें कीं काय म्हणून त्यास विचारते व विजया पुनः वेडी होण्याचें कारण तरी कृष्णरायाचा खून भोजानें केल्याचें तिनें पाहिलें असावें असें ती दर्शवितें.]

हिंमत०–हो, वेडांतच "आपलं अन् माझं अशीं दोघांचीं डोकीं रोंवळ्यांत घालून मुसळांनीं चेंचून चेंदा करून टाका" असं कायससं म्हणाल्याचं मन्याबापू सांगत होता खरा ! [पद्मावती विजया तसंच बोलल्याचें आपणही ऐकल्याचें त्यास खुणेनें सांगतें.]

[इतक्यांत विजया पळत येते.]

ताई, ही विजयाच आली इकडं ! पण पळत कां बरं येते आहे ही अशी ?

विजया.–[संभ्रमानें] अगबाई, हे कुणीकडे इकडं ? देवक ठेवलंय अन् मा... अन् यांचं डोकं कुटायचं आहे नाहीं क... खळ्यांत घालून ? म्हणून आलांत वाटतं

छान् ! छान् ! छान् ! छान् ! छान् झालं बाई देव पावला !

[चंपा व भोनतिरमल घाबऱ्या घाबऱ्या प्रवेश करितात.]

चंपा.—माझा हात सोडवून घेऊन काय पण वाऱ्यासारखी पळून गेली !

विजया.—[पद्मावतीची नरडी दाबूं लागते व ओरडते. हिंमतराव हात सोडवितो] खून ! खून ! खून ! धांवा, धांवा, धांवा ! [गळा सोडून आरडत पळूं लागते.]

हिंमत०—हा प्रकार काय असावा बरं ? अथवा आपल्या बापाचं सारं कृत्य पाहून तर नसेल ही करीत असं हें वेडांत ?

भोज०—कारटे ! चल, तुला कोंडूनच टाकली पाहिजे ! [तिला रट्टा देऊन घेऊन जाऊं लागतो—चंपाही तिचा एक हात धरते.] (स्वगत) हा हिंमतराव कां इथं ? या दोघांचीं कांहीं खलबतं तर नाहीं चाललीं मी हिच्यावर त्या मारेकऱ्यांच्याकडून कुभांड घेविवलं म्हणून ? [हिंमतरावास] हिंमतराव, तुम्ही कुणीकडे ?

हिंमत०—इकडंच आलों होतों—विजयेच्या समाचाराला.

भोज०—अस्सं !

हिंमत०—अन् तसंच म्हटलं ताईसाहेबांचाही समाचार घ्यावा.

भोज०—छेः छेः छेः ही आंवरत नाहीं मला. या हो या, तुम्ही धरूं लागा जरा हिंमतराव !

विजया.—मला कोंडून घालणार कां कोंडून ? कां तें ? काय म्हणून ? काय केलंय मी कोंडून घालायला ? अगबाई ! असं कोंडून चांगल्या शहाण्या माणसाला वेड लावणार हे !

हिंमत०—[धरूं लागतो.]

विजया—हें काय ? तुम्हीं देखील मला कोंडूनच घालणार एकून ! कोंडून नका घालूं गडे ! हिंमतराव, ही बघा तुमच्या बरोबर मुकाट्यानें येतें मी.

हिंमत०—चल तर मुकाटयानं. धर, हात धर माझा.

[विजया त्याचा हात धरते व ते सर्व तिला घेऊन जातात.]

पद्मा०—[आपल्यास कांहीं बोलतां येत नाहीं व रामराजाकडील पत्र आलें नाहीं म्हणून याबद्दल खेद प्रदर्शित करते. मी आपल्या भावाचा खून करण्यास मारेकरी घालीन काय ? मग मी माझ्या स्वतःवरच कां नाहीं घालणार ? म्हणून आपल्यास स्वतःस विचारते ! दुर्दैव आपलें म्हणून कपाळावर हात मारून घेते.]

[जाते.]

प्रवेश २ रा.

स्थल—राजवाडा.

प्रवेश—मन्याबापू, हिंमतराव, दोन सरदार व पद्मावती.

मन्या०—झोंच वखत बगा अक्शी झोंच ! तकडं मदरातीचा डंका पडला कीं

हकडं स्वारी उठलीच, अन् शामदान घेऊनशेनी झोपेंतंच लागली धांवाया जामदारखान्याकडं दागीन मागाया. ह्ये ऐकलं का कवाड वाजल्येल. अतां परत्यक्शच पगा समदं.

हिंमत०—मन्याबापू, आज तुम्हांला सांगितली तशी तुम्ही बतावणी करा आणि त्यांना हे दागीने द्या आज त्यांनीं मागितल्याबरोबर. [ते व सरदार दारांच्या आड होतात].

[इतक्यांत भोजातिरमल शामदान घेऊन जामदारखान्याशीं येतो]

भोज०—[पडक्या आवाजांत] मन्याबापू, मन्याबापू, उद्यां विजयेच्या लग्नाचं देवदेवक बसायचं आहे. कृष्णरायाच्या मनांतून जडावाचे दागीने घालवयाचे आहेत. रामराजाचीं तीं जडावाचीं सलकडीं आणि ती पोंची द्या पाहूं !

मन्या०—हीं घ्या सलकडीं, अन् ही जडावाच्या दागीन्यांची पेटी. [देतो]

भोज०—[सलकडीं व पेटी घेऊन आपल्या महालाकडे जातां जातां स्वगत] शंभूरावाकडून हीं सलकडीं आणि रामरायाचे ते शेले टाकतों त्या मारेकऱ्यांच्या हातांत कीं रामरायानंच हें मारेकरी घातल्याचा कडेकोट पुरावा झाला ! मग आपला नाहीं संशय यायचा कुणाला ! [आपल्या महालांत जाऊन काळा पोषाख करून बाहेर येतो व आपल्या बरोबर मारेकरी आहेत अशा कल्पनेनें मारेकऱ्यांस उद्देशून हलक्या स्वरानें] अगदीं पाऊल देखील न वाजवित माझ्या मागून या. [इकडे हिंमतरा व ते सरदार आड उभे राहून सर्व प्रका पाहत आहेत.] कचरूं नका मुळीं देखील [दरवाजा वाजल्याचे भासानें] त्वु:. तरी साव काश या म्हणून सांगितलं होतं ! [स्वगत केवढयानं वाजला हा दरवाजा ! हा दरवाज वाजलेला ऐकून कोणी यायचं तर नाहीं [विचार करून] छेः, अशा मध्यरात्रीं कोण येणार उठून ! मला वाटतं अश वेळीं मोठा धरणीकंप झाला तरी देखील झोंपीं गेलेले लोक जागे व्हायचे नाहींत मग एवढयाशा दरवाजाच्या आवाजा कुसुंबा पाजून अंमल चारलेले हे लोक जाग होणार ! छेः ! [मारेकऱ्यांस] घाबरूं नक तुम्ही असे ! आपलीं हत्यारें उपसा आणि ज्या कामाकरितां तुम्ही आलां आहां तें का घ्या अगोदर उरकून झटपट ! एवढं उरक लंत म्हणजे तुम्हा दोघांना आमचे काका साहेब सेनापती करून टाकतील ! हं हाच कृष्णरायाचा पलंग. ह्या वेळीं ह्याला त अगदीं काळ झोंप लागलेली दिसते आहे वाट कसली बघतां आतां ? हं आटपा-आ टपा-झटपट ! [मारेकरी वार करीत आहेत अशा भासानें] शाबास, शाबास, छातींतच भोंसका. [पद्मावती आल्याच्या भासानें व कृष्णरायानें किंकाळी ठोकल्याच्या भासानें] अरे हा आरडला आणि ही पद्मावतीही कशी आली इयं या वेळीं ? हे हिला बघून इयून पळूं लागले ! आपणही इयून

अन् किंकाळी ऐकून झोंपेंतून उठून आ-ल्याची बतावणी करावी. (जातो व काळा पोषाख काढून येतो) काय आहे काय ? ओरडलं कोण ? किंका-ळी कोणी ठोकली ? कृष्णरायाचा खून ! अरे धांवा, धांवा, धांवा ! खून !खून ! ह्या मारेकऱ्यांनीं माझ्यावर हत्यार उचललं ! (कृष्णरायाकडे जाऊन) कृष्णराय, कृष्ण-राय ! (असें म्हणून त्याचा गळा दाबतो) (व स्वगत) मला जरी यानं ओळखलं असलन् तरी आतां नाहीं हा माझं नांव घेणार ! अरे पद्मावतीनं तर नाहीं पाहिलं हें सगळं ! पद्मावती, पद्मावती ? हिची तर बोबडीच वळली ! हिला बोलतां येईं-नासं झालं ! मला वाटतं हिची वाचाच बसली ! ती बसली असली तर बरंच झालं! नाहीं तर रामरायाच्या सांगीवरून हिनंच कृष्णरायाच्या मंदिरांत मारेकऱ्यांचा प्रवेश करून देऊन त्यांच्याकडून त्याचा खून करविलान् म्हणून उठिवलं कीं सगळंच आटपलं ! असंच, असंच ! अरे पण ही आणि ही विनया ह्या कशा आल्या इकडं! यांनीं देखील पाहिलं कीं काय हें सारं ! [विनयेचा हात धरून ती कांहीं बडबडते आहे अशा भासानें] विजये, अशी वेडया-सारखी भकतेस काय ! चल, नीज चल स्वस्थ ! [तिचा हात धरल्यासारखें करून तिला आपल्या खोलींत घेऊन जातो.]

हिंमत०–[सरदारांस] कांहीं शंका आहे का आतां ! यापुढं एक क्षणभर दे-खील इथं राहून उपयोगी नाहीं ! आणि ह्या पद्मावतीताईनाही पण वाडयांतून–छेः विजयानगरांतून काढून नेल्या पाहिजेत ! नाहीं तर यांच्याही जिवावर बेतायचं ! ताई!

पद्मा०–[खुनाच्या रात्रीं देखील अ-गदीं असाच प्रकार झाल्याचें ती खुणांनीं दर्शविते.] हिंमतराव आपण तिला घेऊन रामराजांकडे जाण्याचें दर्शवितो व त्याला ती अनुमोदन देते व ती आपलें नशीब फिरलें म्हणून कपाळास हात लावते.]

हिंमत०–[सरदारांस] खुनांचे दुसरे दिवशीं हा मांग मला बोलावून " या खुना-संबंधानं तुम्हांला कसं वाटतंहो हिंमतराव! " म्हणून विचारतो आणखी ! चला, यापुढें काय करायचं आणि कसं वागायचं तें सगळं ठरवून टाकूं. [सर्व जातात.]

प्रवेश ३ रा.

विजया व हिंमतराव.

विजया०–हिंमतराव, कुठें खोलींत का नेऊन कोंडून घालणार तुम्ही मला ?

हिंमत०–हो. अशा वेडाच्या माणसांना एकीकडेच ठेवलं पाहिजे.

विजया०–वेडाच्या माणसांना ? अग-बाई ! म्हणजे वेड का लागलंय मला ?

हिंमत०–तर काय ?

विजया०–आणि म्हणून बाबा मला रात्रंदिवस कोंडून ठेवितात ! वेडांत कृष्ण-रायाचा गळा दाबल्याचं अन् त्याच्यावर मारेकरी घातल्याचं मी कांहीं बोलेन—

[बदलून] हो ! पण वेडच-वेडच हें ! अगबाई, ते पहा आले मारेकरी ! धांवा हो, धांवा कोणी तरी ! खून, खून, खून !

हिंमत०–[तिचा हात धरूं लागतो] विजये !

विजया०–नका हो नका माझ्या हाताला स्पर्श नका करूं. तुमचे पवित्र हात विटाळतील कुठं तरी ! खरंच बाई, पण तुम्ही माझं पाणिग्रहण करणार होतांना ? पण आतां–विजयानगरच्या महाराजांचा–आपल्या पुतण्याचा–खून करणाऱ्याच्या मुलीचं तुम्ही पाणिग्रहण कसं कराल ! छेः छेः छेः वेड–वेडच हें !

हिंमत०–[स्वगत] तर हिनं देखील सारा प्रकार पाहिलान् तर ! अन् त्या मुळंच हिची ही अशी स्थिति झाली. (उघड) विजये–(तिचा हात धरून) तूं शुद्धीवर आहेस का ?

विजया०–शुद्धीवर ! आतां कसली आली आहे मला शुद्ध अन् बुद्ध ! मी वेडी ! वेडी ! ! वेडी ! ! !

हिंमत०–(विजयेचा हात धरून) विजये, हा पहा मी तुझा हात माझे हातांत घेतला.

विजया०–खून करणाऱ्याच्या पोरीचा ? नका हो, रक्ताचे डाग लागतील तुमच्या हाताला—

हिंमत०–हें पहा तें कांहींही असो ! यांत तुझा जर कांहीं अन्याय नाहीं तर मग–

विजया०–हिंमतराव, खरं का पण हें ! अगबाई स्वप्न तर नाहीं हें !

हिंमत०–विजये, तुला अशी ही नरचेवर भ्रांति पडते, तर म्हणतों—

विजया०–काय म्हणतां ?

हिंमत०–तुझा हा राजवाडा सुटून तुला जर किंचित् आराम मिळेल–तूं आपल्या आजोळीं जाईनास चार दिवस–काकांना मीही सांगवतों राजवैद्याकडून कीं तुझं वेड जायला तुला तुझ्या आजोळाकडे चार दिवस पाठिवली तर बरं होईल म्हणून—

विजया०–पण बाबांना माझं वेड जायला पाहिजे असेल तरना ते पाठवितील मला तिकडं !

हिंमत०–म्हणजे ?

विजया०–म्हणजे मी काय सांगूं बाई बाबांना कृष्णरायाची गादी पाहिजे होती पण मला माझा भाऊ पाहिजे होता !—ते प्रत्यक्ष माझे वडील पण ते मला आतां दुस्मानासारखे लेखूं लागले आहेत ! मीच वेडी भ्रमिष्ट, म्हणून मला खोलींत कोंडून ठेवायचं–कृष्णरायाच्या खुनासंबंधानं मी कुठं तरी कांहीं बोलेन म्हणून त्यांना माझा संशय येतो खास !

हिंमत०–तर मग तूं चांगली शुद्धीवर आहेस ?

विजया०–म्हणजे तुम्हांला इतकं सांगितल्यावर अजूनं दिखील का संशय ! मला वाटतं कृष्णरायाच्या खुनानंच माझं वेड जायचं होतं ! प्रत्यक्ष माझा बाप पण

तों देखील मला आतां यमरूपी दिसतो—ती आई तर बोलून चालून आईच; भोळी ती. तिच्याजवळ ही गोष्ट बोलूं कशी मी ? अन् बोलून करायचं काय ? धीरच नाहीं मला होत तसं करायला ! मला या उभ्या जगांत आतां माझं असं कोणी नाहीं असें वाटूं लागलें आहे. मला एक पद्मावती ताई होती. पण ती देखील दोन दिवस झाले कुठं नाहींशी झाली. तिचा पत्ताच नाहीं अजुनी ! म्हणून म्हणतें कीं, जगण्यापेक्षां मी वेडी आणि भ्रमिष्ट होऊन मेलेलीच बरी—अथवा आपण जर माझं पाणिग्रहण—छे: पण ती आशा या–पुढं मी काय म्हणून करावी ?

हिंमत०—(तिचा हात आपले हातांत घेऊन) हें बघ मी तुझें पाणिग्रहण केलं ! पण या पुढं कृष्णरायाच्या खुनाची गोष्ट तूं अज्जीबात विसरून जा. भोजतिरमलला त्याबद्दल तूं ओळख देखील देऊं नकोस—जसं काय तें सारं वेडांतलंच होतं ! अन् मी सांगितल्याप्रमाणें आजोळीं जाऊन रहा चार दिवस. तुझं मी आपल्या हातानं आतां मी जें पाणिग्रहण केलें आहे तें कायमचं आहे म्हणून समज. आपण दोघंही जगूनवांचून चांगले दिवस पाहिले तर तुझ्या—

विजया.—अगबाई ! इतकं आश्वासन मिळाल्यावर—मी जसं सांगायचं होईल तशी वागेन.

[चंपावती व भोजतिरमल येतात त्यास दुरूनच पाहून.]

हिंमत०—(हलकेच) पण हें पहा, आतां तूं वेडाचं सोंग घे. अन् मीहि तुला कोंडून ठेवलेल्या खोलींत नेऊन पोंचविण्याकरतांच तुझा हात धरला आहे असा बहाणा करतों !

भोज०—[पुढें येऊन] कुठं गेली ती पोरटी ?

हिंमत०—अरेरे ! अजून हिचं वेड जात नाहीं !

विजया०—आग लागली हो—सगळीकडे आगडोंब झाली. माझी खोली माझ्यावर कोसळून पडत असतां मला तिथं त्या खोलींत ठेवायची ! आई, आई, आई ! [जवळ जाऊन] मी—हा वाडा माझ्या अंगावर कोसळून पडेल, म्हणून बाहेर जाणार होतें तो या हिंमतरावांनीं माझा हात धरून मल अडिवली. आई, आई—मला त्या खोलींत नको कोंडून घालूं गं. मी तुझ्या मंदिरांत राहीन—नाहींतर ताईच्या; पण एकटी त्या खोलींत नको—

भोज०—जा, तूं आपल्या मंदिरांत घेऊन जा तिला. (विजयेस) मात्र तिथून हालशील—अथवा बाहेर पडशील तर पुन्हा अंधार कोठडींत कोंडून टाकीन, समजलीस ?

(चंपा व विजया जातात.)

भोज०—हिंमतराव, सध्यां आमच्यावर मोठे संकटाचे दिवस आले आहेत !

हिंमत०—(एकीकडे). काय दुःखाचा

बहाणा हा! याच्या डोळ्यानं एक टिपुस तरी येतं आहे कां? (उघड) काकासाहेबांनीं असं डोळ्यांनीं पाणी काढूं नये! विजयेला चार दिवस आजोळीं पाठवा, म्हणजे नुसत्या तिकडच्या हवेनंच बरी होईल ती!

भोज०–हो. बरं सुचविलंत-तिला अन् विजयेला दोघींनाच देतों पाठवून! पण हें पहा हिंमतराव, इकडं कृष्णरायाचा खून–आणि इकडं हिचं हें वेड! (डोळ्यांस पाणी आलेंसें करून डोळे पदरानें टिपून) काय करावं? या इयल्या प्रकारानं माझा मीच सध्यां भ्रमिष्टासारखा झालों आहें! तुमचं लग्नाचं ठरलेलं, आणि अशा वेळीं हा प्रकार! वेड लागेल तर काय होईल–चांगल्या माणसाला देखील लागेल कीं–

हिंमत०–साहजिकच आहे–अशा भयंकर प्रसंगानं असं व्हायचंच!

भोज०–तें सगळं खरं, पण आतां पुढं काय व्यवस्था करायची? रामरायानं मारेकरी घातलेन् व त्यांत पद्मावतीचेंही अंग असावं याबद्दल आतां मला तरी शंकाच नाहीं! कारण दोन दिवस झाले, तिचा पत्ता नाहीं कुठं गेली त्याचा! [साश्चर्य] कृष्णरायाचा खून झाल्याबरोबर तिची वाचा बसली! त्या वेळीं मला तें सर्व खरं वाटलं. पण आतां असं वाटतं कीं, तो तिचा निव्वळ बहाणा असावा! कृष्णरायाला ठार करून आपल्याला–अर्थात् रामरायाला–राज्य मिळावं ही तिची इच्छा. अन् तेवढ्याकरितां प्रत्यक्ष आपल्या भावाचा खून! कोण भयंकर राज्यलोभ हा! हा सगळा असा प्रकार असून इथं त्या कांहीं सरदारांना तर माझाच संशय येऊन त्यांचे माझ्या विरुद्ध भयंकर कट चालल्याचं ऐकतों! तेव्हां याला काय म्हणावं! प्रत्यक्ष आपल्या पुतण्याचा–आपल्या वडील भावाच्या मुलाचा–खून त्याच्या चुलत्याकडून! शिव! शिव! शिव! हें कधीं संभवेल तरी कांहीं?

हिंमत०–[एकीकडे] काय मानभावीपणा हा! [त्यास उघड] छेः हें कसं संभवणार! पण जिथं प्रत्यक्ष बहीण राज्यलोभाला गुंतून आपल्या भावावर धडधडीत मारेकरी घालते तिथं लोक जर चुलत्याच्या संबंधानं शंका घेऊं लागले तर त्यांच्या तोंडाला कोणी हात लावावा?

भोज०–कांहीं असो. उद्यां मी दरबार भरवतों आणि स्पष्ट सांगतों सगळ्या सरदारांना अन् मुत्सद्यांना कीं, शिवरायाच्या–मग लांबच्या कां होईना–वंशांतला कोणी तरी एखादा चांगलासा मुलगा निवडून काढा आणि त्याला राज्याभिषेक करा. पण दुर्दैवानें शिवरायाच्या वंशांतला असा कोणीच नाहीं! नाहींतर मीं त्यांना असं सगिन कीं, विजयानगरच्या गादीचा अभिमान बाळगणाऱ्या सरदारांपैकींच एखाद्या पिढीजाद आणि कुलीन सरदाराला निवडून काढा आणि त्याला करा गादीचा मालक! मला हें राज्य नको! इतकेंच नव्हें

पण यापुढं ज्या वाड्यांत कृष्णरायाचा खून झाला तिथं राहण्याला देखील माझं मन वहात नाहीं ! यापेक्षां मी कुठं तरी जंगलांत जाऊन राहीन ! मला या विजयेसंबंधानं कायतो एक पाश आहे—पण ती सध्यां वेडी झाली आहे—नाहींतर माझं ठरलेलं होतं कीं, तिला तुम्हांला देऊन तुमच्या घराण्याशीं संबंध करावा ! पण तिच्या अशा स्थितींत तुम्हांला त्या संबंधानं आग्रह करणं म्हणजे—

हिंमत०—काकासाहेब, माझ्या आईनीं आपली मागणी ज्याअर्थीं मान्य केली आहे त्याअर्थीं—

भोज०—त्याअर्थीं काय ? तुम्हांला नाहीं म्हणतां येत नाहीं असंच कीं नाहीं ? पण तुमच्या गळ्यांत माझी वेडी मुलगी बांधण्याइतका मी अप्रबुद्ध नाहीं. भलत्याच कामांत व्यर्थ भीड आणि आग्रह उपयोगी नाहीं. पण तुम्हीच होऊन पतकरीत असाल तर माझी ना नाहीं.

हिंमत०—त्या संबंधानं आईचा शब्द देखील गुंतून जाऊन चुकला आहे. अन् तिनं तुम्हांला मागणी देखील घातली आहे. इतक्या थराला गोष्ट येऊन पोंचल्यावर मागणी मोडण्याचं साहस अस्सल मराठ्यांच्या कुळांत तरी होणार नाहीं ; मग ती वेडी असो अथवा खुळी असो.

भोज०—इतका जर तुमचा निश्चय आहे तर आणखी काय पाहिजे मला ! तुमच्याशीं तिचं एकदां लग्न लावून टाकलं म्हणजे मी या राहत्या एका पाशांतून मोकळा झालों. तुमच्या सारख्याच एखाद्या सरदाराच्या हातीं हें राज्य दिलं म्हणजे काळजी नाहीं मग मला कशाची !

[इतक्यांत शंभूराव एक पत्र घेऊन येतो.]

भोज०—या, या शंभूराव, विजया वेडी झाली तरी हिंमतराव तिचं पाणिग्रहण करण्यास तयार आहेत.

शंभू०—अस्सं ! हे जातिवंत मराठे आहेत. ताई वेड्या झाल्या म्हणून काय झालं ? त्या काय जन्माच्या वेड्या झाल्या आहेत थोड्याच ? आज नाहीं उद्यां त्या बऱ्या होतीलच.

भोज०—बरं, पण काय, बातमी काय आहे ? हातांत पत्रं कोणाचीं आणलीं आहेत ? आणा पाहूं तीं इकडं ! [घेतो व वाचून]—

" विजयानगरचे महाराज कृष्णराय, यांचा त्यांचे चुलते भोजतिरमल यांनीं खून करविला ! " हायहाय ! कोण भयंकर तुफान, आणि नसती आग ही ! शिव, शिव ! भोजतिरमलानं कृष्णरायाचा खून ! अथवा असं कां नाहीं लिहिलं यांनीं कीं भोजतिरमलानं आपल्या कटयारीनं आपले प्राण भोसकून टाकले आहेत म्हणून ! [पत्र वाचवत नाहीं म्हणून खालीं टाकतो.]

शंभू०—काका साहेब ! पुढचं अजून वाचलें नाहींत तुम्ही. त्यांत ज्यानं कृष्णरायाचा खून करविलान् त्यालाच हे सरदार

इथं येऊन विजयानगरच्या गादीचं स्वामित्व आपल्या हातीं घेण्याविण्याविषयीं विनंती करीत आहेत !

भोज०—नको, नको ! तें ऐकायला देखील नको मला ! रामरायानं कृष्णरायाचा खून करविल्याबद्दल इतका पुरावा असतां—अन् हा प्रकार !—मला वाटतं एकादोघा मत्सरी सरदारांचंच काम असावं हें ! हिंमतरावासारख्या दिल्दार कुलीन आणि पिढीजात सरदारांच्या मनाला पुढें इतका धडधडीत पुरावा असतां अशी गोष्ट स्वप्नांत देखील शिवायची नाहीं. कां हिंमतराव ?

हिंमत०—[पत्रं वाचीत असतां] हीं पत्रं वाचून सगळंच मला चमत्कारिक वाटूं लागलं आहे !

भोज०—शंभूराव, उद्यां दरबार भरवूं. अन् तिथं सगळ्या सरदारांना बोलावून त्यांनाच सांगूं कीं, विजयानगरची गादी तुमची आहे—हिची लाज, मान, मरातब सर्व तुमच्याकडे आहे. तो तुमचा तुम्ही राखा—जा तर, आणि उद्यांच्या दरबारची सगळी व्यवस्था करा अगोदर—(तो जाऊं लागतो) हिंमतराव, हीं पत्रं पाहिल्यापासून मला कांहीं सुचेनासं झालं आहे. मला वाटतं याच्या योगानं कदाचित् मला देखील वेड लागेल ! मी जातों अन् पाहतों मला अंमळ विश्रांति मिळाली तर. पण कृष्णरायाचा तो भयंकर खून झाल्यापासून त्या विश्रांतीला—मला वाटतं—मी सर्वस्वीं आंचवलों !

हिंमत०—काका साहेबांनीं हीं अशीं पत्रं आलीं म्हणून उगीच आपल्याला त्रास करून घेऊं नये. कोणी कुटाळ मंडळींनीं देखील लिहिलीं असतील हीं.

शंभू०—तसंही असेल ! कुणी सांगावं ! पण तीं पाठविणाऱ्या सरदारांचे हलकारे धरले आहेत मी.

भो०—तें कांहीं असो—सध्यां तरी माझं मन अस्वस्थ झालं आहे या पत्रांच्या योगानं, एवढं खरं—या या तुम्ही—अन् मीही जातों—[भोजतिरमल जातो.]

शंभू०—हिंमतराव, महाराजांची तब्बेत एकदम बिघडली !

हिंमत०—'महाराजांची ! कोण महाराज ! विजयानगरच्या गादीचा—

शंभू०—हो. विजयानगरच्या गादीचा हक्क आपल्याकडे येणार महाराजांच्या—छेः काका साहेबांच्या मागं !

हिंमत०—ही विजयानगरच्या गादीच्या अपमानाची गोष्ट आहे !

शंभू—कृष्णरायांच्या मागं आपल्यासारख्या पिढीजात आणि बाणेदार सरदारांकडे जर तिचं स्वामित्व येईल तर त्यांत वावगं काय ? शिवाय विजयाताई आपल्याला द्यायची हें महाराजांचं ठरून चुकलंय!

हिंमत०—[एकीकडे] आणि म्हणूनच यानं आत्तांपासून या तोंडपुजेपणाला सुरवात केली आहे वाटतं ! पण म्हणावं हरामखोरा कृष्णराय महाराजांचा खून करविण्यांत तुझं आंग होतं हे मी पक्क ओळखून आहे.

(उघड) तर मग यांत तुमचंही आंग होतं एकून ?

शंभू०—(भेदरून) माझं आंग? कशांत!

हिंमत०—[स्वगत] याचा चेहरा एकदम बदलला ! [उघड] कशांत म्हणजे? उगीच आढेवेढे कां घेतां आतां असे! सगळं समजून चुकलंय मला ?

शंभू०—छेः छेः, त्यांत माझा कांहीं नाहीं संबंध !

हिंमत०—तुमचा संबंध नाहीं? छत् तसं कसं होईल ?

शंभू०—म्हणजे !

हिंमत०—म्हणजे काय ? काकासाहेबच म्हणत होते कीं, शंभूरावांच्या सल्लयानंच ठरलं आमचं म्हणून.

शंभू०—माझ्या सल्लयानं !

हिंमत०—हो हो तुमच्याच—तुमच्याच सल्लयानं. विजया देखील असंच म्हणत होती.

शंभू०—विजयाताई असं म्हणत होत्या? पण त्यांना काय ठाऊक हें? (स्वगत) त्यांनीं ऐकलं कीं काय आमचं बोलणं? तेंच तर त्यांचं वेड जास्त होण्याचं कारण नसेल !

हिंमत०—(स्वगत) माझ्या संदिग्ध बोलण्यानं हा अगदीं भेदरून गेला आहे. याला वाटतं आहे कीं कृष्णरायाच्या खुनांत याचं आंग असल्यासंबंधानंच मी बोलतों आहें ! तर आतां—आपला रोखच बदलावा जरा—(उघड) विजया म्हणत होती कीं, शंभूरावांनीं गळ घातली नसती तर माझ्या अन् तिच्या लग्नाचं जुळतंच 'ना !

शंभू०—[धीर येऊन हसत, स्वगत] मी म्हटलं या खुनांत माझं आंग असल्याचा याला संशय आला कीं काय ! पण तसं कांहीं नाहीं. मग हरकत नाहीं ! [उघड त्यास] हः हः हः. असं ! विजयेच्या लग्नासंबंधानं म्हणतां ? मी म्हटलं कीं तुम्ही आणखी दुसऱ्या कशासंबंधानं म्हणतां ?

हिंमत०—दुसऱ्या कशा संबंधानं म्हणायचं?

शंभू०—(खुनासंबंधानं आपला संशय आला नाहीं असं पाहून) हा सरदारांचा कट झाला आहे याच्या संबंधानं म्हणतां कीं काय ?

हिंमत०—छेः कटांत—अन् तुमचं आंग?

शंभू०—तरी म्हटलं—असं काय म्हणतां तुम्ही संदिग्ध ! महाराजांना मी एवढंच म्हणालों कीं विजयाताईंच्या योग्य असे एक हिंमतरावच दिसतात मला.

हिंमत०—(स्वगत) आतां याला जरा चढवूनच देऊं. [उघड] पण काकासाहेबांच्या मनांत विजयेला मलाच द्यायचीं कांहीं विशेष नव्हतं म्हणे. तुम्हीच सगळी त्यांची उठावणी केली.

शंभू०—अहो उठावणी ती कसली? मी असं पाहिलं कीं, विजयानगरच्या सगळ्या पिढीजात सरदारांमध्यें—आपल्याला हा जरा तोंडपुजेपणा वाटेल, पण तसं तोंडदेखलं नाहीं बोलत मी—तुमच्या तोडीचा विजयाताईंच्या योग्य असा दुसरा सरदार आहे कोण ? आणि पुढं मागं—महाराजांचा—छुः,

काकासाहेबांचा वृद्धापकालच झाला आहे—कृष्णरायांच्या मागं तेच गादीचे मालक—अर्थात् त्यांच्या मागं गादीला तरी कोणी चांगला धनी पाहिजे कीं नाहीं? अहो थोडं लांबचं धोरण पहावं लागतं!—

हिंमत०—असं? माझ्याशीं गोड बोलून पुढचीं धोरणं आतांपासून बांधून ठेवता तर! अन् म्हणून तुम्ही माझी निवड केली तर! एकंदरींत तुम्ही मला वाजवीपेक्षां जरा जास्त फाजील मान दिलांत तर—

शंभू०—जास्त! छेः छेः छेः छेः. अगदीं योग्य मान—मात्र पुढेंमागें.

हिंमत०—पुढंमागं काय?

शंभू०-म्हटलं—विसरूं नका. आपल्या या गरीब हितचिंतकाला—

हिंमत०—छेः छेः. तुम्हांला विसरायचं! जिवांत जीव असेल तोंपर्यंत विसरायचा नाहीं तुम्हांला! (विषय बदलून) उद्यांच्या दरबारची व्यवस्था करायची असेल तुम्हांला नाहीं?

शंभू०—हो तिकडंच चाललों मी.

हिंमत०—ठीक आहे, या तर.

शंभू०—जातों मी! [जातो.]

हिंमत०—आमच्या लग्नांत हा मात्रागमनी बिब्बा घालीत असल्याचं पद्मावतीताई सांगत होती. अन् हा म्हणतो कीं माझं नांव आपण सुचविलं म्हणून! गुलामाचं सारं पुढचं धोरण, आणि दुसरं काय! [विचारांत मग्न असतां एकदम] त्या शंभ्याचं तें पुढचं धोरण, आणि या काकांचा कोण भयंकर मानभावीपणा हा! तीं पत्रं पाहून "भोजतिरमलानं कृष्णरायाचा खून!" हे शब्द त्या काकानें किती कावेबाजीनं उच्चारलेन्! आतां स्वारी सर्व सरदारांना अन् मुत्सद्यांना बोलावून दरबार भरविणार आणि तिथं ही गादी शिवरायाच्या वंशांतल्या—मग लांबच्या कां होईना—एखादा चांगलासा मुलगा निवडून त्याला, अथवा [तिरस्कारानें हंसून] माझ्यासारख्या एखाद्या विजयानगरच्या गादीचा अभिमान बाळगणाऱ्या सरदाराला निवडून त्याला, देण्याविषयीं सरदारांना सांगणार म्हणे! म्हणजे अर्थात् सगळ्यांनीं त्यांना स्वतःलाच आग्रह करावा राज्याभिषेक करून घ्या म्हणून! एकंदरींत राज्यप्राप्तीकरितां या जगांत कोण काय करायला तयार होईल याचा कांहीं नियम नाहीं! यानं आपल्या मिठ्ठा भाषणानं मला आपल्या जाळ्यांत अडकविण्याचा किती प्रयत्न केलान्! मला जर याचीं झोंपेंतून उठून तीं भयंकर कृत्यें खुनी मनुष्याप्रमाणें पुन्हा जशींच्या तशींच करीत असल्याचीं पहावयास न सांपडतीं तर मी याच्या जाळ्यांत सहज सांपडतों! माझ्यासारख्या कुलीन सरदाराला निवडून काढून गादीवर बसवावं म्हणून सर्व सरदारांना आणि मुत्सद्दीमंडळींना आपण सांगणार म्हणून मला सांगून, तो समजत असलेल्या आपल्या वेडया मुलीशीं माझं लग्न करण्याकरितां किती झटपटत होता! रामरायांशीं गेलेलीं पत्रं तर त्या शंभूरावानं

धरलीं असतील ! भोजतिरमलाच्या विरुद्ध अगदीं प्रत्यक्ष पुरावा म्हणजे त्या मारेकऱ्यांना कबूल करविणं हाच. तर आतां अगोदर तुरुंगावरील अधिकाऱ्याला जाऊन भेटून अगोदर त्या मारेकऱ्यांच्याकडून घ्यावा सगळा खुलासा काढून ! शंभूरावाचं अंग तर यांत स्पष्टच दिसतं ! कारण हा भोज झोंपेंत बरळतांना त्यानं शंभूरावाच्या नांवाचा अगदीं चक्क उच्चार केलान् ! तुरुंगाकडेसच जावं तर अगोदर. [जातो.]

[हिंमतराव जातो व भोज येतो]

भोज०—खुनाशीं माझा संबंध आहे ही बातमी या सरदारांना कशी कळली असावी ? माझ्या विरुद्ध या सरदारांची खलबतं आणि त्या रामरायाला पत्रं ! ठीक आहे ! याला हीच तोड—भर दरबारांत आपल्याला गादी नको म्हणून सांगतों—रामरायानं मारेकरी घातल्याचा इतका पुरावा पुढं असल्यावर माझ्या विरुद्ध माझ्या पुढं ब्र काढण्याची छाती नाहीं होणार कोणाची. माझ्या तोंडापुरता तरी मलाच गादीवर बसण्याविषयीं त्यांना आग्रह करणं भाग पडेल. त्यांनीं नाहीं केला तर शंभूरावाला चांगला मयवून ठेवला म्हणजे सगळं सुरळीत होईल. हिंमतरावही इतकं शिजवून ठेवल्यावर सहसा आपल्या विरुद्ध जायचा नाहीं. कारण याच्या मागं—विलयेशीं लग्न केल्यानं—त्यालाच ही गादी मिळेल हें त्याच्या डोक्यांत मी मोठ्या शिताफीनं आणून सोडलं आहे ! आणि ज्या राजमुगुटाकरितां मी हें एवढं भयंकर कृत्य केलं तो एकदा राजरोस माझ्या हातीं आला म्हणजे या फितवेखोर, कटवाल्या सरदारांचा सूड उगवीन ! माझ्या विरुद्ध रामरायाला पत्रं ! आतां माझ्याशिवाय या गादीला कोण मालक आहे !—त्या शंभूरावाला तो पुन्हा संध्याकाळीं इथं आला म्हणजे चांगला मयवून ठेवला पाहिजे अगोदर. आणि हे सरदार कदाचित् बेगुमान आणि बेमुर्वत झाले तर यांना आळा घालायला त्या मारेकऱ्यांची अगोदर सुटका करून त्यांना आपल्या खाजगी शिबंदीचे सेनापती नेमून टाकतों ; म्हणजे प्रसंग पडल्यास ह्या फितव्या सरदारांचे बंडखोर म्हणून राजरोसपणें राजवाड्याचा पुढील मैदानांत देखील खून पाडायला हरकत नाहीं ! [जातो.]

प्रवेश ४ था.

स्थलः—विजयानगरांतील चवाठ्याची जागा.

प्रवेशः—हिंमतराव बोलत आहे; लोकांचा घोळका जमला आहे; व मारेकरी साध्या वेषांत गुप्तपणें हिंमतरावाचे मागें उभे आहेत.

मारेकरी.–(स्वगत) म्हाराजांनीं सांगितल्यापरमानं आपन् याच्या म्हनन्याला व्होला व्हो म्हनत जावं अन् हलकेच करावा घेच्यावर वार !

हिंमत०–(जमलेल्या लोकांस) माझ्या सगळ्या सांगण्यावरून या नराधम काकानेंच महाराजांवर मारेकरी घालून त्यांचा खून केला ह्याबद्दल तुमची खात्री झाली असेल! नाहीं तर–कृष्णराय महाराजांचा खून होऊन अजून पुरे पंधरा दिवस देखील लोटले नाहींत तोंच–राज्याभिषेकाची इतकी घाई कां होती! शंभूरावाचंही यांत आंग कशावरून असलं पाहिजे तेंही तुम्हांला मी सांगितलंच. विजयेचं वेड, पद्मावतीची वाचा बसणं व नाहींसं होणं, राज्याभिषेक करून घेऊन दोन दिवस होतात न होतात तोंच दमाजीरावांना आणि पिलाजीरावांना कारणावांचून धरून कैदेंत टाकणं, आणि त्याचप्रमाणं त्या विश्वासराव सरदारांचा भर दिवसाढवळ्या खुद्द राजवाड्याच्या पुढच्या मैदानांत खून, या सगळ्या गोष्टींचं मूळ कुठं आहे याची तुम्हांला कांहीं कल्पना तरी आहे का? या सगळ्यांचं मूळ त्या भयंकर अनावर राज्यतृष्णेंत आहे हें पक्कें समजून असा. माझ्यावर तुमचा विश्वास आहे कीं नाहीं? पिलाजीरावांनीं, दमाजीरावांनीं, आणि त्या विश्वासरावानं या काकांचे–तुम्हांला मघां सांगितलेले ते झोंपेंतले चाळे–पहिल्यानं सांगितलंच आहे. तुम्हांला तेवढेंच बस्स आहेत, मी म्हणतों तें खरं मानायला! शिवाय मला आपली विजया देऊं करून मला आपला मिंधा करण्याचे ह्याचे विचार तर किती नीचपणाचे आहेत! ज्या विजयानगरच्या गादीकरितां माझ्या आज्यापणज्यांनीं, बापदाद्यांनीं आणि भाऊबंदांनीं आपल्या प्राणाचे बळी दिले, त्यांच्या वंशांत येऊन मी विजयानगरच्या अभिषिक्त राजाचा खून करून त्याच्या रक्तांत आपलं सगळं अंग माखून घेणाऱ्या दुष्ट, भ्रष्ट, आणि पापिष्ट नराधमाचा मिंधा होऊं? ह्याला ह्याच्या खुनी–भयंकर खुनी–कृत्यांत सामील होऊं! आणि याच्या लालुचीला भीक घालून ही गादी अपहार करण्याची नीच इच्छा धरूं!—यापेक्षां हें राज्य सोडून कुठं तरी काळं तोंड करून गेलेलं काय वाईट! जिथं–भलाबुरा न पाहतां–वाटेल त्याला निष्कारण पकडून–उचलून–एकदम तुरुंगांत टाकलं जातं, आणि जिथं दिवसा ढवळ्या वाटेल त्याचे बिनदिक्कत राजरोसपणें खून होतात,–या वेळीं देखील कदाचित् मी असें हें उघड उघड बोलतों आहें म्हणून काकासाहेबांचे–छे: राजेसाहेबांचे–कोणी तरी मारेकरी माझा खून पाडण्याकरितां इथें गुप्तपणें आपल्या खुनी तरवारी घेऊन आले असतील!—

मारेकरी०–सरदारसाब, आपून म्हनतां त्येच्या संबंदानं आमचीबि समद्दी खात्री झाली. ह्यो कृस्नरायमहाराजांचा खून काकासाहेबानींच पाडला असावा! येच्यामंदी काडीचाबि सौंशय न्हे. (तरवार उपसून) तुमचा हुकूम व्हात असल तर अक्शी अस्साच्या अस्साच जातों पगा, अन् या तरवारीनं काकासाहेबांचा–[हिंमतरावावरच वार करूं पाहतो इतक्यांत एकजण

त्या मारेकऱ्याचा हात धरतो. तों दुसरा मारेकरी छोटा कर्णा फुंकून हिंमतरावावर धांवतो. हिंमतरावही आपली तरवार उपसतो.]

हिंमत०–(तरवार उपसतो व शीळ घालतो; त्याबरोबर त्याचे हत्यारबंद लोक येतात त्यांस) तुम्ही जा–यापुढें या विजयानगरांत राहण्यांत अर्थ नाहीं ! हा पहा या काकासाहेबांच्या घोडेस्वारांनीं मला गराडा घातला. ठीक आहे. जोंपर्यंत माझ्या हातांत हें हत्यार आहे, आणि माझे हे हत्यारबंद लोक माझ्या मदतीला तयार आहेत तोंपर्यंत यांच्यापैकीं कांहींजणांचे खून पाडल्याशिवाय मी म्हणजे यांच्या हातीं लागेन अशांतला भाग नाहीं–पहिल्यापासूनच चुकलं. यांची ही इतकी जय्यत तयारी असेल अशी कल्पनाच नव्हती मला! नाहींतर घोड्यांची वगैरे तरी कांहीं तजवीज अगोदरच करून ठेविली असती ! असो, आतां काय त्याचं ? या शिबंदीपैकीं एखादा घोडा माझ्या हातीं लागला कीं बस्स; वाऱ्यासारखा निसटून जाईन आणि पद्मावतीताईला रात्रंबेरात्र प्रवास करून वाटेंतच गांठीन ! आलेच हे ! तर–मर्दहो ! आतां तुमचीं हीं हत्यारं अन् जवानमर्दी कसोशीला लागण्याची वेळ आहे. चला सगळेजण हरहर महादेव म्हणा आणि यांच्यावर आपणच तुटून पडून तरवार चालवून, यांच्या खालचीं घोडीं आपलीशीं करून घेऊं! चला म्हणा तर हरहर महादेव.

[सर्व 'हरहर महादेव' म्हणून रणगर्जना करून हिंमतरावाच्या मागोमाग जोरानें जातात.]

[पडदा पडतो.]

प्रवेश ५ वा.

स्थल–राजवाडा.

प्रवेश--भोजतिरमल व शंभूराव.

भोज०–मी माझी विजया देखील त्याला द्यायची केली होती, अन् तो देखील रामरायाला जाऊन मिळाला एकून!

शंभू०–असं होईल असं पूर्वींपासूनच वाटत होतं मला! पण म्हटलं, ज्याअर्थीं आपला विजयाताई त्याला द्यायचा बेत झाला आहे त्याअर्थीं तरी तो असा दगा देणार नाहीं. पण—

भोज०–पण दिलान ना–ठीक आहे ! खास शिबंदींतले लोक घेऊन त्याच्या वाड्याकडे जा अन् त्याच्या आईला अन् बहिणीला कैद करून टाका. अन् त्याची सारी चीजबस्त सरकारांत जप्त करून त्याचा वाडा संध्याकाळच्या आंत जमीनदोस्त करून टाका! त्याच्यावरून गाढवांचा नांगर फिरवा!

शंभू०–हंः त्याबद्दल महाराजांनीं सांगण्यापूर्वींच सगळा तपास घेतला. त्यानं आपल्या बहिणीला अन् आईला विजयानगरांतून अगोदरच कुठं लावून दिलीन्. आणि सारी चीजबस्त देखील कुठं पाठिवलीन् !

भोज०–(दांतओठ चावून) अरे

हरामखोरा! शंभूराव, तर मग त्याचे हे बेत प्रथमपासूनच चालले होते तर!

शंभू०—यांत काय संशय?

भोज०—ठीक आहे—आतां तुम्ही जा अन् त्याचा वाडा आजच्या आज—जमीन दोस्त करून टाका. अन् त्यावरून नांगर फिरवायला लागलांत म्हणजे मला सूचना करा. (शंभूराव जाऊं लागतो त्यास) थांबा, जरा. तुम्हांला आणखी एका गोष्टीचा सल्ला विचारायचा आहे. रामरायाला—तुमच्या शिवाय आणि त्या सरदार मुधोजीराव आगलाव्याशिवाय—हिंमतराबासकट सगळे सरदार जाऊन मिळाले आहेत; तर तुम्ही असं करा—हे आगलावे आपली खासगी शिबंदी आणि इयलें सैन्य घेऊन शहर पुन्हा संभाळतील; मी नजराणा देतों तो घेऊन तुम्हीं आपल्या वकीलांना घेऊन विजापुरकर इब्राहिम आदीलशहाकडे जा—कारण साऱ्या दक्षिणेंत आजकाल त्यांच्या सारखी जोरदार सत्ता दुसऱ्या कोणाचीच नाहीं.

शंभू०—हो, मी देखील हेंच सुचविणार होतों आपल्याला. पण म्हटलं आपल्याला रुचेल न रुचेल!

भोज०—रुचेल न रुचेल! यांत काय रुचायचं अन् न रुचायचं?

शंभू०—आपल्या दोघांच्याही मनांत एकदम एकच गोष्ट आली तर—ठीक आहे.

भोज०—तुम्ही जा—आणि त्याला सांगा कीं रामरायानें कृष्णराय महाराजांवर मारेकरी घालवून त्यांचा खून करून शिवरायाच्या घराण्याचा उच्छेद मांडला आहे. त्याचं पारिपत्य करून तुम्हीं इथवर येऊन आपल्या हातानं मला पुन्हा राज्याभिषेक करून गादीवर बसवाल तर मी आपला फार आभारी होईन. व या कामागिरीबद्दल आपल्याला प्रतिवर्षी मी खंडणी देत जाईन. आणि आपल्या येण्याजाण्याच्या खर्चादाखल रोजीं तीन लाख होन प्रमाणें रक्कम देईन! हें येवढं राजकारण जर तुम्ही जमवून द्याल तर माझी विजया मी तुम्हांला देईन!

शंभू०—(आनंदानें एकीकडे मिशास पीळ देऊन) आतां मात्र ठीक जुळलें. (उघड) हो, हें माझं काम. महाराजांनीं याबद्दल अगदीं काळजी करूं नये.

भोज०—पतकरलंत तर तुम्ही हें?

शंभू०—हो हो, माझ्याकडे लागलं हें. (स्वगत) शहाकडे मी जर ही कामगिरी घेऊन गेलों तर शहाचीही आपल्यावर मर्जी बसेल. अन् त्याच्याकडून एखादी जहागीरही मिळवितां येईल!

भोज०—शंभूराव, विचार कसला चाललाय तुमचा?

शंभू०—नाहीं म्हटलं—विजयाताईसंबंधानं तुम्ही गोष्ट काढलीत म्हणून म्हणत होतों कीं—

भोज०—काय म्हणत होतां?

शंभू०—एवढंच कीं, इतक्या मानाला मी पात्र नाहीं. किती झालं तरी मी आप-

ल्या पदरचा सरदार—आपल्या अन्ना-वर वाढलेलो—

भोज०—छत् ! असं मनांत आणण्याचं कारण तुम्हांला ! खुद्द माझी जर तशी खुषी आहे तर माझ्या आड कोण येणार ! आणि त्यांतून तुम्ही कांहीं अगदीं हलक्या कुळांतले आहांत असंही कांहीं नाहीं.

शंभू०—तसं जरी नसलं तरी पण—

भोज०—तरी पण नाहीं अन् कांहीं नाहीं. ती पुढची गोष्ट—सध्यां अगोदर ही कामगिरी तरी उरकून या.

शंभू०—ठीक आहे. एका महिन्याचे आंत येतों मी सगळं राजकारण जुळवून !

भोज०—ठीक आहे. मी थैली तयार करवितों तर लिहवून. या तुम्ही !

शंभू०—येतों तर मी. हा तयारीलाच लागतों मी आतां जायाच्या. [जातो.]

(जातां जातां) ही स्वारी आतां यापुढं किती दिवस जगणार ! विजयेशीं माझं एकदां लग्न झालं म्हणजे याच्या मागं गादीचा मालक कोण ! यांची काय पन्नाशी गेली अन् पांच उरली ! खरंच 'स्त्रियश्चरित्रं अन् पुरुषस्य भाग्यं' देवालाप कळत नाहीं मग मनुष्याला कुठून कळणार, म्हणून म्हणतात तें कांहीं खोटं नाहीं ! मला वाटतं, माझ्या पत्रिकेंतच असे कांहीं तरी राजयोग आले असले पाहिजेत. त्याशिवाय हें इतकं कसं जमून यावं ? तो द्रविडी ज्योतिषी आला आहे त्याला दाखवितों एकदां माझी पत्रिका. घरीं जाऊन त्यालाच बोलावणं पाठवावं तर अगोदर. [जातो.]

भोज०—इब्राहिमशहा इयवर येऊन गेला कीं रामरायाला अन् सगळ्या सरदारांना आपोआपच दरारा बसेल ! आणि त्यांचे कट आणि त्यांचीं खलबतं जागच्याजागीं दबून जातील सगळीं ! इब्राहीमशहाची अशी बडदास्त ठेवतों कीं, ज्याचं नांव तें ! वाटेनं त्याच्या उतरण्याच्या अन् खाण्यापिण्याच्या अशा सोई करवितों कीं, त्याला वाटावं कीं, आपण जसे कांहीं आपल्या राजधानींतच आहों. माझ्या सगळ्या मांडलिकांना ताकीदपत्रं पाठवितों कीं, इब्राहिमशहा विजयानगरीं मला भेटायला येणार आहेत, तर जागजागीं त्यांना सामोरें जाऊन त्यांचा सर्व प्रकारें नीट बंदोबस्त ठेवावा, यांत कुचराई झाल्यास कामावर पडणार नाहीं; म्हणजे सगळं नीट लागीं लागेल. अशा रीतीनं खुद्द विजापूरच्या आदिलशहाकडून मला पुन्हा एकदां राज्याभिषेक झाला—विजयानगरच्या आजपर्यंतच्या कोणच्याही राजाला असा बादशहाकडून कधींच राज्याभिषेक झाला नाहीं—म्हणजे—रामरायाकडे फितूर होऊन गेलेले सगळे सरदार आपोआप परत येऊन मला मिळतील; आणि सगळे मांडलिक राजे व संस्थानिकही वचकूनच राहतील मग ! एकंदरींत ही युक्ति फारच छान सुचली; पण हें मला सुचायला अन् तेंच शंभूरावाच्याही पण मनांत यायला एकच

गांठ पडली. ह्यानं तर मला अधीकच धीर आला. एवढं राजकारण साधलं म्हणजे मग विजयानगरचा मी अगदीं स्वतंत्र राजा झालों. तर आतां अगोदर शहाला थैलीच लिहवावी. सगळं जुळायचं असलं म्हणजे साऱ्या बाजूंनीं असं जमून येतं. नाहींतर आज तिमराजाच्या मागं हा रामरायच कृष्णरायाचा खून करून ही गादी बळकावता !

अंक ५ वा.

प्रवेश १ ला.

स्थळः—एक डोंगराळ प्रदेश. डोंगरावर असलेल्या श्रीनृसिंहाचे स्थानाचा पायथा.

प्रवेश—(मेण्यांत विजया व मंजुळा दासी बसलेल्या आहेत व मेणेवाले गात गात जात आहेत.)

शंभू–(मुसलमानी फेटा घातला आहे असा, मेणेवाल्यांस) खडा करा मेणा. कोण तुम्ही ! मला तर तुम्ही कोणी तरी वाटमारे दिसतां. मेण्यांत कोण आहे ! आणि त्यांना चालिवलं आहेत कुठं !

१ ला मेणेवाला–राव, तुम्ही लईशी पंचाईत करतां ?

शंभू०–'लईशी पंचाईत करतां !' बेवकूब–मगरूर–माणूस नाहीं तर ! तुम्हीं कोण समजतां मला ?

२ रा मेणेवाला–तुमासनी न्हय ! बेवकूब–अन् मगरूर–मानूस म्हनता न्हव का ?

शंभू–(रागानें) हरामखोर ! तोंड ठेचीन फोडून, नाहीं तर तोंड आटपून बोल. मेणा उतरा अगोदर. बेवकूब नाहीं तर !

[मेणेवाले " हरबा " म्हणून आरोळी देतात व मेणा खालीं ठेवतात; व ते कंबरेच्या तरवारी काढतात.]

शंभू०–(शिंग फुंकतो त्याबरोबर त्याचे ४।५ हत्यारबंद लोक येतात. इतक्यांत हरबाही येतो.) तुमच्या तरवारींना मी भिणारा नव्हे–याद राखून असा–अन् मुकाटयानं आपल्या तरवारी म्यानबंद करा नाहीं तर इथं खून पडतील तुमचे. मेण्यांत कोण आहे अन् त्यांना कुठं चालिवलं आहे तें मुकाटयानं सांगा. अन् चालते व्हा–

विजया–हरबा, तुम्ही पुढें गेलां होतां वाटतं ? मेणेवाल्यांना म्हणावं उगीच त्यांच्याशीं वर्दळत बसण्यांत अर्थ काय आहे ? त्यांना सांगा कीं, मी मेण्यांत आहें अन् मी आपल्या आजोळीं चाललें आहें म्हणून.

हरबा–ताईसाब, अन् ह्ये मोंगलाकडला ल्वोक असल तर–मंग काय व्हईल ?

विजया.–तर त्यांना विचारा अगोदर तुम्ही कोण म्हणून–पण जरा अदबीनं विचारा. उगीच हमरीतुमरीवर येण्यांत काय अर्थ ?

हरबा–(शंभूरावास) राव, तुम्ही त्येच्या नादीं कशापायीं लागता ? समद सांगतों मी तुमासनी. पन् अदुगर तुमी कोन अन् कशापाई इचारता ह्ये तर सांगाल का न्है ?

शंभू०–आम्ही कोण अन् कशापोटीं

विचारतों!–तुम्ही वाटमारे असाल म्हणून विचारतों–समजलं?

हरबा–ह्ये पगा तुमच्या सारके दिमतीचे जातिवंत मराट सरदार जर असं म्हनूं लागलं तर काय म्हनायचं ह्यना, पन् आमी आपलीं गरीब मानसं–(शंभूरावाच्या एका शिपायास) अव, जमादारसाब, ह्ये कोन हैती सरदार?

शिपाई–हे भोजतिरमल महाराजांच्या पदरचे राव शंभूराव सरदार आहेत. यांच्याशीं नाहक मगरूरी करून कसं चालणार?

हरबा–अस्सं! तर मग हो आमचंच सरदार हैती. (त्यांस मुजरा करून) सरदार, कमजास्त शबद गेल्याची माफी कराई. आमी आपलंच नोकर–आपलं काय अन् भोजतिरमल म्हाराजांचं काय–येकूच. आमासंग इजयाताई हैता. अन् त्येना त्येंच्या आजूळी चालिवलया.

शंभू०-आजोळीं चालिवली आहेस? आणि तें महाराजांच्या सल्यानं?

हरबा–तर! म्हाराजांच्या सल्याबिगर कशा बाई जातील?

शंभू०–म्हणजे? मी विजयानगर सोडण्यापूर्वीं त्या इयून निघाल्याचं महाराज म्हणत होते. आणि अजूनी त्या इयवरच?

हरबा०–वाटेमंदी येंडतापानं त्या अक्शी मांद्या झाल्या, अन् त्येच्यापाई त्येना ऱ्हानं पडलं.

शंभू०–(मिशावर पीळ देत) अस्सं! पण आणखी दुसरं कोण आहे मेण्यांत?

हर०-दुसरं! दु–दु–दुसरी त्येंच्या पदरची दासी हाये मंजुळा.

शंभू०-हं! अन् ह्या दोघीजणी मिळून चालल्या आहेत तर एकून? (स्वगत, मिशावर पीळ देत) आयती शिकार सांपडली. आतां या दोघींना परत विजयानगराला घेऊन जातों. भोजतिरमलाला इब्राहीम आदिलशहाकडून नव्यानं राज्याभिषेक होणार म्हणून विजयेला परतिवली अशी बतावणी केली म्हणजे सारं जमेल! विजापूरकराशीं सध्याचं राजकारण जमवून आणल्यावर विजया मला देण्याचं भोजतिरमलानं कबूल केलं आहेन्. इकडं राज्याभिषेक, आणि इकडं विजयेचं अन् माझं लग्न! (उघड हरबास) हें पहा–आतां असं करा. विजयाताईंना आतां आजोळीं जाण्याचं कारण नाहीं. कारण महाराजांना खुद्द विजापूरच्या पातशहाच्या हातानं पुन्हा राज्याभिषेक व्हायचं ठरलं आहे; तर अशा उत्सवाच्या वेळीं त्यांनीं महाराजांजवळ असावं हेंच उत्तम. तर मेणेवाल्यांना मेणा परत फिरवायला सांगा.

हर०–परत!

शंभू०–पण काय हो तुमच्या विजयाताईंचं वेड कसं आहे सध्यां?

हर०–थ्वाडं बरं है. आजूळी जाऊनशेनी थ्वाडं दिवस ऱ्हाल्याल तरूच अक्शी बऱ्या होऊन येत्याल.

शंभू०–अस्सं! (स्वगत) या वेडीशीं लग्न करून घ्यायचं? पण काय हरकत

आहे करून घ्यायला ! हिच्याशीं लग्न झाल्यानं पुढं मागं बिजयानगरची गादी आपल्या हातीं येणार हें तर खास आहे, तर हिला पत्करायला काय हरकत आहे ! बिजयानगरच्या गादीचा मी मालक झाल्यावर मग मी आणखी सतराशें जरी लग्नं केलीं तरी कोण विचारणार आहे मला ! एखादी थोर कुळांतली सुंदर मुलगी पाहून तिला आपली पट्टराणी करून टाकली म्हणजे झालं ! (उघड त्यास) सध्यां विजयानगराला चला. महाराजांना तेवढा राज्याभिषेक झाला म्हणजे महाराज पुन्हा पाठवून देतील त्यांना आजोळीं. चला, मला पाहूं दे त्यांची कशी काय प्रकृति आहे ती— (मेण्याजवळ जातो.)

हर०—थांबा, मी ताईसाहेबांना वरदी देतों अगोदर.

शंभू०—वरदी देण्याचं कारण नाहीं. मी त्यांना आपल्या ह्या-सारख्या समजतों—

[इतक्यांत भीनृसिंहाचे डोंगरावरून रामराय व त्याचे शहाबीस हत्यारबंद लोक खालीं उतरून पायथ्याशीं येतात.]

हरवा.—समजा म्हन. पन् कोनीबी आपला रिवाज अन् दर्जा न्है सोडूनशेनी चालायचं. रानीवंशाची अदबी आपून न्है ठेवली तर तर कोन ठेवनार ?

शंभू०—पण हे कोण बरं ! (एका शिपायास) शोध घ्या बरं कोण आहेत ते ? (स्वगत) हे जवळ येण्याचे पूर्वींच आपण बिजयेची एकदां भेट घ्यावी. अशी वेळ पुन्हा यायची नाहीं. [मेण्याजवळ जातो व पडदा आपले हातानें नाजूक करून] छेः लाजूं नका अशा. मी आपली प्रकृती पहावी म्हणूनच इथवर आलों ! आपल्याला मस्तकभ्रम झाल्यापासून महाराज फार फिकीरींत अन् दुःखांत आहेत. महाराजांना बिजापूरकरांकडून राज्याभिषेक व्हायचं ठरलं आहे. त्या समारंभाला आपण जवळ नसल्यास महाराजांना फार वाईट वाटेल. अन् एवढ्याचकरितां मी आपला मेणा परत फिरवायला सांगितला. अन् एवढा राज्याभिषेक झाल्याबरोबर महाराज—(तिचा हात आपले हातांत घेऊं लागतो) छेः छेः लाजायचं कारण नाहीं— आपला हात माझ्या हातांत जन्माचा देणार आहेत.

बिजया.—(हरजी म्हणून ओरडते व शंभूरावास) जातां कीं नाहीं इथून. नाहींतर पहा आपला विचार ! बाबांना सांगेन मी.

हर०—चला, हटका, (त्यास दूर करतो) मी न्हनत न्हवतों पहिल्यापासूनशेनीच कीं—

शंभू०—ऐकरे, (तिला) आपल्या बाबांनींच तर मला वचन दिलं आहे या संबंधानं ! (तिचा हात बळेनें धरून) ह्या हाताचं पाणीग्रहण पुढंमागं जर माझ्याचकडून व्हायचं आहे, तर मग व्यर्थ— (ती किंकाळी ठोकते.)

[त्याबरोबर रामराय मेण्याशीं वेगानें येतो.]

राम०—काय आहे काय ! किंकाळी

कोणी ठोकली ? तुम्ही कोण ? अन् मेण्यांत कोण आहे ?

विजया.–विजयानगरच्या राणीवंशांतल्या स्त्रीचा-त्यांच्या मेण्याचे पडदे वर करून–त्यांच्या पदरच्या सरदारांनीं अपमान करावा का ?

राम०–विजयानगरच्या राणीवसा ! (हरजीस) कोण आहेतरे आंत ?

हर०–(रामरायास ओळखून त्यांचे पायां पडून) म्हाराजांनीं–रामरायांनीं, या हरजीला वळखलं बी न्हाई तर ? मेण्यामंदी इजयाताई हैती !

शंभू०–(घाबरून स्वगत) हे रामराय तर एकूण ! मग मात्र कठिण प्रसंग आहे !

राम०–काय म्हणतोस ? आणि मग चालला होतां कुठं ?

हर०–आपल्या पायांसनी गांठाया.!

राम०–आणि मग हे कोण गृहस्थ ?

शंभू०–मी त्यांच्या पदरचा एक सरदार आहें.

हर०–ह्यांसनी शंभूराव म्हनत्यात. ह्यासनी मेन्याशीं जाऊं नगा म्हून सांगितलं पन् ह्ये न ऐकतां ग्येले तो इजयाताई बरडल्या.

राम०–शंभूराव, तुम्ही त्यांच्या पदरचे सरदार असून राणीवंशाचा अपमान करण्यासारख्या उद्धटपणानं वागतां हें तुम्हांला उचित नाहीं. तुम्हांला मेण्याशीं जाण्याचं कारण ?

शंभू०–विजयाताईंचं माथं फिरून त्यामध्यें वेडया झाल्या होत्या म्हणून त्यांची केवळ प्रकृती पहाण्याकरितां म्हणूनच मी मेण्याजवळ गेलों. नहून त्यांत माझ्या मनांत बिलकूल पाप नव्हतं. (स्वगत) इथं आतां अशीच बतावणी केली पाहिजे. (त्यांचे पायांवर हात ठेऊन त्यांस) तुमच्या पायांची शपथ घेतों पाहिजे तर ! तुम्ही भेटलांत फार उत्तम झालं. (त्यांचे पाय धरून) आमची सारी भिस्त तुमच्यावर आहे.

राम०–पण तुम्ही कोणीकडं इकडं ?

शंभू०–विजयानगरची सगळी हकीकत आपल्याला कळलीच असेल ! किंचित् असे बाजूला या, आपल्याला सगळं सांगतों. भोजतिरमलांनीं कृष्णराय महाराजांचा खून करवून त्यांच्या राज्याचा अपहार केला.

राम०–तें कळलं मला—

शंभू०–त्यामुळं विजयानगरचे सगळे सरदार खवळून गेले आहेत अगदीं. आणि तेव्हांपासून आमचे कट चालले आहेत. विश्वासरावांचीं पत्रं आपल्यास पोंचलींच असतील.

राम०–हो पोंचलीं.

शंभू०–पण त्या पुढली हकीकत नसेल आपल्याला ठाऊक—

राम०–कोणची हकीकत म्हटलंत ?

शंभू०–भोजतिरमल विजापूरकरांच्याकडून आपल्याला पुन्हा राज्याभिषेक करून घेणार आहेत त्या संबंधाची—

राम०–छत्र मुळींच नाहीं! पुन्हा राज्याभिषेक करून घेणार! आणि त्या यवनी शहाच्या हातानं? म्हणजे–विजयानगरच्या गादीचा कोण अपमान हा? ह्या योगानं विजयानगरनं विजापूरकरांचं मांडलिकत्वच पत्करल्यासारखं झालं! अन् हें सारं विजनगरच्या पिढीजात आणि बाणेदार सरदारांनीं अद्यापपर्यंत असं अगदीं निमूटपणं कसं सहन केलं?

शंभू०–(स्वगत) ह्याच्या तडाक्यांतून निसटून जायला हीच संधी बरी आहे. (उघड) कोणी केलंय सहन? अदिलशहा विजयानगरांत आला कीं त्याच्या लोकांवर छापा घालून त्याच्या सगळ्या लोकांची काटाकाट करण्याचं ठरलं आहे! मी दौलतराव निंबाळकराकडे चाललों आहें. त्यांना घेऊन मी विजयानगरास जाणार. आणि शहा इकडे दरबारांत गेला कीं त्याच्या लोकांची बाहेरच्या बाहेर काटाकाट करणार! विजयानगरच्या गादीवर बसायला आपल्याशिवाय दुसरा कोणी योग्य नाहीं असं आमच्या सगळ्यांच्या विचारानं ठरलं, आणि म्हणूनच आपल्याकडे हिंमतराव वगैरे सरदार गेले आहेत. आज सायंकाळच्या आंत मला दौलतरावांना जाऊन गांठलं पाहिजे. मी येतों तर. विजयाताईची प्रकृती–त्यांचं मस्तक फिरून जाऊन फार बिघडली होती, त्यांना संभाळा. कृष्णराय महाराजांचा खून त्यांच्या बहिणींनीं–म्हणजे आपल्या कुटुंबांनीं–तुम्हांला राज्य मिळावं म्हणून केला असं भोजतिरमलांनीं उठवून, पद्मावती ताईचा त्यांनीं फार छळ केला. खुद्द भोजतिरमल कृष्णरायावर मारेकरी घालून तेच त्याचा गळा दाबून त्यांना ठार करीत असल्याचं जेव्हां पद्मावतीताईनीं प्रत्यक्ष पाहिलं तेव्हां त्यांची वाचा गेली, अन् त्या मुक्या झाल्या.

रामरा०– वाचा जाऊन मुकी झाली!

शंभू०–म्हणजे! आपल्याला हें अजून ठाऊक देखील नाहीं तर?

राम०– नाहीं!

शंभू०–भोजतिरमलांनीं "पद्मावती ताईनींच मारेकरी घातले आणि आपली वाचा गेल्याचें निव्वळ ढोंग चालविलं आहे," असं म्हणून त्यांच्यावर मोठा गहजब उसळून दिला; अन् त्यांच्या महालावर पहारेकरी ठेवले. शिव, शिव! काय भयंकर प्रसंग तो! (डोळ्यास पदर लाऊन) त्या प्रसंगाची आठवण झाली कीं अगदीं भडभडून येतं. (गळा दाटून आल्याचा बहाणा करतो) आणि गळा दाटून येऊन बोलवत नाहीं अशी स्थिती होते. याबद्दल केव्हां सूड घेऊं असं झालं आहे! त्यावेळीं मी आणि हिंमतरावांनीं दोघांनीं मिळून मोठ्या गुप्तपणानें त्यांना वाड्यांतून हलकेंच काढून दिल्या. हिंमतराव त्यांना घेऊन विजयानगरांतून बाहेर पडले, आणि मी पिलाजीराव सुर्वे यांच्याकडे जाऊन दौलतरावांकडे जाण्याला निघालों, तों वाटेंत हा मेणा दिसला. मला वाटलं यांत पद्मावती-

ताई आहेत; पद्मावतीताई असत्या तर म्हटलं आपल्याकडे त्यांना सुरक्षित पोंचवून मग जावं दौलतरावांकडे. पण शोध करतों तों आंत विजयाताईच होत्या. त्यांना देखील महाराजांच्या खुनाच्या पहाण्यानंच वेड लागलं होतं–म्हणून कसं आहे तें पाहायला मेण्याशीं गेलों तों त्या आरडल्या. बरं पण हिंमतराव पद्मावतीताईंना घेऊन तुमच्याकडे यायला जे निघाले होते ते तुम्हांला येऊन मिळाले का ?

राम०–नाहीं. महाराजांच्या खुनानंतर त्यांची माझी गांठ नाहीं.

शंभू०–बरं त्यांच्यापासून कांहीं पत्रबित्र ?

राम०–कांहीं नाहीं.

शंभू०–(स्वगत) मग ठीक आहे! आतां हिंमतरावांसंबंधानं याचं मन कलुषित करून टाकायला हरकत नाहीं!

राम०–कां विचार कसचा करतां ?

शंभू०–नाहीं–म्हटलं मनुष्याचा नेम नाहीं–हिंमतरावाच्या संबंधानं सुद्धां मला आतां थोडथोडी शंका येऊं लागली आहे.

राम०–हिंमतरावासंबंधानं शंका ?

शंभू०–हो. हिंमतरावासंबंधानंच–कारण भोजतिरमलांनीं आपली विजया त्यांना द्यायची करून–आपल्या मागं विजयानगरची गादी तुम्हांलाच आपण देणार असं म्हणून काकासाहेबांनीं त्यांना आमिष दाखवलं होतं! आणि हिंमतरावहि पहिल्यापासून आपल्याला पाण्यांतच पाहतात. तेव्हां म्हटलं ह्या लालुचीला जर ते भुलून गेले असतील, तर सर्व फिसकाटायचं! हिंमतराव म्हणजे विजयानगरच्या बलिष्ठ सरदारांपैकीं एक सरदार आहेत. ते जर काकासाहेबांना फितूर झाले–तर अर्थात् आमचे सगळ्यांचे कट फिसकटून जायचे. कारण आमच्या कटाची अगदीं सारी खडान्‌खडा बित्तंबातमी हिंमतरावांना ठाऊक—

राम०–हो! कोणी सांगावं! असंही होण्याचा संभव आहे! राज्याच्या लालुचीनं कोणाच्या तोंडाला नाहीं पाणी सुटणार!

शंभू०–(एकीकडे) माझी गोळी सुरेख लागू पडली! आतां भीति नाहीं. (उघड) अन् पुन्हा कालच मी अशीही पण उडत उडत बातमी ऐकली कीं पद्मावती ताईला घेऊन निघून जाण्यांत–त्याचे कांहीं दुष्ट हेतू असावेत! कारण काकासाहेबांच्या मनांत त्यांना आपल्या नजर कैदेंत ठेवायच्या होत्या! तेव्हां आम्हांला हुलकावणी देऊन ते जर ताईसाहेबांना काकासाहेबांच्याकडेच घेऊन गेले असतील तर–सर्वच विपरीत होऊन बसायचं!

राम०–तुमच्या सांगण्यावरून मला सुद्धां आतां तीच शंका येते!

शंभू०–(स्वगत) याच्यापासून निसटून जायला काय युक्ति लढवावी! हो हीच युक्ती. (उघड) हें पहा; याला मला एक तोड सुचली आहे.

राम०–कोणची तोड म्हटलंत ?

शंभू०—मी दौलतरावांना गांठून त्यांना घेऊन विजयानगराला जातों. आणि तुमच्या विषयीं त्यांना—मुद्दाम कांहीं खोट्यानाट्या कंड्या सांगतों. म्हणजे विजयाताईंला तुम्ही कैद केल्या आहेत; पद्मावतीताईंच्या जिवास कांहीं अपाय झाल्यास विजयाताईंना ठार मारून टाकायचा तुमचा निश्चय झाला आहे म्हणून देतों सांगून त्यांना—यानं एवढं तरी होईल कीं, पद्मावतीताईंच्या जिवाला तरी मग त्यांच्याकडून कांहीं अपाय होणार नाहीं.

राम०—हो, ही युक्ती बरी आहे!

शंभू०—आणि ही बातमी आम्ही सांगितली म्हणजे अर्थातच आमच्यावर त्यांचा विश्वास बसेल. विजयाताईंना तोंपर्यंत आपल्याचकडे असूं द्यात.

राम०—ठीक आहे. हीच युक्ती उत्तम. तुम्ही भेटलांत म्हणून ही सगळी हकीकत कळली तरी—तर तुम्ही अगोदर जा अन् त्या दौलतरावांना गांठा अगोदर. आणि तुम्ही अन् ते मिळून विजयानगरांत जा. अन् तुमचं ठरल्याप्रमाणं करा. आम्ही बाहेरून येऊन अली अदीलशहाच्या सरदारांवर तुटून पडून त्यांना पार उडवून देतों! विजयानगरचें शहर—पुन्हा तुम्ही आपल्याकडे घ्या. आणि पुढं कसं कसं करायचं तें आम्ही तुम्हांला वरचेवर हेर पाठवून कळवूं. तुम्ही आम्हांला आंतली कच्ची बातमी देत जावी.

शंभू०— त्याबद्दल नका तुम्ही काळजी करूं. खुद्द विजयानगरांतलं आम्ही सगळं पाहून घेतों! तुम्ही बाहेरचं पहा म्हणजे झालं. येतों तर मी—

राम०—या. मात्र रोजच्यारोज नगरांतली बातमी आली पाहिजे. एवढं लक्षांत ठेवा. अन् तिच्या जिवाला कोणी कांहीं अपाय करतील तर त्यावर मात्र नजर असूं द्या. एकदोन गुप्त हेर ठेवा पाहिजे तर!

शंभू०—तें सारं माझ्याकडे लागलं. येतों तर—(स्वगत) कांहीं कारण नसतांना या सिंहाच्या जबड्यांत अचानक सांपडलों होतों! पण कांहीं सुदैव होतं म्हणून निसटलों! तर आतां अगोदर शहाच्या सैन्याला जाऊन मिळावं, आणि अगोदर विजयानगरांत जाऊन भोजतिरमलाचा राज्याभिषेक उरकून घ्यावा. आणि हा रामराय इथं असल्याची बातमी शहाला देऊन ह्याला हलकेच अपघातानं एकाएकी कैद करून टाकावा. म्हणजे आपोआप सगळा तंटा अन् भानगड मिटेल. हिंमतरावाची अन् रामरायाची अजून गांठ पडली नाहीं हें माझ्या किती पथ्यावर पडलं! यापुढं याची अन् हिंमतरावाची गांठ पडली तर दोघांचें अनायासेच खडाष्टक जुंपून राहील. एकंदरींत आपले ग्रहच छान आले आहेत नाहींतर हें असं जुळतं ना! आतां तिकडं भोजंतिरमलला राज्याभिषेक आणि इकडं मला दिवाणगिरीचीं वस्त्रें.[जातो]

प्रवेश २ रा.

स्थल—रामरायाची छावणी. त्याचा तंबू

प्रवेश—रामराय.

राम०—विजयानगरच्या साम्राज्याखालच्या सगळ्या मांडलिक राजांना आणि यशवंतरायासारख्या बलिष्ठ आणि कुर्रेबाज जमादाराला आणि ' नायकां 'ना जरबेंत आणलं, विजयानगरचे सगळे सरदार मला अनुकूल झाले, इब्राहिमशहानं नोकरींतून काढलेल्या इराणी आणि परदेशी लोकांना नोकरींत ठेवलं, आणि व्यंकटाद्रीच्या आणि यल्लमराजाच्या सहाय्यानें शहाच्या ताब्यांतलीं एतगीर, रायचूर, मुद्गल, बागलकोट यांसारखीं बळकट ठाणीं मोर्चे लावून सर केलीं, आणि विजयानगरास जाऊन शह द्यावा म्हणून सज्ज होऊन बसलों, हें सगळं व्यर्थं तर ! मी ज्या हिंमतरावावर विश्वास टाकला तोच जर माझा गळा कापूं लागला तर काय करणार ! त्या दौलतरावानं आपल्या पत्रांत लिहिल्याप्रमाणं तिचा अन् हिंमतरावाचा कांहीं संबंध तर नसेल ! तर मग त्या दोघांचीं मला आलेलीं तीं पत्रं सारीं मानभावीपणाचींच कीं काय ! या शंभूरावाच्या सांगण्यावरून माझी अक्कल तर अगदीं गुंग होऊन गेली आहे ! तसं नसेल म्हणावं तर हिंमतराव तिला घेऊन हा वेळपर्यंत तरी खास यावयाला पाहिजे होता. कृष्णरायाचा खून झाल्याची बातमी मी कर्णोपकर्णीं मात्र ऐकतों, पण यासंबंधानं हिंमतरावाकडून मला एक बोटभर चिठी नाहीं कीं निरोप नाहीं. तेव्हां काय म्हणावं या प्रकाराला ? मला वाटतं या शंभूरावाच्या सांगण्याप्रमाणेंच मलाही पण आतां असंच वाटूं लागलं आहे कीं, विजयानगरच्या गादीच्या आशेनं हिंमतरावाच्या तोंडाला खास पाणी सुटलं असावं. [विचार करतो] तरी पण भोजतिरमलानंच कृष्णराय महाराजांचा खून केला अशी खात्री झाल्यावर हिंमतराव सहसा भोजतिरमलाच्या म्हणण्याला रुकार देईल हें संभवत नाहीं ! कारण विजयानगरच्या गादीवर त्याची तशीच विलक्षण भक्ति आणि प्रेम आहे. पण न जाणों, मनुष्याची बुद्धि केव्हां आणि कशी फिरेल हें सांगतां येत नाहीं.

[इतक्यांत एक नोकर येतो.]

लुखजी०—भाईर सरदार हिंमतराव आल्याती.

राम०—हिंमतराव आले आहेत ? एकटेच आले आहेत कीं आणखी दुसरं आहे कोणी त्यांच्याबरोबर ?

लुख०—यकटेच हायती.

राम०—जा, त्यांना घेऊन ये तर. (स्वगत) हा भोजतिरमलाकडून कांहीं राजकारण घेऊन मला कैद करायला तर नसेल आला ! कांहीं असो. आपण सावध असावं म्हणजे झालं. (तरवार सांवरतो व कटयार घेऊन नीट खोंचतो.)

[हिंमतराव येतो.]

हिंमत०–(दोघांचे नमस्कार होऊन) काय चाललंय ? कसल्या विचारांत कसल्या आहांत ?

राम०–विचारांत होय ? म्हटलं आपण भोजतिरमलाकडून आम्हांला कैद करायचं राजकारण घेऊन आलां आहांत कीं काय–याच विचारांत होतों.

हिंमत०–तुम्हांला कैद करण्याचं राजकारण ! आणि भोजतिरमलाकडून ! खुद्द माझ्याबद्दल जर तुम्हांला अशी शंका येत असली तर (आपली तरवार त्याचे हातीं देऊन ही तरवार घ्या, आणि (मान वांकवून) ही आपल्यापुढें माझी मान आहे–एका घावासरशीं ही गर्दन छाटून टाका !

राम०–(स्वगत) शंभूराव म्हणाले, तसं कांहीं दिसत नाहीं. पण हें सगळं बरकरणी तर नसेल ! कांहीं असो (उघड) हिंमतराव उठा उठा–इतक्या आणीबाणीवर येण्याचं कारण नाहीं. तुमच्यासंबंधानं मला शंका नाहीं. पण कृष्णरायमहाराजांचा खून झाल्यापासून तुमच्याकडून एक देखील पत्र नाहीं कीं निरोप नाहीं हें कसं ?

हिंमत०–पत्र नाहीं ?

राम०–हो, हो. एक देखील पत्र नाहीं कीं निरोप नाहीं.

हिंमत०–महाराजांचा खून झाल्यावर आपल्याकडे मी एक माझं, व दुसरं पद्मावतीताईचं अशीं दोन पत्रं देऊन हलकाऱ्यांची एक जोडी पाठविली होती. त्यापुढें मात्र मला आपल्यास कांहीं लिहितांच आलं नाहीं !

राम०–तुमचे हलकारेहि नाहीं आले आणि पत्रंहि नाहीं आलीं !

हिंमत०–चमत्कार आहे म्हणायचा तर !

राम०–बरं पण महाराजांच्या मागून विजयनगरच्या गादीवर कोण बसलं ? भोजतिरमलच ना ?

हिंमत०–हो. त्यांनीं कृष्णराय महाराजांचा खून करून सध्यांतरी बळकावली आहे खरी गादी.

राम०–बळकावली म्हणजे ? ते जर प्रत्यक्ष त्यांचे चुलतेच आहेत तर त्यांच्याशिवाय दुसऱ्या कोणाचा हक्क आहे गादीवर ? तें असो म्हणा–पण भोजतिरमल तुम्हांला आपले जांवई करणार आहेत ही बातमी खरी का ?

हिंमत०–हो. कृष्णरायाच्या खुनाचा आरोप तुमच्यावर घालून–विजयानगरचे गादीवर बसण्याचे आपले डाव साधण्याकरितां मला विजया देण्याचा त्यांचा बेत होता खरा. पण दरम्यान मी जेव्हां–खुद्द भोजतिरमलांनींच महाराजांचा खून केला असं विजयानगरच्या सगळ्या सरदारांना सांगत सुटलों,–तेव्हां अर्थातच तें सर्व जागच्याजागीं दबलं. उलट त्यांनीं माझ्यावर मारेकरी देखील घातले. पण सुदैवानं मी त्यांच्या तावडींतून निसटून आलों.

राम०–अस्सं ! पण तुमचे, ते दोस्त शंभूराव त्यांची आणि तुमची कुठें चुकामुक

पडली ? त्यांनीं आणि तुम्ही तिची मुक्तता केली होती ना ?

हिंमत०–शंभूराव माझा दोस्त ! आणि त्यांनीं अन् मी पद्मावतीताईंची मुक्तता केली ?

राम०–हो. असं तेच म्हणत होते.

हिंमत०–केव्हां !

राम०–कालचीच गोष्ट—

हिंमत०–कालचीच गोष्ट ? तर त्यानं आपल्याला फशिवलं हेंच खास–मी ताईंची मुक्तता करून त्यांची तुमच्या इकडे माझे विश्वासू लोक देऊन रवानगी केली असतां उलट त्या हरामखोरानं त्यांना वाटेंत पकडून पुन्हा भोजतिरमलाकडे कैद करून पाठवून दिल्या; आणि म्हणूनच तर मला इकडं यावयाला इतका उशीर झाला. ताईंना पकडून नेल्याची बातमी मला कळल्याबरोबर मी गुप्तपणें पुन्हा विजयानगरांत गेलों, तों त्यांना काकासाहेबांनीं आपल्या नजरकैदेंत ठेवलेल्या ! पण तिथं देखील त्यांच्या तैनातींत असलेल्या एका विश्वासू दासीजवळ संधान बांधून त्यांच्या जिवाला कांहीं अपाय न व्हावा अशाबद्दल तजवीज करून इकडं निघून आलों.

राम०–तर मग शंभूरावानं काल जें मला सांगितलंन तें खोटंच तर. तो तर विजयानगरच्या सगळ्या सरदारांचे अन् आपले कट झाले आहेत, तुम्ही विजयानगरावर बेलाशक चाल करून या–आपण विजयानगरांत सगळी फूट करून ठेवतों–म्हणून सांगून गेला आहे–आणि भोजतिरमलानं तुम्हांला अनुकूल करून घेतल्याचंहि त्यानंच सांगितलंन.

हिंमत०–तर मग त्या शंभूरावानं तुम्हांला अगदीं हातोहातीं फशिवलन् म्हणायचं ! भोजतिरमलाला मारेकरी आणून देणारा तोच हरामखोर ! आणि तोच भोजतिरमलाला राज्याभिषेक करून विजयानगरच्या गादीवर बसविण्याकरितां विजापूरकर इब्राहीम अल्लीअदीलशहाला आमंत्रण करायला गेला होता ! तुंगभद्रेच्या कांठच्या श्रीनृसिंहाच्या देवालयांतील मूर्तीचा विध्वंस करून त्या देवळाची मशीद करून टाकायला हाच निमकहराम–शंभूराव–कारणीभूत झाला ! त्याला विजयानगरचं राज्य बुडवून, तिथं विजापूरकरांची अदीलशाही स्थापून, विजयानगरची सुभेदारी पटकवायची आहे ! विजयानगरचे सेनापती–संगीतराय–यांनीं इस्मायल अदिलशहाला कृष्णातीरीं रणधूळ चारून नामोहरम करून कृष्णाबाईंत सपशेल बुडवून टाकला, त्याचा बदला घेण्याचे इब्राहीमशहाचे विचार चालले आहेत; आणि हा हरामखोर–शंभूराव–आपल्या हातानं आपल्या घरावर–आपल्या राज्यावर आणि सगळ्या मराठ्यांच्या पातशाहीवर आग ठेवण्याच्या खटपटींत आहे ! कोण अधमपणा हा ! असल्या मात्रागमनी, फितूरी, आणि देशबुडव्या अधमांना भयंकर शिक्षा पाहिजे ! यांच्याकरितां शिक्षेच्या नव्या नव्या तऱ्हा काढून त्यांना हाल हाल करून ठार मारलं

पाहिजे ! विजापुराहून येतांना हिंदु स्त्रियां-च्या पातिव्रत्याचे या नराधमानें किती बळी घेतलेन् ! आणि ते त्या शहाला आणि त्याच्या सरदारांना खूष करून त्यांची मर्जी संपादन करण्याकरितां ! आपल्या हातानं— आपल्या आयांना, आपल्या बहिणींना, आपल्या बायकांना आणि आपल्या पोटच्या गोळ्यांना शत्रूच्या घरांत पोंचवून त्यांना आणि त्यांच्याबरोबर आपल्या जातीला, कुलाला आणि धर्माला भ्रष्ट करणाऱ्या या असल्या कुलांगारांच्या शब्दांवर भरंवसा ठेवणें म्हणजे जाणून बुजून आगीच्या लोळांत उडया टाकण्यासारखं आहे ! पण त्या हरामखोराची अन् तुमची गांठ तरी कशी पडली ?

राम०—मी श्रीनृसिंहाचं दर्शन घेऊन खालीं आलों तों पायथ्याशीं एक मेणा होता, त्या मेण्याशीं तो उभा होता. तिथं कांहीं ओरड झाली म्हणून मी जातों तों यानं मला ही सारी हकीकत सांगितली. तो मेणा विजयेचा होता. भोजातिरमलाकडून पद्मावतीच्या जिवाला कांहीं धक्का लागूं नये म्हणून विजयेला कैदेंत ठेवण्यास त्यानं मला सांगितलंन्. आणि तो दौलतरावांना घेऊन विजयानगराकडे जातो म्हणून तावडतोब निघून गेला.

हिंमत०—तावडतोब निघून गेला ?

राम०—हो, तावडतोब निघून गेला.

हिंमत०—तर आपल्या हातांतून निसटून जाण्याकरितांच त्यानं हा सारा कावा केलान्. तो तर पक्का मात्रागमनी ! विजया कुठें आहे ?

राम०—त्या तंबूंत ठेवली आहे तिला.

हिंमत०—कैदेंत ?

राम०—कैद कसली ? माझ्या नजरेखालीं आहे ती.

हिंमत०—छेः छेः, ती तर अगदीं निरपराधी आहे. कृष्णरायांनीं भ्रमिष्ट व्हावं म्हणून त्यांना चारण्याकरितां तयार केलेले कांहीं अमली पदार्थ चुकून तिनं खाल्ल्यामुळें ती जरा भ्रमिष्ट झाली होती ! या भ्रमांत कृष्णराय महाराजांचा आपल्या बापानं खून केल्याचं तिनं प्रत्यक्ष पाहिलन्, तेव्हां तें तिच्याकडून बाहेर येऊं नये म्हणून काकासाहेबांची कोण खटपट ! ती जरी शुद्धीवर येत चालली होती तरी देखील त्यांनीं तिला वेड लागलं आहे म्हणून उठवून खोलींतच कोंडून ठेवली होती ! चला, तिच्याकडे जाऊं आपण म्हणजे कृष्णरायांच्या खुनाची सगळी हकीकत तीच सांगेल तुम्हांला—[जाऊं लागतात]

[इतक्यांत लुखजी दोन मराठे सरदारांस घेऊन येतात.]

लुखजी—(रामरायास) ह्ये सरदार आले हायती आपनासनी भेटाया.

राम०—आपण कोण ? कोणाकडून आलांत ?

पहिला—भोजातिरमलाकडून आलों आहोंत आम्ही.

• दुसरा—भोजतिरमलांनीं आपल्यास ही थैली दिली आणि हा नजराणा दिला आहे. [पत्रें देऊन नजराणा पुढें ठेवतात.]

रामo—भोजतिरमलाकडून पत्र आणि नजराणा ! [हिंमतरावाकडे शंकितमुद्रेनें पाहून पत्र फोडून वाचतो.]

हिंमतo—(स्वगत) विजयानगरांत माझ्यावर वार करायला जे सरसावले होते तेच हे ! हे कांहीं तरी घातपात करण्याच्याच हेतूनें आले असले पाहिजेत !

रामo—हिंमतराव, वाचा वाचा हें पत्र. महाराजांच्या खुनाचा पत्ता लागला; आमच्यावरील सगळा संशय पार नाहींसा झाला. आम्ही निर्धास्तपणें विजयानगरास यावं, म्हणून लिहिताहेत हे.

हिंमतo—काय कावा आहे ! रामराय, हें सगळं कपट आणि भयंकर कारस्थान आहे ! (दोघां सरदारांस) कायरे तुम्ही कोण आहां ? मी तुम्हांला ओळखलं नाहीं असं वाटतं काय तुम्हांला ? विश्वास दाखवून माझ्यावर हत्यार उचलणारे तुम्हीच नव्हे का ? रामराय, कृष्णराय महाराजांचा खून करणारे हेच ते मारेकरी ! भोजतिरमलांनीं सध्यां त्यांना विजयानगरचे सेनापती केलं आहे. (त्यांस) होयना हो ? (ते दोघे सरदार घामाघूम होऊन तरवारीस हात घालतात.), खबरदार, तरवारी खेंचाल तर. (तरवार उपसून) इथल्या इथं गर्दना छाटून टाकीन ! तुम्ही तुरुंगांत असतांना तुम्हांला मी भेटल्याची आठवण आहे का ? घाबरूं नका असे ! खरं असेल तें कबूल करा.

रामo—म्हणजे एकूण हे मारेकरी आहेत तर ! [कनार्थीजवळ जाऊन शिंग फुंकतो व तरवार उपसतो. त्याबरोबर पांच सहा हत्यारबंद शिपाई येतात.]

रामo—[शिपायांस] कैद करा अगोपर यांना—या हरामखोरांना देहांत शिक्षाच दिली पाहिजे. (त्यांस) बोला, हीं पत्रं आणि हा नजराणा घेऊन इथं येण्यांत तुमचा काय हेतू आहे ?

दोघेo—सगळं सांगतों महाराज, पण आम्हांला जिवदान मिळेल तर—

हिंमतo—खरं सांगा तर—तुम्हांला इथं पाठविण्याचा उद्देश काय त्या भोजतिरमलाचा ?

दोघेo—हे तिथं आल्यावर—यांना कैद करून, यांचा शिरच्छेद करायचा, असंच त्यांचं ठरलं आहे. आणि जो यांना धरून आणील त्याला त्यांनीं ५००० मोहरांचं बक्षीस लावलं आहे. त्या आशेला गुंतून पैजेचे विडे उचलून आलों आहों आम्ही.

हिंमतo—हं ! पैजेचे विडे उचलून आलां आहांत तर !

रामo—बघतां काय ! खेंचा त्यांना. त्यांचे खूनच पाडले पाहिजेत ! (शिपाई त्यांस कैद करतात.) हिंमतराव, आज तुम्ही आलांत म्हणूनच हें एक विघ्न टळलं. नाहींतर भलताच प्रकार व्हावयाचा. (शिपायांस) जा त्यांना नीट पाहऱ्यांत ठेवा.

हिंमत०–हो असं खरं कांहीं अंशीं! यांना ठार करून नाहीं उपयोगी. यांना विजयानगरांत नेऊन महाराजांच्या खुनाचं माप भोजतिरमलाच्या पुरं पदरांत घातलं पाहिजे. यांना कैदेंत ठेऊन यांच्यावर चांगला पाहरा द्यावा ठेऊन म्हणजे झालं. विजयेकडे जाऊं या?

राम०–हो चला. तिकडंच निघालों होतों आपण तों मध्येंच हा प्रकार घडून आला. चला तर, तिच्याकडेच जाऊं—

[दोघे जातात.]

प्रवेश ३ रा.

स्थळ–विजयानगर येथील राजवाडा.

प्रवेश–भोजतिरमल–व चंपावती व पिशाचरूपी कृष्णराय.

भोज०–(त्याला कृष्णरायाचें भूत दिसतें व तें त्याचा गळा दाबते त्याबरोबर तो किंकाळी ठोकतो.)

चंपा०–(घाबऱ्या घाबऱ्या येऊन) अगबाई, किंकाळी कां ठोकायची अशी? काय, झालं काय?

भोज०–(घामानें डवडवलेला व श्वास टाकित, तिला) तुला कांहीं दिसलं नाहीं इथं?

चंपा०–इथं? छेः, मला तर नाहीं कोणी दिसलं. इथं कोण दिसणार! घामाघूम किती व्हायचं हे? (ती त्याचा घाम पुसते.)

भोज०–आतां इतक्यांत कृष्णरायासारखी एक आकृती–आकृती कां खुद्द कृष्णरायच जसा कांहीं हुबेहुब–इथं आला –तो कायससं पुटपुटला–पुटपुटला का? तो चांगलं बोलला. (स्वगत) पण तो काय बोलला हें हिला सांगून काय उपयोग? तें हिला सांगितलें तर हिला देखील मग माझाच संशय यायचा! (उघड) आणि मग त्यानं एकदम माझा गळा दाबलान्! त्याबरोबर मी किंकाळी ठोकली!

चंपा०–नुसता भास असेल हा!

भोज०–इतक्यांत–प्रत्यक्ष जर मी त्याला पाहिला–तर भास कसला!

चंपा०–छेः बाई. हा राज्याभिषेक झाल्या दिवसापासून–झोंप कुठं आहे दोन चार दिवस? अन् अगोदरच येत नव्हती. तें सगळं सांचल्यामुळें पित्त वगैरे होऊन झालं असेल असं, अन् दुसरं काय? (दासी येते तिला) कायगं?

दासी.–भाईर शंभूराव आल्याती—

भोज०–शंभूराव आले आहेत? हो, त्यांना मीच बोलावणं पाठिवलं होतं. त्यांना घेऊन ये इकडेच–(चंपावतीस) तूं महालांत जा. मी आलोंच इतक्यांत. (चंपावती जाते व शंभूराव येतो.) या, या शंभूराव, उशीर केलांत? मी तुम्हांला केव्हांच बोलावणं पाठविलं होतं!

शंभू०–महाराजांचं बोलावणं आलं त्या वेळेला मी शहाकडे उद्याची तीन लाखाची थैली पोंचवायला गेलों होतों.

भोज०–अस्सं?

शंभू०—सेवकाला काय हुकूम आहे महाराजांचा? मला कां पाठिवलं होतं बोलावणं?

भोज०—हे पहा. तुम्हीं इब्राहीमशाहाला तख्तावर बसण्याचा आग्रह केलांत त्याचा मोठा भयंकर परिणाम झाला! त्या योगानें विजयानरची गादी म्लेच्छांच्या स्पर्शानें भ्रष्ट झाली असें समजून इथले सगळे सरदार आणि नगरवासी लोक फार दिलगीर, नाउमेद, आणि रुष्ट होऊन गेले आहेत! आणि मला देखील पण असंच वाटतं!

शंभू०—तें सगळें खरं. पण त्यावेळीं तसं करण्याशिवाय गत्यंतरच नव्हतें. कारण तसं केलं नसतं तर शहाला तो अपमान वाटता; आणि त्यामुळं भलताच प्रसंग ओढवता! इथल्या लोकांना जर असं वाटत असेल तर आपल्या धर्मगुरूंच्या आणि इथल्या ब्रह्मवृंदाच्या सल्ल्यानें एखादा होम हवन अथवा शांति करून सिंहासन शुद्ध करून घेतलं म्हणजे झालं!

भोज०—हो. बरी युक्ति सुचिवलीत. शहाचं म्हणणं—कीं, आमच्या राजमहालासमोर त्याच्याकरितां आम्ही "इब्राहिम महाल" बांधवावा. आणि श्रीनृसिंहाच्या देवळाजवळ त्याच्याकरितां एक मशीद बांधवावी. आम्ही त्याला खंडणी द्यायची कबूल केल्यापासून तो आम्हांला जास्त जास्तच दडपीत चालला आहे. हें कांहीं ठीक नव्हे एकंदरींत! राज्याभिषेक झाल्या दिवसापासून मी रोज दहा हजार होनांचा दानधर्म करविण्याचा नित्यक्रम ठेवलं आहे; तरी देखील लोक माझ्या नांवानं खडे फोडीत असल्याचं माझ्या कानावर येतं! शिवाय रामराय आणि हिंमतराय हे मोठें सैन्य घेऊन नगराबाहेर आल्याची बातमी आहे. विजया त्यांच्या कैदेंत असल्याचं तुम्हींच सांगितलंत. त्यांच्याकडे—"विजयेला आमच्याकडे परत पोंचवा नाहींतर शहाचं सैन्य तुमच्यावर पाठिवणं भाग पडेल" म्हणून मी त्यांना निरोप पाठिवला आहे. वकील आतां उलट काय निरोप आणतात पहावं! ही एक काळजी आणि दुसरी गोष्ट अशी कीं, शहाच्या छावणींत रोज दोनशें गाई काटल्या जातात म्हणून बातमी आहे! ती खरी कां? याबद्दल मी तुम्हांला पहिल्यापासूनच स्पष्ट सांगितलं होतं कीं विजयानगरच्या हद्दींत गोहत्या साफ होऊं द्यायची नाहीं!

शंभू०—त्याबद्दल मी शहाला अगोदरच सूचना देऊन ठेवली होती. आणि त्याप्रमाणें त्यांनीं आपला कसाईखानाहि तुंगभद्रेच्या पलीकडे चार कोसांवर ठेवल्याचं खुद्द त्यांच्या सरदारांनीं सांगितलं होतं मला.

भोज०—कांहीं असो, याबद्दल तुम्ही जातीनं बारीक शोध घ्या. कारण हे ब्राम्हणांचे शाप आणि या गोहत्या डोकीवर घेऊन हें विजयानगराचं राज्य लाभायचं नाहीं मला! राज्याभिषेकाच्या दिवसापासून कृष्णराय सतत माझ्या डोळ्यांपुढें उभा आहे! तुम्ही येण्याच्या पूर्वींचीच गोष्ट—मी महालांत निजायला जात होतों तों "माझ्या

रक्तानं आणि यवनी राजाच्या स्पर्शानं तूं ही विजयानगरची गादी भ्रष्ट केली आहेस. त्याअर्थीं मी तुला ही पचूं देणार नाहीं" असं म्हणून त्यानं माझं नरडं दाबलन्.

शंभू०—म्हणजे ते तुम्हांला दिसले कीं काय तर ?

भोज०—हो हो. दिसले म्हणजे काय—अगदीं स्पष्ट दिसला तो मला. त्यानं माझं नरडं दाबल्याबरोबर मी किंकाळी ठोकली त्याबरोबर 'काय झालं' म्हणून ती घाबरून आली; त्याबरोबर तो दिसेनासा झाला. आणि इतक्यांत तुम्ही आलांत.

शंभू०—हं, तरीच महाराजांच्या मनाची वृत्ती अशी चंचळ चमत्कारिक झाली! अंः यांत काय आहे. याबद्दल घाबरायचं मुळींच कारण नाहीं. कृष्णराय जर भूत झाले असतील तर त्यांना गाडून टाकायला किती उशीर. एखादा देवऋषि बोलावूं आणि त्याच्याकडून त्यांना गाडून टाकूं म्हणजे झालं. मग पुन्हा ते दिसण्याचं नांव नको !

भोज०—असं होत असेल तर फार उत्तम. मात्र देवऋषि चांगला पहा.

शंभू०—अथवा बीरमंत्र, चेटकं जाणणारा एखादा वाकबगार 'जानता' मुसलमानच पाहतो म्हणजे झालं ! मुसलमानांत चांगले जाणते लोक असतात अशा संबंधानें. ते त्याच्या डोकींत खिळे ठोकून त्याला पार गाडून टाकतील !

भोज०—ठीक आहे, तसं करा; पैण हें लौकर उरकलं पाहिजे. त्याशिवाय या वाड्यांत झोंप नाहीं यायची मला यापुढं ! मी राज्यारोहणाचे दिवशीं सिंहासनावर बसलों पण खालून माझे पाय कोणी ओढीत असल्याचा मला भास होत होता ! व वरून माझ्या डोक्यावरील किरीटावर कोणी हात ठेवून बळीराजाप्रमाणें मला पाताळांत दडपून गाडून टाकीत आहे असं मला वाटत होतं !

शंभू०—सगळंच चमत्कारिक ! काहीं असो. दोन दिवसांत व्यवस्था करून टाकूं सगळी ! येतों तर मी. [जातो.]

भोज०—या. (शंभूराव जातो) कृष्णराय जिवंत असतांना मला चांगली गाढ झोंप येत होती. त्याच्यावर मारेकरी घालण्याचे विचार माझ्या डोक्यांत घोळूं लागल्यापासून ती जी पार गेली ती हा वेळपर्यंत माझ्या वांट्यास आली नाहीं. (त्यास पुनः कृष्णरायाचें भूत दिसतें.)

कृष्ण० चें भूत.—झोंप ! झोंप ! झोंप ! तुला आतां जेव्हां कायमची झोंप मिळेल तेव्हां झोंप ! एरवीं ती तुला मी येऊं देणार नाहीं ! माझ्या खुनासारखा जेव्हां तुझा खून होईल, तेव्हां तूं अन् मी एका मसणवट्यांत निजूं.! 'तोंपर्यंत झोंप झोंप' म्हणून असाच तळमळंत पड ! माझ्यावर मारेकरी घालून माझी अशी नरडी दाबलीस नाहीं ? आणि मी मेल्यावर देखील अजून

तूं माझा पिच्छा सोडीत नाहींस ? माझ्या डोकींत खिळे ठोकून तूं मला गाडून टाकणार ? टाक, टाक, टाक गाडून ! [त्याची नरडी दाबतो, त्याबरोबर भोज किंकाळी ठोकतो—इतक्यांत चंपावती घाबऱ्या घाबऱ्या प्रवेश करिते.]

चंपा०—आज काय झालंय तरी काय असं ?

भोज०—(गर्भगळित होऊन बोबडी बळलेला) न-न-न-न—नरडी दाबली माझी !

चंपा०—चला गडे इथून—आपण महालांत जाऊं. (जातात-)

[पडदा पडतो.]

प्रवेश ४ था.

स्थल—तुंगभद्रेपलीकडील रामरायाची छावणी—तंबू.

प्रवेश—रामराय, हिंमतराव, इतर सरदार, भोजतिरमलाकडून आलेले वकील व विजया.

रामराय—रघुनाथराय, महाराजांना म्हणावं, विजयाताईना मी आपली बहीण असं समजून आपल्याबरोबर आणली आहे. तिला उदईक आपल्याकडे पोंचविण्यास येणार होतों; तों आपल्याकडून निरोप आला. महाराजांपुढें आमचा हा नजराणा सादर करा; आणि त्यांना आमचा नम्रतापूर्वक असा अर्ज आहे म्हणून सांगा कीं, त्याचा प्रेमपूर्वक स्वीकार करावा. विजयानगरच्या गादीचे आम्ही पिढीजात कट्टे नोकर आहोंत ; महाराजांनीं आम्हांला पूर्ववत् नोकरींत घेऊन—आमच्यावर विश्वास टाकून—आमच्याकडून काम घेतलें तर विजयानगरच्या गादीची इमानें इतबारें सेवा करायला आम्ही एका पायावर तयार आहों. (फुलें व तुळशी असलेलें तबक पुढें घेऊन) महाराजांच्या खात्रीकरितां तुमच्या देखत हीं फुलं आणि तुळशी उचलून सांगतों कीं, आम्ही आमच्या धर्माला आणि शीलाला कधीं अंतर देणार नाहीं कीं विजयानगरच्या गादीशीं कधीं बेइमान आणि निमकहराम होणार नाहीं ! मात्र महाराजांच्या चरणापाशीं एक विनंति आहे—ती इतकीच कीं—महाराजांनीं विजापूरकर इभ्राहिमशहाला आतां निरोप द्यावा. कारण त्याच्या राहण्यापासून खुद्द हिंदूंच्या राजधानींत गोहत्या होऊन आणि कित्येक हिंदू स्त्रियांचं पातिव्रत्य भ्रष्ट होऊन भयंकर पापाचरण होत आहे ! शिवाय आपल्या राज्यांत यवनी राजाचा एकदां हात शिरकला म्हणजे त्यापासून पुढें काय काय अनर्थ ओढवतील हें आजच जरी सांगतां येणार नाहीं, तरी आपल्या डोळ्यांपुढून ब्राम्हणी राजांच्या अमदानींत घडलेले भयंकर प्रकार गेले नसतील अजून ! त्यांनीं केलेली. रयतेची लूट, देवालयांचा उच्छेद—देवालयांतील मूर्तींचा भंग, पुण्यक्षेत्रांना बाटविणं, ब्राम्हणांना धरधरून मुसलमान केलेले भयंकर प्रकार, हिंदू स्त्रियांचा छल व त्यांचा पातिव्रत्यभंग आणि

निर्दयपणानें केलेले भयंकर खून, हे कुठला हिंदू विसरेल ! हे सगळे प्रकार डोळ्यांपुढें असून आपल्या राज्यांत यवनी राजाचा हात शिरकिवणं किती अविचाराचं आणि किती अनिष्ट आहे याचा विचार करून महाराजांनीं शहाला निरोप द्यावा; झालं इतकं बस्स झालं ! नाहींतर तो यापुढें आपल्याला जास्त जास्त दडपीत जाईल आणि खुद्द मराठेशाहीच्या राजधानींत श्रीनृसिंहाच्या देवालयाचा विध्वंस करून तिथं तो आपली मशिद बांधील— आणि मग वेळ निघून गेल्यावर महाराजांना पश्चात्ताप होईल म्हणून म्हणतो—महाराजाच्या चरणापाशीं ही आमची नम्रतापूर्वक विनंति सांगा. आणि आमच्याकडून सेवा घेण्याची महाराजांची इच्छा असल्यास ती एकनिष्ठपणें करण्यास आम्ही एका पायावर तयार आहों—यांत एक काडीचंही अंतर पडणार नाहीं, असं सांगा. आणि पुढें आम्हांला आज्ञा होईल त्याप्रमाणें आम्ही वागूं.

रघुनाथराय.—ठीक आहे. मी आपला निरोप कळवितों.

हिंमत०—आपल्यास यांत कांहीं वावगें वाटतें काय ?

रघु०—यांत वावगं काय आहे ?

[विडे, अत्तरगुलाब वगैरे देतात.]

रघुनाथराय.—येतों तर मी—

राम०—यावं—(वकील व इतर सरदार जातात.) हिंमतराव, विजयाताईंना घेऊन या, त्यांचा मेणाही जाऊं दे यांच्याच बरोबर.

हिंमत०—ठीक आहे. [जातो.]

राम०—(स्वगत) ज्यानं कृष्णरायाचा खून केला त्याला गादीवर ठेऊन त्याची नोकरी करण्याइतका मी मूर्ख नाहीं ! जे मारेकरी या काकानं आपल्या पुतण्यावर घातलेन् त्याच मारेकऱ्यांच्या हातूनं याला देहांत प्रायश्चित देवून कृष्णराय महाराजांच्या खुनाबद्दल सूड उगवीन तेव्हांच माझा क्रोधाग्नी शांत होईल ! पद्मावतीचं कृष्णरायावर कोण प्रेम ! तिच्या सर्वस्वाची ज्यानं अशी राखरांगोळी केलीन् आणि कृष्णरायाच्या भयंकर खुनानं ज्यानं तिला जन्माची मुकी करून आपल्या कैदेंत ठेवलीन् त्याचा सूड घेतल्याशिवाय राहवेल कसें माझ्यानं ! त्या वकिलाला मी फुलं आणि तुळशी उचलून दिल्या पण त्या विजयानगरच्या गादीला बेइमान होणार नाहीं म्हणून दिल्या. विजयानगराच्या गादीकरितां, विजयानगरच्या प्रजाजनाकरितां, हिंदु स्त्रियांचं पातिव्रत्य, गोब्राम्हणांचा प्रतिपाळ, आणि धर्माचं रक्षण हीं करण्याकरितां मी त्या उचलल्या. ह्याकरितां मी आपले प्राण वेंचीन—माझी शपथ ह्याकरितां आहे ! म्हणून राज्य बळकावण्याच्या हेतूनं प्रत्यक्ष आपल्या पुतण्याचा खून करून त्याच्या मांसोळ् आपली चोंच खुपसणाऱ्या ह्या काकाची नोकरी करण्याकरितां नाहीं !

[इतक्यांत हिंमतराव व विजया येत आहेत.]

विजया—(हिंमतरावास) मी बाबांच्याकडे जातें पण, मला मात्र अंतर देऊं नये.

हिंमत०—तुझ्या म्हणण्याप्रमाणें शपथ दिल्यावर आणखी काय पाहिजे तुला! तुझ्याशिवाय दुसऱ्या स्त्रिया मला मातेसमान आणि बहिणीसमान आहेत. मग आतां काय उरलं ? (तो तिचा हात सोडवून घेतो)

विजया.—(पुढें येऊन रामरायास नमस्कार करते.) येतें तर मी.

राम०—या. मात्र तिथं गेल्यावर तिचा शोध घेऊन तिकडची सगळी कच्ची हकीकत मंजुळेबरोबर मला कळवा. त्याशिवाय समाधान नाहीं वाटणार माझ्या जिवाला.

विजया—त्याबद्दल नको काळजी करायला. मी तिथं गेलें म्हणजे ताईच्या जिवाबद्दल तुम्ही एका काडीची देखील काळजी करूं नका.

राम०—(हिंमतरावास) मेण्यांत बसवा आणि पोंचवा त्यांना. (विजया व तो जातो.) (स्वगत) हिचं मन किती निर्मळ आहे. कृष्णरायावर आणि पद्मावतीवर हिचं कोण प्रेम! आणि त्या नराधमाच्या डोक्यांतच कुठले ते भयंकर खुनी विचार शिरले! असल्या कोमल मनाच्या मुलीला हा असला मांग बाप शोभत नाहीं हेंच खरें! भोजतिरमलाकडून आतां जसा उलट निरोप येईल तसं पुढं वागायचं!

[पडदा पडतो.]

प्रवेश ५ वा.

स्थळ.—नरसिंहमंदिर.

प्रवेश.—रामराय, हिंमतराव, विश्वासराव शंभूराव व (वेष पालटून) इतर सरदार मंडळी.

शंभू०—(स्वगत) भोजतिरमलाकडून कालपासून मला थोडथोडकीं नाहीं पण दहावीस बोलावणीं आलीं. पण आतां त्यांच्याकडे जाण्यांत अर्थ काय? रामरायाची ही इराणी आणि परदेशी फौज इतकी मोठी आहे कीं इब्राहिम आदिलशहासारख्याच्या पादशाहीला देखील ती हां हां म्हणतां पार बुडवून टाकील! शिवाय हे हिंमतराव, विश्वासराव, दौलतराव, हंबीरराव प्रतापराव आणि त्याचप्रमाणें रामरायाचे हे भाऊ—व्यंकटाद्रि आणि यल्तमराय—हे आपल्या प्रचंड सेना घेऊन विजयानगरची राज्यक्रांति करायचा निर्धार करून आले आहेत. तसेंच यशवंतराव जमेदारासारखे हे रणझुंझार जमेदार आणि ह्या प्रांतांतील झाडून सगळे ‘ नायक ’ लोक यांना येऊन मिळाले आहेत. तर अशा प्रसंगीं भोजतिरमलाला चिकटून राहण्याइतका दुधखुळा आणि बेडापीर मी नाहीं! त्याला चिकटून राहून दुसरं तिसरं तर कांहीं नाहीं, पण मला आहे ती सरदारी मात्र गमवावी लागेल. आणि इतकंच असून प्रसंगीं जर सगळीच लाट उलटली, आणखी भोजतिरमलाचीच सरशी झाली, तर ह्या सरदारांनीं आप-

त्याला कैदबंद करून टाकलं होतं म्हणून त्याला याप दिली म्हणजे झालं !

[हिंमतराव येतो.]

विश्वास०—या, या, हिंमतराव, इतका उशिरसा केलात !

हिंमत०—उशीर ! उशीर कसचा ? सगळेकडची नाकेबंदी करून यायला इतका उशीर लागला !

विश्वास०—असं ?

हिंमत०—(विश्वासरावास एकीकडे) शंभूरावाचा—त्याच्यासंबंधानं आम्हांस कांहीं माहित नाहीं असाच समज आहेना ?

विश्वास०—हो हो—असाच समज आहे. त्याच्याबद्दल आम्हांस अविश्वास आहे असं त्याला आम्ही मुळींदेखील भाशिवलं नाहीं.

हिंम०—हं मग ठीक आहे. (सर्वांस उघड) आतां व्यर्थ उशीर करण्यांत अर्थ नाहीं. प्रतापरावांनीं आणि दौलतरावांनीं नगरच्या वेशीकडील व्यवस्था पहावी. मी आणि रामराय राजवाड्याकडे जातों. आणि वाड्याला इराणी आणि परदेशी सैन्याचा वेढा देऊन वाड्याचे दरवाजे फोडून एकदम आंत शिरतों.

शंभू०—दरवाजे फोडण्याचं काय कारण आहे ? वाड्यांत जायला मला एक चोरदरवाजा माहीत आहे. तियून आंत जाऊन आंतून दरवाजे उघडले म्हणजे झालं.

हिंमत०—असं झालं तर उत्तमच ! तर याच दरवाजानं आंत घुसूं. आणि भोजतिरमलाला एकदम कैद करूं. त्या नराधमानं—ज्याअर्थी कृष्णराय महाराजांचा खून करून त्यांची गादी बळकावली आहे, त्या अर्थी त्याला विजयानगरच्या गादीवर राहूं देऊन त्याला मुजरे करायला विजयानगरच्या मनीमर्द सरदारांचे हात—त्यांचे तोडून पैशाएवढे तुकडे केले तरी देखील वाहणार नाहींत !

विश्वास० व इतर सरदार—कध्धीं—कध्धीं—वाहणार नाहींत !

हिंमत०—(शंभूरावास पाहून) हे शंभूराव कसे इथं ? (शंभूराव कांपूं लागतो) त्या जुलमी भोजतिरमलाला इब्राहिमशहाला विजयानगरांत आणण्याकरितां सल्ला देणारे हेच ना ?

शंभू०—(स्वगत) आतां मात्र इथंच माझीं पुरीं शंभर वर्षं भरलीं ! (उघड) मी नव्हे तो, तो शंभूराव—आगलावे असेल !

हिंम०—(स्वगत) चोरा ! आगलाव्या तूंच ! (उघड) आगलावे काय ? तर तुमच्यासंबंधानं आमचा आजपर्यंत गैर समजच झाला होता म्हणायचा.

शंभू०—(हंसून) नाहीं, झाला असेल.

विश्वा०—(स्वगत) चोरा झाला असेल काय ! (उघड) हो. तो होणं साहजिक आहे. ज्यांना याचं आंतलं राजकारण ठाऊक नाहीं त्यांचा तसा गैरसमज व्हावा यांत कांहीं विशेष नवल नाहीं.

शंभू०—(स्वगत) हो राजकारण तर होतंच आणि आज इथं येण्यांत देखील तेंच आहे ! (उघड) दरबारांतली सगळी बित्तंबातमी काढण्याकरितां मला वरकरणी

तसं करावं लागत असे–खुद्द रामरायांना देखील ठाऊक आहे हें. (स्वगत) रामराय इथं नाहींत हें एका परीनं बरं आहे.

हिंमत०–(स्वगत) ह्याला वाटतं रामरायाला आपली दगलबाजी ठाऊक नाहीं. उघड) रामरायांना ठाऊक असल्यावर मग आणखी काय पाहिजे? शंभूराव, तुमच्याबद्दल व्यर्थ संशय घेतला, हें माफ करा तर.

शंभू०–यांत माफ तें काय करायचं ?

हिंमत०–तसं नव्हे हो–बरं तर तुम्ही देखील आमच्या बरोबर राजवाड्याकडे चला.

शंभू०–चला–माझी तयारी आहे. (स्वगत)आतां माझ्या जिवांतजिव आला थोडासा. नाहीं तर म्हटलं काय होतं—काय कीं.

हिंमत०–भोजतिरमलाला कैद करून–

शंभू०–कैद ! कैद कां ? त्यांना कृष्णराय महाराजांच्या खुनाबद्दल देहांत प्रायश्चितच पाहिजे !

हिंम०–(स्वगत) देहांत प्रायश्चितच पाहिजे आँ ! आणि त्यांच्या साथीदाराला नको का ? (उघड) अहो पण त्यांनींच खून केला याबद्दल कांहीं पुरावा पाहिजेना ?

शंभू०–अहो पुराव्याला हो काय कमी? भोजतिरमलाला खून चढून तो झोंपेत देखील कृष्णरायमहाराजांचा खून करीत असल्याचे चाळे करीत असल्याचं–ह्या विश्वासरावांनीं अन् दौलतरावांनीं प्रत्यक्ष पाहिलं आहे !

हिंमत०–पण एवढ्या पुराव्यापेक्षां ते खरेकरी कोण होते, त्यांना भोजतिरमलानं कसं पैदा केलं हें जर कळलं तर तो पुरावा बस्स होईल ! (एकीकडे) हें याला झोंबलं पाहिजे !

शंभू०–(स्वगत) हें कळलं म्हणजे अगोदर माझ्याच गळ्याला गळफांस बसणार ! (उघड) हो तसं झालं तर उत्तमच. पण तो पुरावा जरी मिळाला नाहीं तरी पद्मावती ताईसाहेबांनीं आणि खुद्द भोजाच्या मुलीनं जें प्रत्यक्ष पाहिलं आहे तेवढंच बस्स आहे म्हणतों मी त्यांना देहांत प्रायश्चित्त द्यायला !

हिंमत०–(स्वगत) उघडच आहे. नाहीं तर याचं आंग असल्याचं बाहेर यायचं ! (उघड) हो हे म्हणतात तेंही खरंच. पण भोजाच्या मागं विजयानगरच्या गादीवर कुणाला बसवायचं ?

शंभू०–तुमच्यासारखे पिढीजात नोकर असल्यावर–आणि आपलं आणि विजयाताईंचं लग्न झालं म्हणजे भोजतिरमलांचे मागं–गादीचं स्वामित्व अर्थात् आपल्याकडेच यावं हें उचितच आहे. मी म्हणतों हें खरं आहे कीं नाहीं विश्वासराव?

विश्वा०–(स्वगत) याला 'हो'च द्यावा. (उघड) हो, हो. दुसरं कोण आहे यांच्याशिवाय ?

हिंम०–(स्वगत) यानं आतां माझा तोंडपुजेपणा करायला सुरवात केली आहेन्. (उघड) मला वाटतं–कृष्णरायमहाराजांच्या बहिणीकडेच ही गादी गेली पाहिजे. आणि ज्याअर्थीं रामरायांसारख्या शूर आणि विजयानगरच्या गादीचा अभिमा

बाळगणाऱ्या सरदाराशीं त्यांचं लग्न झालं आहे त्याअर्थीं त्यांच्याचकडे ही गादी जावी हें रास्त आहे.

शंभू०–(रामराय येतोसें पाहून) हो, तुम्ही म्हणतां हेंही रास्तच आहे !

हिंम०–(स्वगत) रामराय आलेले पाहून हा इतक्यांत बदलला [इतक्यांत रामराय दोन कैदी घेऊन येतो.]

राम०–काय चाललं आहे ?

हिंमत० -कांहीं नाहीं–भोजतिरमलांना देहांत प्रायश्चित्त देऊन आपल्याला विजया-नगरच्या गादीवर बसविण्यासंबंधानं चा-ललं होतं.

विश्वा० व शंभू०–आणि या मानाला आपल्याशिवाय दुसरं आहे कोण योग्य !

रामराय–तुम्ही म्हणतां पण मी या मानाला पात्र नाहीं. आणखी दुसरं असं कीं, कृष्णरायाचा खून होऊन त्याच्या मागं मी त्याच्या गादीवर बसावं ही कल्पनाच अगो-दर अत्यंत भयंकर आणि हृदय विदारण करणारी आहे ! ही जर पद्मावतीच्या का-नावर गेली तर तिला मरणप्राय दुःख होऊन तिच्या दुःखाचा कडेलोट होईल ! ज्या वाड्यांत कृष्णरायाचा खून झाला त्याच वाड्यांत मी विजयानगरच्या गादीचं स्वा-मित्व पत्करून तिच्यासह नांदावं ह्या नुसत्या एका कल्पनेनं देखील ती वेडी आणि भ्रमिष्ट होईल ! यापेक्षां दूर एखाद्या निर्जन प्रदेशीं जाऊन तिथं तिच्यासह आनंदांत यापुढील आयुष्यक्रमण करावं हेंच उत्तम ! राजवंशांतलं दुसरं कोणी नाहीं तरी वि-जया आहे. अन् ती भोजतिरमलाची जरी मुलगी असली तरी ती अगदीं निरपराधी आहे. तिचं हिंमतरावांनीं पाणिग्रहण करावं, आणि तिच्याबरोबर या विजयानगरचं स्वामित्वही पत्करावं. यांच्याशिवाय विजया-नगरच्या गादीचा अभिमान बाळगणारे यांच्या तोडीचे दुसरे सरदार नाहींत.

हिंमत०–रामराय कांहीं म्हणोत, पण कृष्णरायांच्या मागं विजयानगरची गादी पद्मावती ताईच्याकडेच गेली पाहिजे.

शंभू०–आणि रामरायांशिवाय ही गादी चालविण्यालायक आहे कोण ?

राम०--(शंभूरावास पाहून) हे कोण! शंभूराव नव्हत का ? हेच इब्राहिमशहाला आणायला गेले नव्हते का ?

हिंमत०–छेः छेः. हे नव्हेत ते–तो शंभूराव आगलाव्या म्हणून निराळाच आहे.

राम०–(शंभूरावास) तुम्हींच मला त्या श्रीनृसिंहाच्या पायथ्याशीं भेटला नव्हता का ?

शंभू०–हो. अन् आपल्यास भेटून मी इकडची तयारी करण्याकारितां आलों.

राम०–अस्सं, अस्सं ! तर मग तुमच्या नुसत्या नांवानंच माझा गैरसमज झाला तर !

हिंम०–माझा देखील पहिल्यानं असाच झाला होता. (दूर उभे केलेल्या कैद्यांस पाहून) बरं पण, हे कोण ?

राम०–हे कैदी ? ज्यांनीं कृष्णरायाचा खून केला ते मारेकरी आहेत हे.

हिंमत०–म्हणजे जे आपल्याकडे

भोजतिरमलाकडून वकिली घेऊन आपल्यास कैद करण्याकरितां आले होते तेच ना हे ?

राम०-होय, तेच हे. यांना वाड्यांत घेऊन जाण्याकरितां मुद्दाम घेऊन आलों आहें.

शंभू०-(कांपूं लागतो. स्वगत) अरेरे, आतां मात्र घात झाला! यांनीं जर माझं नांव घेतलं तर काय होईल !

राम०-(शिपायांस) त्या कैद्यांना जरा पुढें आणा. (त्यांस पुढें आणतात.) कायरे? कृष्णरायमहाराजांचा खून तुम्हीच केलांतना ?

मारे०-होय सरकार; तें सगळं आम्ही आपल्या पायापाशीं कबूल केलंच आहे. (शंभूरावास ते निरखून पाहतात.)

हिंमत०-पण तुमचा वाड्यांत प्रवेश कसा झाला अगोदर? भोजतिरमलाची आणि तुमची गांठ कशी पडली ?

मारे०-ह्या शंभूरावांनीं—

शंभू०-मी ? हरामखोर नाहींतर ! तुमचा अन् माझा संबंध ?

मारे०-संबंध ! ह्यांनींच ह्यांनींच सरकार आम्हांला महाराजांना कांहीं नजराणा देण्याच्या मिषानं म्हणून वाड्यांत नेलं, आणि महाराजांची निजायची जागा वगैरे सगळी दाखवून ठेवून रात्रीं एका चोर दरवाजानें हे आम्हांला राजवाड्यांत घेऊन आले.

हिंमत०-चोरदरवाजानं ! आणि ह्यांनीं? हे नसतील ते. ते शंभूराव आगलावे असतील—शंभूराव, कां कांपतां कां असे तुम्ही ? तुम्ही मघां म्हणालात तोच असेल हा चोर दरवाजा नाहीं ?

शंभू०-असेल ! ह्या बदमाषांना मी एकदां कैदेंत टाकलं होतं त्यामुळं हे हरामखोर माझं नांव घेतात—

मारे०-(शंभूरावास) आतां उडवाउडवी कां करतां अशी ? भोजतिरमलाकडून तीं वस्त्रें आणि ते दागिने तुम्हींच नाहीं दिलेत आणून आम्हांला ?

हिंमत०-(शंभू०स) तर रामरायांचीं वस्त्रं आणि दागिने जे या मारेकऱ्यांजवळ सांपडले ते आपणच दिलेत तर यांना ? अन् हा आणि तो दोन्ही चोरदरवाजे एकच तर ! शंभूराव, किती हरामखोर आणि नीच आहां तुम्हीं ! आतां यापुढं मात्र तुमची दगलबाजी चालायची नाहीं इथं ! तुमचीं सगळीं कारस्थानं आणि नीच कृत्यें समजून चुकलीं आहेत आम्हांला.

राम०-म्हणजे शंभूराव शंभूराव म्हणू, न ऐकत होतों ते हेच तर ?

हिंमत०-हेच, हेच ते ! हेच आपल्यास भेटले होते आणि त्या वेळीं राजकारण करण्याकरितां आणि पद्मावती ताईचा जीव बचावण्याची व्यवस्था करण्याकरितां म्हणून आपल्या हातावर तुरी देऊन जे निसटून गेले ते हेच !

राम०-(शिपायांस) तर ह्या हरामखोराला एकदम कैद करा. अन् याला आणि या मारेकऱ्यांना राजवाड्यांत घेऊन चला. मन्याबापू, कुठं आहे ? (तो पुढं येतो) तुम्हीही चला आमच्याबरोबर वाड्यांत. म्हणजे भोजतिरमलाच्या पदरांत त्याच्या अपराधाचं पुरं माप टाकूं.

हिंमत०–ह्या हरामखोरानं भोजतिरमलाला जर हे मारेकरी पैदा करून दिले नसते तर कृष्णराय महाराजांचा खून होताना ! हा तोंडपुजाच सगळ्याच्या मुळाशीं आहे. ह्याच्या तोंडपुजेपणामुळेंच भोजतिरमलाच्या तोंडाला राज्यतृष्णेचं पाणी सुटलं आणि त्या राज्यतृष्णेच्या पायांतच हे सारे प्रकार घडून आले. ह्या सगळ्याचं कारण हा. हें आत्तां माझ्या लक्षांत येत आहे. हाच–कृष्णराय महाराजांचा मुकुट त्यांच्या डोक्याला बरोबर बसत नाही म्हणून भोजतिरमलाला आपल्या डोक्यावर घालण्याविषयीं आग्रह करीत होता. भोजतिरमलाला देहांत शासन देण्यापूर्वी याचाच अगोदर शिरच्छेद केला पाहिजे ! इब्राहिम शहाकडचं राजकारण बांधण्याची सल्ला देऊन त्याचा हिंदूच्या राज्यांत शिरकाव करवूं पहाणारा हाच तो नराधम. शहाला विजापुराहून इथं घेऊन येत असतांना वाटेंत त्याला आणि त्याच्या सरदारांना खूष करण्याकरितां या नराधमानं जीं एकेक अनन्वित कृत्यें केलीं आहेत, तीं ऐकलीत म्हणजे तुमचे अंगावर शहारे उठतील ! हिंदूंच्या देवळांची, आणि हिंदू स्त्रियांची जी दुर्दशा आणि बेअब्रू झाली, ती याच हरामखोराच्या पायीं ! याला विजयानगरचं साम्राज्य बुडवून इथं विजापूरकरांची पादशहात स्थापून इथली सुभेदारी पटकावयाची होती. शहाकडच्या आमच्या वकिलांकडून ही सगळी हकीकत कळली आहे मला. तेव्हां असल्या अपमतलबी, फितुरी, विश्वासघातकी आणि देशबुडव्या अधमाला देहांत प्रायश्चित्ताशिवाय दुसरं प्रायश्चित्तच नाहीं.

राम०–तर याला राजवाडयांत भोजतिरमलाच्या पुढं नेऊन याच्याकडून सगळं कबूल करवूं. अन् मग याचा त्याच्याच पुढं शिरच्छेद करूं. अन् मग पुढें काय करायचं तें करूं.

हिंमत०–(इतक्यांत इशारतीची तोफ होते.) ही पहा इशारतीची तोफ झाली. आतां उशीर करून उपयोग नाहीं. चला तर; विश्वासराव तुम्ही आणि दौलतराव ठरल्याप्रमाणें वेशीकडे जा. आणि आम्ही या कैद्यांना घेऊन येट वाडयाकडे जातों.

[सर्व जातात.]

प्रवेश ६ वा.

स्थळ–राजमहाल. प्रवेश–भोजतिरमल व तुकोजीराव–एक मानकरी.

भोज०–(विषास चढून निराशेनें वेडा झालेला) तुकोजीराव, तुम्ही देखील त्या रामरायाला फितलांत कीं काय ? नसला फितलांत तर अगोदर पीलखान्याकडे आणि पागेकडे जा–राजवाडयाचे सर्व दरवाजे मी बंद करविले आहेत–आणि तिथल्या खाशा खाशा हत्तींच्या आणि घोडयांच्या सोंडा आणि शेंपटया तरवारींनीं पटापट छाटून टाका. शत्रूंच्या हातीं त्यांपैकीं एकदेखील लागतां उपयोगी नाहीं! ह्या जामदारखान्याच्या किल्ल्या घ्या–आणि आज शेकडों वर्षें जमविलेलं सारं जडज-

बाहीर–पाचा–माणकं–लाल–नीळ–पुष्करा-जं–मोतीं–हिरे–झाडून सारं इथं घेऊन या –आणि तीं कुटवून त्यांचा चक्काचूर करून जात्यांत घालून त्यांची पूड करवा. आणि ती सगळ्या राजमहालभर उधळून फेंकून देववा! शत्रूच्या हातीं त्यांपैकीं एक तनसडी एवढं देखील लागतां कामा नये! राजवाड्यांतल्या सगळ्या दालनांतले आयने हांड्या, झुंबरें, आणि इतर सगळं बिलोरी सामान फोडून टाकवून सगळ्या वाड्याभर पसरून टाकवा. म्हणजे राजवाड्याचे दरवाजे फोडून शत्रू जर राजवाड्यांत घुसलेच तर कांचेचे नुसते तुकडे त्यांच्या पायांत शिरून त्यांच्या पायांतून रक्ताचे प्रवाह चालले पाहिजेत! त्या हरामखोर रामरायानं आपलं इमान दाखविण्याकरितां फुलं आणि तुळशी उचलून दिल्यान् त्यामुळं मी हा असा फसलों; आणि शहाला विजापूरला जायला निरोप दिला. शहा अजून कृष्णापार देखील होऊन गेला नसेल. तोंच यानं मी कैद केलेल्या विश्वासराव आदिकरून झाडून साऱ्या राजद्रोही आणि बंडखोर सरदारांना कैदेंतून मोकळं करून माझ्या विरुद्ध उठिवलन्. आणि ह्या तुरुंगांत कुजत पडलेल्या बदमाष लोकांसमोर कृष्णरायाच्या खुनाबद्दल माझ्या अपराधाची चौकशी करणार म्हणे–म्हणजे कोण बेवकूबपणा हा! खुद्द विजयानगरच्या राज[illegible]–अभिषिक्त राजाची चौकशी हा हराम[illegible]र या बदमाषांपुढं करणार हं.! आणि मला गादीवरून काढून टाकून माझ्या मागें त्या रामरायाला गादीवर बसविण्याचं काल्च्या त्या बदमाषांच्या गुप्त खलबतखान्यांत ठरून देखील चुकलं आहे म्हणे! म्हणजे कोण फितवा आणि बंडखोरपणा हा! जा, जा–तुम्ही एक क्षणभर देखील उभे राहूं नका आतां इथं –तुम्हांला सांगितल्याप्रमाणं सारं उरकून मग या इथं! (तो जाऊं लागतो) थांबा– आणखी एक सांगायचंय आहे तुम्हांला–जातां जातां अगोदर जिरातखान्याकडे जा अन् हवालदाराला सांगा कीं, जिरातखान्यांतल्या सगळ्या तरवारी, कट्यारी, तिमचा, गुप्त्या, भाले, पट्टे, फिरंग, सैफ, जमदाडा, खंजीर, सुरे, गुर्गुजा, फरशा, बाण, तिरकमटे, कमान, आणि इतर सगळीं सारीं हत्यारं यांचे मोडून पैशाएवढे तुकडे करून टाका; आणि तरवारींच्या म्याना, परज, करडा, दस्ताना, दुंदा, ढाला, पडदळं, कसण्या, बिनी, पट्या, बखतर, चिलखत, टोप हीं सर्व फाडून तोडवून त्यांच्या चिंधड्या चिंधड्या उडवून टाकून तीं शत्रूच्या निरुपयोगी होतील अशीं करून टाकायला सांगा–आणि त्याच्याकडून गोलंदाजांला सगळ्या बंदुकांच्या, तोफांच्या, आणि जंबुऱ्यांच्या कान्यांत खिळे ठोकायला सांगा–म्हणजे त्या शत्रूच्या हातीं लागल्या तरी त्यांना त्या कुचकामाच्या होतील! जा–किती झटपट उरकून येता हें पाहतों; (तो जातो.) त्या शंभूरावाला

इतके दिवस मी आपला कलिजा समजत होतों. पण कालपासून त्यानं जें आपलं तोंड काळं केलं आहेन् तें अजून दाखविलं नाहींन्. कालपासून त्याला सतरा बोलावणीं गेलीं असतील. पण त्याचा अजून हा वेळपर्यंत ठिकाण नाहीं! रामरायाला तो फितूर झाल्याची बातमी मघां माझ्या कानावर आली, ती तर खरी नसेल! छेः पण असं होणार नाहीं. त्याला मी आपली विजया देऊं केली आहे. एवढ्यामुळं तरी तो फितणार नाहीं. (कांहीं चाहूल ऐकून) कोण आहे तिथं? कोण? शंभूराव आले?

[एक शिबंदींतील बरकंदाज धांवत येऊन.]

बरकं०–आले सरकार!

भोज०–कुठं आहेत?

बरकं०–राजवाडयाचा दरवाजा फोडून आले!

भोज०–दरवाजा फोडून आले?–कोण कोण–? शंभूराव!

बरकंदाज–छेः सरकार, राजवाडयाला इराणी आणि परदेशी सैन्याचा वेढा देऊन राजवाडयाचे दरवाजे फोडून, रामराजे, हिंमतराव आणि इतर सरदार हत्यारबंद होऊन आंत घुसले!

भोज०–(दांत ओंठ खाऊन) रामराजे! हो भोजतिरमल अजून जिवंत असतां तो हरामखोर रामराय इतक्यांत रामराजा झाला! चोरा, तूंही त्यालाच फितूर आहेस तर! (त्यास मारूं पाहतो तो पळूं लागतो) हं थांब भिऊं नकोस असा,–दिवाणखान्याचा दरवाजा लाव आणि तुझी बंदूक ठांस,–तूं भिऊं नकोस. तुझ्यावर नाहीं मी झाडीत ती. तुझा काय अपराध आहे?–ती ठांसलेली आहे का?

बरकं०–नाहीं सरकार.

भोज०–आण तर ती इकडं–मी ठांसतों ती–तुझं तोस्तानही दे इकडं. (भोज त्याचें तोस्तान घेऊन अजितरायाच्या पुतळ्याशीं उभी करून ठेवलेली बंदूक घेऊन) अरेरे! हे शिवरायाचे आणि अजितरायाचे पुतळे माझ्याकडे किती क्रोधानं बघताहेत! मी कृष्णरायाचा खून केलेला यांनीं पाहिला आहे–तेव्हां यांना यापुढं ठेऊन नाहीं उपयोग! नाहीं तर यदाकदाचित् बंडवाले वाडयांत घुसले म्हणजे यांना वाचा फुटून हे कृष्णरायाचा मी खून केला म्हणून बडबडूं लागायचे! [बंदुकीच्या दस्त्यानें त्यांचीं नाकें तोंडें छिन्नभिन्न करतो]आतां नाहीं तुम्हांला वाचा फुटायची! [खालीं पडलेलें तोस्तान घेऊन बंदुकीचा बार ठांसूं लागतो.] तूं ती तिथं तरवार आहे ती घे आणि ती त्या खांबाला अगदीं बळकट बांधून टाक. चल, आटप झटपट पाहूं कशी बांधतोस ती! (बंदूक ठेऊन तरवार कशी बांधावयाची तें त्यास सांगतो व मधून मधून आपणच बंदुकीचा बार ठांसूं लागतो.)

[इतक्यांत रामराय, हिंमतराव, इतर सरदार, हत्यारबंद लोकांनिशीं प्रवेश करितात.]

बरकं०–महाराज, आले ते वर आले!

भोज०–अरेरे दरवाजे नाहीं बंद केलेस घात झाला–सर्वस्वी घात झाला. हरकत नाहीं! बंदूक ठांसलेली आहे माझ्या हातीं. तोडा पेटीव. (तो तोडा पेटवितो) रामराय, हिंमतराव, विश्वासराव, सगळे आले–या म्हणावं–मला काढून–हे रामरायाला गादीवर बसविणार !–ठीक आहे. ही पद्मावती माझ्या नजरकैदेंत आहे. तिला ठार करून अगोदर याच्या भावी सुखांत माती कलवितों–अन् मग पुढचं पुढं–ती दुसरी तरवार घे इकडं. [तो आणून देतो. ती घेऊन पद्मावतीच्या महालाकडे जातो. तो तरवार घेऊन येतो तें पाहून ती दरवाजा एकदम बंद करते. भोज दालनांत लटकत असलेला लांब सडक्याला घेऊन जाळींतून तिच्यावर तो टाकूं पहातो. इतक्यांत रामराय वगैरे सर्वजण आंत घुसतात.] या, (बंदूक घेऊन) ह्या पद्मावतीला यापुढं मी जिवंत ठेवीत नाहीं ! तिला अगोदर ठार करतों अन् मग तुमचा समाचार घेतों.

हिंमत०–[पुढें घुसून] ताईंना ठार करणार ! मांगा ! [भोजतिरमल बंदूक झाडतो–त्या आवाजासरशी पद्मावती किंकाळी फोडते. इतक्यांत बार ऐकून विजया धांवत येते.]

विजया.–बाबा !—

भोज०–कारटे ! तूं कशाला आलीस इथं ! चल, चालती हो इथून. नाहींतर खुनाची गोष्ट—(तरवार घेऊन तिच्या अंगावर धांवतो.) इतक्यांत हिंमतराव त्याचे हातांतून तरवार झटदिशीं काढून घेतो.

विजया.–(गयावया होऊन) हिंमतराव, बाबांच्या जिवाला अपाय होईल असं कांहीं करूं नका हो !

हिंमत०–विजये, तूं भिऊं नकोस. त्यांच्या जिवाला कांहीं अपाय होणार नाहीं !

भोज०–माझ्या जिवाला अपाय होण्याचं राह्यलंय काय आतां ? (एकदम वेगानें धांवत जाऊन खांबास बांधून ठेवलेल्या तरवारीवर घालून घेतो.) या, या ! मी तुमच्या हातीं जिवंत सांपडेन असं वाटलं काय तुम्हांला ? (एकीकडे त्यास कृष्णरायाचें भूत दिसतें तें पहून त्यास) कृष्णराय, मरसतोंपर्यंत तूं माझी पाठ पुरविलीस ! दाब, दाब, जोरानें दाब आतां माझं नरडं !

विजया.–(भोजकडे धाऊन जाऊन) बाबा ! बाबा ! हें काय करून घेतलंतहो ! (वेडी होऊन जाऊन त्याची मान धरून उभी राहते.) अगबाई, काय हें !

पद्मा०–(दरवाजा उघडून) बाहेर येते. हिंमतराव, मला वांचवाहो ! काय आहे प्रकार हा ?

हिंमत०–(साश्चर्य) अरे यांना वाचा फुटली ! (रामरायास) रामराय, तुम्हीं अश्वासन द्या ह्यांना.

समाप्त.